CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

धाराशिव | रविवार, २२ मार्च २०२६ । वर्ष ४ थे अंक १४ । पाने १२+८ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि आम्ही एक गोष्ट विसरलो की, आपण हरिजन असो वा अन्य कोणी, आपण सर्व एकाच समाजाचे पुत्र आहोत. हा अज्ञानरूपी अंधकार दूर करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे आम्ही सर्व हिंदू आहोत, आम्ही बंधू आहोत, एकाच ईश्वराची लेकरे आहोत. हा ज्ञानरूपी प्रकाश सर्वत्र पसरवा.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### एसबीआयला बजावली ६,३३८ कोटींची नोटीस

**नवी दिल्ली** : देशातील सर्वात मोठी सरकारी बँक स्टेट बँक ऑफ ला ६,३३८ कोटी रुपयांची आयकर नोटीस मिळाली आहे. एसबीआयने शेअर बाजाराला दिलेल्या माहितीनुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी आयकर विभागाने ही नोटीस पाठवली आहे. या रकमेमध्ये करासोबत व्याजाचाही समावेश आहे. त्यामुळे ही नोटीस आर्थिकदृष्ट्या मोठी असली, तरी बँकेने याकडे एक नियमित प्रक्रियेचा भाग म्हणून पाहिले आहे. बँकेच्या मते, हा मुद्दा काही नवीन नाही. मागील काही वर्षांपासून सुरू असलेल्या तपास आणि स्क्रुटिनी प्रक्रियेचा हा एक भाग आहे. आयकर विभागाने काही खर्च मान्य न केल्यामुळे ही अतिरिक्त कर मागणीची नोटीस बजावली आहे. ■

# व्यावसायिक एलपीजी वितरणात ५० टक्के वाढ



## हॉटेल्स, रेस्टॉरंट्स संचालकांना केंद्र सरकारचा दिलासा

**◆ नवी दिल्ली, २१ मार्च**

**राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना मिळणारे व्यावसायिक गॅस सिलेंडरचे वितरण ३० वरून ५० टक्क्यापर्यंत वाढविण्याचा निर्णय केंद्र सरकारने शनिवारी घेतला. हा निर्णय २३ मार्चपासून लागू होईल आणि पुढील आदेश येईपर्यंत तो अंमलात राहणार आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडर वितरणात रेस्टॉरंट्स, ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया प्रकल्प, दुधावर प्रक्रिया करणारे उद्योग आणि सामुदायिक स्वयंपाकघर यांना प्राधान्य दिले जाईल, अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाचे सचिव डॉ. नीरज मित्तल यांनी दिली.**

सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पत्र पाठविण्यात आले, त्यात सध्याची परिस्थिती लक्षात घेता, व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या वितरणात ५० टक्क्यांनी वाढ करण्याचे निर्देश देण्यात आले. अतिरिक्त सिलेंडर जास्त मागणी आणि गरज असलेल्या क्षेत्रांना प्राधान्याने वाटप करावे, यामध्ये रेस्टॉरंट्स, ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया आणि दुग्ध युनिट्स यांचा प्रामुख्याने समावेश करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

नवीन नियमांनुसार, पीएनजी कनेक्शन आणि ओएमसी नोंदणी देखील अनिवार्य करण्यात आली आहे. देशांतर्गत उत्पादनात सुधारणा झाल्यामुळे परिस्थिती सामान्य होत आहे. युद्धामुळे व्यावसायिक आस्थापनांचा एलपीजी पुरवठा यापूर्वीच कमी करण्यात आला होता. घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा अविरत सुरू राहावा यासाठी व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या वितरणात कपात करण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

### पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू वापरण्यास प्रोत्साहन

पुरवठ्यावरील ताण कमी करण्यासाठी सरकार पाईपलाईनद्वारे नैसर्गिक वायू वापरण्यास प्रोत्साहन देत आहे. विशेषतः व्यावसायिक आस्थापनांसाठी पीएनजीला प्रोत्साहन दिले जात आहे. शहर गॅस वितरण नेटवर्कसाठी मंजुरीची प्रक्रिया जलद करण्याचे राज्यांना आवाहन करण्यात आले आहे. ■

## जलमार्ग खुला ठेवा; पंतप्रधानांचे आवाहन

**◆ नवी दिल्ली, २१ मार्च**





इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला असताना, भारताने या वादात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. याचाच भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी इराणचे राष्ट्रपती डॉ. मसूद पेझेश्कियन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत होर्मुझ जलमार्ग खुला करण्याचे आणि व्यापारातील अडथळे दूर करण्याचे आवाहन केले.

पंतप्रधानांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, मी इराणचे राष्ट्रपती पेझेश्कियन यांच्यासोबत चर्चा केली. त्यांना ईद-उल-फितर आणि इराणचे नवीन वर्ष नवरोज निमित्त शुभेच्छा दिल्या आणि मध्य आशिया प्रदेशातील शांतता आणि स्थिरतेसाठी आग्रही भूमिका मांडली. इराणच्या पायाभूत सुविधांवर होणाऱ्या हल्ल्याचा निषेध केला. सोबतच प्रादेशिक सुरक्षा, जागतिक व्यापार आणि मानवी हित यावर भर दिला. हल्ल्यांमुळे केवळ प्रादेशिक स्थिरता धोक्यात येत नाही, तर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होऊन जगाच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होतो, असे नमूद केले. तसेच होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षित राहणे अनिवार्य असल्याचे यावेळी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### भारताने शोधला होर्मुझला पर्याय

मध्यपूर्वेतील युद्धामुळे होर्मुझ जलमार्गातून आखाती देशांकडून होणारा इंधनाचा पुरवठा विस्कळीत झाल्याने भारताने इतर स्रोतांकडून तेल आणि नैसर्गिक वायूची आयात वाढवली आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अवलंबून न राहता पश्चिम आफ्रिकन आणि आशिया-पॅसिफिक देशांकडून तेलाची आयात वाढविण्यात आली. सरकारी कंपनी, हिंदुस्तान पेट्रोलियमने एका निविदेद्वारे अंगोलाकडून २० लाख बॅरल तेल खरेदी केली. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनदेखील पश्चिम आफ्रिकेतून कच्चे तेल खरेदी करण्याचा निर्णय घेतला. ■

# विकसित भारतासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची

## उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांचे प्रतिपादन

**◆ नागपूर, २१ मार्च**

भारतीय युवा संसदेच्या माध्यमातून देशभरातील युवकांना जोडण्याचे कार्य गत दोन दशकांपासून होत आहे. देशाच्या अमृत काळात आपण सर्वांनी २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दिष्ट गाठण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले आहे. सर्वसमावेशक, अधिक मजबूत आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी युवकांची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याचे स्पष्ट प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

### भारतीय युवा संसद परिषदेचे उद्घाटन



रेशीमबाग येथील महर्षी व्यास सभागृहात २९ व्या भारतीय युवा संसद परिषदेचे उद्घाटन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह व वरिष्ठ प्रचारक डॉ. कृष्ण गोपाल, केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी, भारतीय युवा संसद परिषदेचे राष्ट्रीय संयोजक आशुतोष जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.


उपराष्ट्रपती म्हणाले की, कोणत्याही देशाची क्षमता आणि सामर्थ्य हे त्या देशाच्या तरुण लोकसंख्येच्या आकारावर आणि ताकदीवर अवलंबून असते. भारताकडे तरुणांची मोठी संख्या ही अत्यंत जमेची बाजू आहे. आज देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या ३५ वर्षांखालील युवकांची आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली केंद्र सरकारने तरुणांच्या शिक्षण, कौशल्य आणि नेतृत्व विकासासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

### युवकांनी संधीचे सोने करावे

उपराष्ट्रपती म्हणाले की, भारतीय युवा संसदेच्या परिषदा देशाच्या कानाकोपऱ्यात आयोजित करण्यात येत असल्याने युवकांना राष्ट्रीय स्तरावरील चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळते. अशाच संधीचा उपयोग करीत युवकांनी संधीचे सोने करावे. भारतीय युवा संसद परिषदेत भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचे प्रभावी माध्यम झाले आहे. या परिषदेच्या माध्यमातून युवकांच्या विचारांना आकार देण्याचे कार्य होते. चारित्र्य संपन्न युवक घडविण्यात अशी परिषद उपयोगी ठरते. ■

## 'देशभरात १०० नवीन सैनिकी शाळा'

**◆ नवी दिल्ली, २१ मार्च**



युवकांमध्ये शिस्त, नेतृत्व आणि देशभक्तीची मूल्ये रुजवण्यात राष्ट्रीय छात्र सेना अर्थात् एनसीसीची भूमिका महत्त्वाची आहे. आगामी वर्षात एनसीसीमधील कॅडेट्सची संख्या १७ लाखावरून २० लाख करण्यात येईल. याशिवाय देशभरात १०० नवीन सैनिकी शाळा सुरू करणार असल्याची घोषणा संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी एका कार्यक्रमात केली.

उत्तराखंडच्या पोरखाल सैनिकी शाळेत आयोजित कार्यक्रमात संबोधित करताना संरक्षण मंत्र्यांनी सैनिक शाळा घोरखालच्या परंपरेची प्रशंसा केली. एनसीसी कॅडेट्सच्या संख्येत तीन लाखांनी वाढ केली जाणार असल्याने अधिक मुलांना राष्ट्र उभारणीसाठी आवश्यक असलेली मूल्ये शिकण्याची संधी मिळेल. सरकार देशात सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेल अंतर्गत १०० नवीन सैनिक शाळा स्थापन करत आहे. या संस्था युवकांना विविध क्षेत्रांमध्ये नेतृत्व भूमिका स्वीकारण्यासही सक्षम करतात. ◂(वृत्तसंस्था)



CMYK



भारतीय सेनादलांत असणरा किंवा निवृत्त झालेल्या व्यक्तींनाच नावासोबत 'कॅप्टन' हे पद जोडण्याचा अधिकार असतो. तेव्हा या भोंदूबाबाला 'कॅप्टन' असे संबोधता कामा नये.
- **संभाजीराजे**, माजी खासदार

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ : १९२६
रविवार, २२ मार्च २०२६




अंमली पदार्थ आणि शस्त्र तस्करांविरोधात मोहीम राबवली आहे. तस्करांच्या घरावर बुलडोझर कारवाई केली जात आहे. पोलिसांवर आरोप करणे सोपे आहे, पण पोलिस तत्परतेने आपले काम करत आहेत.
- **भगवंतसिंग मान**, मुख्यमंत्री, पंजाब

# इस्रायलच्या हल्ल्याने लेबनॉन हादरला

## हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर ड्रोन, तोफगोळ्यांचा मारा, २२ दहशतवादी ठार, अनेक जखमी



### इराणचा इस्रायलवर क्षेपणास्त्राचा मारा

**इराणने शनिवारी इस्रायलच्या दिशेने अनेक क्षेपणास्त्राचा मारा केला. राजधानी तेल अवीवसह पाच शहरातील पायाभूत सुविधांना लक्ष्य करीत हल्ले चढविण्यात आले. यानंतर लोकांना सुरक्षित स्थळी जाण्याचा आणि धोका टळेपर्यंत तिथेच थांबण्याचा सल्ला देण्यात आला आहे. लष्कराने सांगितले की, क्षेपणास्त्रांना रोखण्यासाठी हवाई संरक्षण यंत्रणा सक्रिय करण्यात आली होती. इस्रायलने हल्ल्यात जीवितहानीचा तपशील जाहीर केलेला नाही.**

### नतान्झ अणुकेंद्रावर पुन्हा हल्ला

**अमेरिका आणि इस्रायलने शनिवारी सकाळी इराणच्या नतान्झ अणुकेंद्रावर हवाई हल्ला चढविला. या हल्ल्यात आतापर्यंत कोणतीही किरणोत्सर्गी (धोकादायक अणु) गळती झालेली नाही, असे इराणच्या सरकारने सांगितले. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी अणुकेंद्रावरील हल्ल्याची पुष्टी केली आहे. अणुकेंद्रावर हल्ले केल्याने आम्ही माघार घेऊ असे अमेरिकेला वाटत असेल, तर हा त्यांचा भ्रम आहे. इराण कोणत्याही परिस्थितीत शरणागती पत्करणार नाही.**

**बैरुत, २१ मार्च**

इस्रायली सैन्याने दक्षिण लेबनॉनमध्ये जमिनी आणि हवाई मार्गाने हिजबुल्लाहच्या अड्ड्यांवर ड्रोन आणि तोफगोळ्यांचा मारा केला. यात २२ दहशतवादी मारले गेले, तर अनेक जखमी असल्याची माहिती इस्रायलच्या संरक्षण विभागाने दिली.

हवाई आणि जमिनीवरून शुक्रवारी रात्री केलेल्या कारवाईत हिजबुल्लाहचे प्रशिक्षण केंद्, दारूगोळ्याची ठिकाणे आणि त्यांचे निवास असलेल्या इमारतींवर ड्रोन आणि तोफगोळ्यांचा मारा करण्यात आला. यात २२ दहशतवादी मारले, तर अनेक जखमी आहे. लेबनॉन सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने हल्ल्याची पुष्टी केली आणि सांगितले की, इस्रायलच्या हल्ल्यात निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या. बचावपथकाने ढिगाऱ्यातून २२ मृतदेह बाहेर काढले, तर ५० पेक्षा अधिक जखमींना रुग्णालयात हलविण्यात आले. प्रत्युत्तर म्हणून हिजबुल्लाहने इस्रायली सैनिकांवरही गोळीबार केला, परंतु यात कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही. इस्रायलच्या वायुदलाने राजधानी बेरूतमध्ये हिजबुल्लाच्या अनेक अड्ड्यांवर हल्ले चढविले. दुसरीकडे इराकची राजधानी बगदादच्या मन्सूर भागात इराणने ड्रोनचा मारा केला. एका ड्रोनने इराकी गुप्तचर विभागाच्या इमारतीला लक्ष्य केले. ही इमारत अमेरिकन सल्लागारांसोबत काम करणाऱ्या इराकी सुरक्षा यंत्रणेचा एक भाग आहे. दुसरा ड्रोन एका खाजगी स्पोर्ट्स क्लबवर कोसळला. हा क्लब इराकी उच्चभ्रू आणि परदेशी राजनैतिक अधिकाऱ्यांमध्ये लोकप्रिय आहे. (वृत्तसंस्था)

# केंद्र सरकार करणार व्हॉट्सअॅपवर कारवाई

## खोटो कॉल्स, फसवणुकीला आळा घालणार

**नवी दिल्ली, २१ मार्च**

केंद्र सरकारने सायबर फसवणुकीला आळा घालण्यासाठी व्हॉट्सअॅपच्या वापरासंदर्भात कठोर पावले उचलली आहेत. डिजिटल अटक दाखवून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी संशयित मोबाईल उपकरणांची ओळख करून त्यांना ब्लॉक करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



या निर्णय केंद्रीय गृह मंत्रालयाने घेतला असून, सायबर गुन्हेगारीविरोधातील समन्वय यंत्रणेने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या अहवालात अशा प्रकारच्या फसवणुकीसाठी वेगवेगळ्या उपकरणांचा वापर करून वारंवार नवे खाते तयार केले जात असल्याचे नमूद करण्यात आले. यामुळे अशा उपकरणांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले. फसवणूक करणारे लोक व्हॉट्सअॅपचा वापर करून नागरिकांना फोन किंवा व्हिडीओ कॉल करतात आणि त्यांना खोट्या अटक प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न करतात. अशा कॉल्सच्या माध्यमातून भीती निर्माण करून लोकांकडून पैसे उकळले जातात.

प्रत्येक वेळी नवीन खाते तयार करून हे गुन्हेगार आपली ओळख लपवण्याचा प्रयत्न करतात. या पृष्ठभूमीवर, सरकारने ठराविक उपकरणांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या मोबाईल क्रमांकावर वारंवार अशी खाती तयार केली जातात, त्यांना ओळखून त्यांच्यावर निर्बंध लावले जाणार आहेत. यामुळे गुन्हेगारांचे नेटवर्क तोडण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. माहिती तंत्रज्ञान नियमांनुसार काढून टाकलेली माहिती काही काळासाठी जतन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामुळे तपास यंत्रणांना गुन्हे उकलण्यास मदत मिळू शकते.

याशिवाय, बनावट किंवा संशयास्पद अॅप्स ओळखून त्यांनाही बंद करण्याची योजना आखण्यात आली आहे. व्हॉट्सअॅप हे देशातील मोठ्या प्रमाणावर वापरले जाणारे संवादाचे साधन आहे. (वृत्तसंस्था)

### सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवणे शक्य

**मोबाईल उपकरणांची ओळख त्यांच्या विशेष क्रमांकावरून केली जाते. यात प्रत्येक उपकरणासाठी वेगळा ओळख क्रमांक असतो. या क्रमांकांच्या आधारे उपकरणे ओळखून त्यांच्यावर कारवाई करणे शक्य होते. या सर्व उपाययोजनांमुळे सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण येईल आणि सामान्य नागरिकांची फसवणूक रोखण्यास मदत होईल, असा विश्वास तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे.**

# खरातांना गुरू मानले होते; वैयक्तिक आयुष्याबाबत माहिती नव्हती : चाकणकर

**मुंबई, २१ मार्च**



महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर रुपाली चाकणकर यांनी भूमिका स्पष्ट केली. आपण खरातांना गुरू मानले होते. त्या व्यक्तीच्या कुटुंबाशी आपले आणि आपल्या कुटुंबाचे अनेक वर्षांपासून आध्यात्मिक नाते होते. विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये, तसेच सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग होता. मात्र, त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबाबत माहिती नव्हती, असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांनी दिले आहे.

काही वर्षांपूर्वीपासून संबंधित व्यक्तीशी संपर्क होता आणि त्या काळात त्यांच्या वागणुकीबाबत कोणतीही माहिती नव्हती. काही घटना समोर आल्यानंतर धक्का बसला. या प्रकरणाशी संबंधित व्हिडीओ आणि माहिती काही वर्षांपूर्वीची आहे. कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्याबाबत आपल्याला काहीही माहिती नव्हती. या प्रकरणात कोणतीही बाजू घेण्यात आलेली नसून, तपास पूर्णपणे निष्पक्षपणे व्हावा, अशी भूमिका आहे. यासाठी त्यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना आणि राज्यातील प्रमुखांना पत्र दिल्याचेही त्यांनी नमूद केले, असे चाकणकर म्हणाल्या.

**अशोक खरातच्या अटकेनंतर मिरगावात संतापाची लाट**

नाशिकः अशोक खरातवर अनेक महिलांवर अत्याचार आणि लैंगिक शोषण करण्याचे गंभीर आरोप आहेत. भोंदूगिरी, धमकावणी आणि राजकीय बळाचा वापर करून जमिनी हडपल्याचा आरोपही समोर आला आहे. खरात जेरबंद होताच अनेक लोक तक्रार देण्यासाठी पुढे आले आहेत. गावकऱ्यांनी अशोक खरातला गावबंदी करण्याचा ठराव ग्रामसभेत मांडण्याची तयारी सुरू केली तसेच खरात अध्यक्ष असलेल्या ईशान्यश्वर देवस्थानच्या विश्वस्त मंडळाचा कारभार ग्रामस्थांच्या ताब्यात देण्याची मागणीही जोरात होत आहे. (वृत्तसंस्था)

### प्रकरण दाबण्याचे प्रयत्नः भास्कर जाधव




उबाठाचे नेते भास्कर जाधव यांनी गंभीर आरोप केले आहेत. अशोक खरात प्रकरणाच्या चौकशीसाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळातच एसआयटी नेमली होती. अर्धे मंत्रिमंडळ अडकण्याच्या भीतीने प्रकरण दाबण्याचे प्रयत्न झाले. पण, काही पत्रकार आणि पीडित महिलेमुळे हे प्रकरण उघड झाल्याचे आरोप जाधव यांनी केले. तर जादूटोणाविरोधातील कायद्याचे पालन करणारेच भोंदू बाबाच्या नादी लागल्याची टीका उबाठा प्रमुख उद्धव ठाकरेंनी केली आहे.

### खरातांचा खगोलशास्त्राचा चांगला अभ्यास : केसरकर



अशोक खराताचा खगोलशास्त्राचा चांगला अभ्यास असल्याने माझ्यासहित अनेक लोकांचे त्याच्यासोबत चांगले संबंध आहेत. नाशिकमधील ईशान्येश्वर मंदिरासाठी रस्ता बनवण्याच्या संदर्भात अशोक खरात हे एकनाथ शिंदे यांना भेटण्यासाठी आले होते. त्यावेळी माझी त्यांची पहिली ओळख झाली. पण, त्याच्यासोबत फोटो असल्याचा आधार घेत राजकीय नेत्यांवर आरोप करणे चुकीचे आहे, असे शिवसेनेचे दीपक केसरकर यांनी दिले आहे.

### वस्तुस्थिती स्पष्ट होईल : छगन भुजबळ



लोकांनी अंधश्रद्धेपासून दूर राहिले पाहिजे. राजकारण आणि समाजकारणात असणाऱ्या लोकांनी या बाबतीत स्वतःच्या काही मर्यादा आखल्या पाहिजेत. कारण, ते जे काही करतात त्याचा परिणाम थेट जनतेवर होतो हे लक्षात घेतले पाहिजे. रुपाली चाकणकरांनी काही चुकीचे केले असेल तर पोलिस पाहून घेतील.

# जनसामान्यांच्या माध्यमातून परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे संघ

## सुनील आंबेकर यांचे प्रतिपादन ● 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे, २१ मार्च**

हिंदू समाजातील दोषांवर परिपूर्ण उपाय म्हणून डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. संघ जरी मोठ्या सामाजिक परिवर्तनासाठी कार्यरत असला, तरी ही प्रक्रिया अत्यंत स्वाभाविक आणि सामान्य आहे. खऱ्या अर्थाने जनसामान्यांच्या माध्यमातून घडणारी परिवर्तनाची प्रक्रिया म्हणजे संघ होय, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.



'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' पुस्तकाचे प्रकाशन करताना (डावीकडून) डॉ. गिरीश आफळे, सुनील आंबेकर, पद्मश्री गिरीश प्रभुणे आणि अरुण करमरकर

भारतीय विचार साधनेच्या (भाविसा) नाना थिटे सभागृहात आयोजित 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ विचारवंत पद्मश्री गिरीश प्रभुणे, लेखक अरुण करमरकर, भाविसाचे अध्यक्ष डॉ. गिरीश आफळे, कार्यवाह काशिनाथ देवधर आदी मान्यवर उपस्थित होते. लेखक दिलीप क्षीरसागर, अरुण करमरकर आणि दिलीप करंबळेकर यांनी या पुस्तकाचे लेखन केले आहे.

याप्रसंगी सुनील आंबेकर म्हणाले, डॉ. हेडगेवारांना केवळ राजकीय असहमती व्यक्त करायची असती, तर त्यांनी राजकीय पक्ष स्थापन केला असता. मात्र, त्यांना चालणार नाही, तर त्यांचे संघटन करणे आवश्यक होते. म्हणून संघाची सुरुवात केली. संघ समजून समजतो.

पद्मश्री गिरीश प्रभुणे म्हणाले की, भारताची विस्कळीत झालेली गोंधळाची स्थिती संघामुळे दूर झाली. हिंदुत्व हा सर्वांना जोडणारा विचार असल्याचे आता सर्वांना उमजले आहे.

लेखक अरुण करमरकर यांनी स्वयंसेवक या शब्दाच्या मीमांसेवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, शताब्दीच्या निमित्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या तीन शब्दांची मीमांसा करण्याचे काम आम्ही केले. माझ्या वाट्याला स्वयंसेवक शब्दाची मीमांसा आली. माझ्या अध्ययनातून मी अजूनही स्वयंसेवक बनण्याच्या मार्गावरच आहे.

### 'रिलिजन'मुळे धर्मावर अन्याय!

पश्चिमेत रिलिजनच्या माध्यमातून मूळतत्त्ववाद जन्माला आला आणि चर्चने थेट राज्यकारभार हाती घेतला. त्यामुळे तिथल्या विचारवंतांनी सामाजिक परिवर्तनासाठी रिलिजनला नाकारले. दुर्दैवाने, तोच अनुभव भारतात लादण्याचा प्रयत्न झाला आणि धर्म या संकल्पनेला रिलिजनला समानार्थी मानून दूर सारले गेले. भारतात धर्म म्हणजे कर्तव्य आणि कल्याण होय. राज्यकारभार, शिक्षण, प्रशासन यात धर्म नको, या विचारामुळे ही क्षेत्रे चारित्र्यहीन झाली आहेत. आज पुन्हा लोक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात धर्माची (कर्तव्याची) मागणी करत आहेत, असे सुनील आंबेकर यांनी नमूद केले.

# १ एप्रिलपासून आयकरासंबंधी मोठे बदल

**नवी दिल्ली, २१ मार्च**

केंद्र सरकारने आयकर नियम २०२६ अधिसूचित केले असून हे नियम १ एप्रिलपासून लागू होतील. या नव्या नियमांमुळे कररचनेतील गुंतागुंत दूर होण्यास मदत होणार आहे.

नागरिकांना सहज आयकर भरता येईल, अशी अपेक्षा आहे. नवीन कायदा, इनकम टॅक्स अॅक्ट १९६१ ची जागा घेईल आणि डिजिटल अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम थेट दिसून येईल. सरकारचा उद्देश कर प्रणाली अधिक पारदर्शक करणे आणि करदात्यांमध्ये असलेला संभ्रम आणि भीती दूर करणे हा आहे. नवीन नियमांनुसार व्यक्तींच्या आर्थिक व्यवहारांचा तपास, त्याचा लेखाजोखा आणि त्यावर बारकाईने लक्ष ठेवणे शक्य होईल.

# क्रिकेट खेळताना विद्यार्थ्याचा मृत्यू

**बरेली, २१ मार्च**

हाफिजगंज परिसरात क्रिकेट खेळताना बी.एस्सी.च्या विद्यार्थ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी मटकली गावात घडली. शकीब रईस अहमद, असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.

शकीब, दिल्लीत बी.एस्सी.चे शिक्षण घेत होता. तो ईद साजरी करण्यासाठी आठवडाभरापूर्वी घरी परतला होता. शुक्रवारी दुपारी १२ वाजता तो गावातील ईदगाहजवळील मैदानावर मित्रांसोबत क्रिकेट खेळत असताना अचानक कोसळला.

# इराणचे तेल स्वस्तात आयात करणार भारत

### अमेरिकेने बंदी उठवल्याने खरेदीचा मार्ग मोकळा

**नवी दिल्ली, २१ मार्च**

जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती नियंत्रणात आणण्याच्या उद्देशाने अमेरिकेने इराणच्या तेलावरील बंदी उठवली, पण ती केवळ एका महिन्यापुरती आणि केवळ समुद्रातील इराणी तेलापुरतीच आहे. त्यामुळे, भारतीय तेल कंपन्या आता हे तेल खरेदी करण्याची तयारीत आहेत. विशेष असे की इराणचे तेल बाजारातील दराच्या तुलनेत स्वस्तात उपलब्ध होणार असल्याने सध्या स्थितीत भारताची गरज तेल खरेदीतून पूर्ण होणार आहे.

अमेरिकेने इराणच्या तेलावरील निर्बंध उठवल्याने हे तेल आता आशियाई देशांपर्यंत सहज पोहोचू शकणार आहे. समुद्रात इराणच्या तेलाचा मोठा साठा आहे. भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्या ते खरेदी करण्याची तयारी करत आहेत. यापूर्वी इराणचे तेल केवळ चीनच खरेदी करत होता, पण आता बंदी उठवल्यामुळे ते भारतातही आयात केले जाईल. तीन भारतीय तेल शुद्धीकरण केंद्रांमधील सूत्रांनी सांगितले की, ते इराणी तेल खरेदी करतील आणि पेमेंटच्या अटींबाबत सरकारी मार्गदर्शनाची वाट पाहत आहेत. भारताचा कच्च्या तेलाचा साठा इतर प्रमुख आशियाई देशांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहे. अमेरिकेने रशियन तेलावरील बंदी उठवल्यामुळे, भारतीय तेल शुद्धीकरण केंद्रांनी रशियन तेलाची नोंदणी वाढवली आहे.

अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसांत यांनी शुक्रवारी सांगितले की, ट्रम्प प्रशासनाने समुद्रातून इराणकडून तेल खरेदी करण्यावर ३० दिवसांची निर्बंधमाफी दिली आहे. ही सूट समुद्रातून येणाऱ्या इराणी तेलाला लागू होईल आणि १९ एप्रिल रोजी तेल उतरवेपर्यंत ती प्रभावी राहील. युद्ध सुरू झाल्यापासून अमेरिकेने तेल निर्बंधांना तात्पुरती सूट देण्याची ही तिसरी वेळ आहे. (वृत्तसंस्था)

### जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता

सौदी अरेबियाच्या अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार, जर इराण युद्ध आणि त्यामुळे निर्माण झालेले ऊर्जा संकट एप्रिल अखेरपर्यंत सुरू राहिले, तर कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १८० डॉलरच्या वर जाऊ शकतात. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता वाढली आहे. फेब्रुवारीमध्ये रशियाकडून भारतात होणारी तेल आयात ३२ टक्क्यांनी घटून दररोज अंदाजे १० लाख बॅरलवर आली. इराककडून होणारी आयात वाढून दररोज ११.८ लाख बॅरल झाली. सौदी अरबकडून होणारी आयातही वाढून दररोज अंदाजे ९,९८,००० बॅरल झाली.

# ८,४०० संकेतस्थळे, ३०० बेटिंग अॅप्सवर बंदी




## नव्या कायद्याचा आधार घेत केंद्र सरकारची कारवाई

**नवी दिल्ली, २१ मार्च**

देशातील वाढत्या बेकायदेशीर ऑनलाईन बेटिंग (जुगार) आणि सट्टेबाजीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने एका कारवाईत ३०० हून अधिक बेकायदेशीर बेटिंग अॅप्स आणि ८४०० संकेतस्थळावर बंदी घातल्याची माहिती दिली. डिजिटल माध्यमांतून होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला आळा घालण्यासाठी कारवाई करण्यात आल्याचे प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे.

बेकायदेशीर सट्टेबाजींविरोधातील मोहिमेअंतर्गत आतापर्यंत एकूण सुमारे ८,४०० संकेतस्थळावर आणि ३०० हून अधिक अॅप्सवर कारवाई करण्यात आली आहे. विशेषतः सरकारने लागू केलेल्या नवीन ऑनलाईन गेमिंग नियमानंतर ही पहिलीच मोठी कारवाई आहे. यात अनेक परदेशी अॅप्सचाही समावेश असून, जे भारतीय चलनामध्ये सट्टा लावण्यासाठी प्रवृत्त करत होते.सरकारने केलेल्या या कारवाईची व्याप्ती मोठी आहे. यामध्ये प्रामुख्याने ऑनलाइन स्पोर्ट्स बेटिंग प्लॅटफॉर्म्सचा समावेश आहे, जे क्रिकेट, फुटबॉल आणि इतर मोठ्या क्रीडा स्पर्धांवर सट्टा लावण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत होते. यासोबतच ऑनलाईन कॅसिनो, स्लॉट्स, रूलेट आणि लाईव्ह डीलर गेम्स चालवणाऱ्या वेबसाइट्सवरही बंदी घालण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

### अनधिकृत कॅसिनो गेम अॅप्स रडारवर

**पारंपरिक सट्टा किंवा मटका चालवणारी डिजिटल नेटवर्क्स केंद्र सरकारच्या रडारवर आहेत. रिअल-मनी कार्ड गेम्स आणि अनधिकृत कॅसिनो गेम अॅप्सचाही यामध्ये समावेश आहे.ऑनलाईन जुगाराच्या व्यसनामुळे अनेकांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी सरकारला मिळाल्या. या पृष्ठभूमीवर, केंद्र सरकारने स्पष्ट केले की, आगामी काळात बेकायदेशीर ऑनलाइन जुगार आणि बेटिंगविरोधातील ही मोहीम अधिक तीव्र केली जाईल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि विनापरवाना आर्थिक व्यवहार करणाऱ्या कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मला सवलत दिली जाणार नाही.**

# २० जूनला सुप्रिया सुळे होणार सासूबाई

### मुलगी अडकणार विवाहबंधनात

**बारामती, २१ मार्च**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची नात आणि खासदार सुप्रिया सुळे यांची कन्या रेवती सुळे लवकरच विवाहबंधनात अडकणार आहे. रेवती सुळे आणि नागपूरचे उद्योगपती सारंग लखानी यांचा विवाह २० जून रोजी मुंबईत पार पडणार आहे.

या विवाहसोहळ्यामुळे पवार कुटुंबात सध्या आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तयारीलाही वेग आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा विवाहसोहळा मुंबईतील एका प्रतिष्ठित ठिकाणी भव्य स्वरूपात आयोजित केला जाणार आहे. या कार्यक्रमासाठी राज्यातील आणि देशातील अनेक नामांकित राजकीय नेते, उद्योगपती तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. विवाहानंतरही विविध ठिकाणी स्वागत समारंभांचे आयोजन करण्यात येणार आहे. रिसेप्शन मुंबईत पार पडेल, तर वरपक्ष नागपूरचा असल्याने तेथेही खास कार्यक्रम करण्यात येणार आहे. याशिवाय, पवार कुटुंबाचे राष्ट्रीय स्तरावरील महत्त्व लक्षात घेता दिल्लीतही एक भव्य स्वागत समारंभ होण्याची शक्यता आहे.



सारंग अरुण लखानी हे नागपूरचे रहिवासी असून ते विश्वराज ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक असलेल्या अरुण लखानी यांचे सुपुत्र आहेत. सारंग हे केवळ उद्योग क्षेत्रातच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही सक्रिय असून ते एक कुशल बॅडमिंटनपटू आहेत. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

दिनेश गुणे

# उन्मादाची उबळ!



आपल्या आनंदाचे क्षण अनुभवताना इतरांनाही त्यामध्ये सहभागी करून घेणे आणि आनंद वाटून घेणे ही माणुसकी असते. तो सहजीवनाचा आदर्श असा संस्कार असतो. कारण, वाटून घेतल्याने कमी होत नाही, अशी आनंद ही एकमेव गोष्ट आहे असे म्हणतात. अलिकडे मात्र असा, स्वतःसोबत इतरांनाही वाटेकरी करून घेता येईल असा भरभरून आनंद वाट्याला येणे धकाधकीच्या आणि असंख्य समस्यांमुळे तणावग्रस्त होत चाललेल्या जगण्यात तसे दुरापास्तच होऊ लागल्याने, आनंदाचे क्षण आपल्यापुरते ओरबाडण्याचीच मानसिकता बळावत चालल्याचे एक विचित्र चित्र आसपास गडद होत चाललेले दिसते. त्यातूनच, आनंदाच्या शोधाची तहानही वाढत चालली असून आनंद मिळविण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ जगभरातील माणसांवर आली आहे. माणसाच्या कोणत्याही गरजांचे व्यापारीकरण होण्याच्या जमान्याने ही वेळ नेमकी ओळखल्याने या गरजेतूनच पर्यटन नावाचा जागतिक स्तरावरील एक व्यवसाय कमालीचा फोफावला आहे. पर्यटन करा आणि दररोजच्या जगण्यातून हरवत चाललेला आनंद अनुभवा हे या व्यवसायाचे ब्रीदवाक्य झाले असून पर्यटनातून आनंद शोधणाऱ्यांच्या झुंडी जागोजागी पाहावयास मिळत आहेत. जिथे जिथे हमखास आनंद अनुभवता येईल अशा प्रत्येक ठिकाणी या क्षेत्राने आपला ठसा उमटवला असून तशी एकही जागा या व्यवसायाने मोकळी ठेवलेली नाही. शहरे, गावे, ऐतिहासिक स्थळे, तीर्थक्षेत्रे, वने, जंगले अशी अनेक स्थळे पर्यटनस्थळे म्हणून नावारूपास आणून या स्थळांचे व्यापारीकरण करणाऱ्या या व्यवसायात ग्राहक म्हणून सहभागी झाल्यास आनंद मिळतो असे अनुभवास येऊ लागल्यानंतर, हा आनंद एकट्याने अनुभवण्याऐवजी समूहाने अनुभवण्याची टूम सुरू झाली. आता तर गरिबी न्याहाळण्याचाही पर्यटनव्यवसाय सुरू झाल्याची चर्चा ऐकावयास मिळत असून शहरी गरिबी हादेखील पर्यटनाचा मुद्दा होऊ लागला आहे. अशा, चहुबाजूने बहरणाऱ्या पर्यटन व्यवसायाची सारी मदार आनंदसुखासाठी आसुसलेल्या समाजातील समूहांवरच अधिक असल्याने आता एखाद्या स्थळी एकट्यादुकट्याने पर्यटन करणारी व्यक्ती दिसली की त्याच्याविषयी कुतूहल वाटू लागते. त्यातूनच 'सोलो ट्रॅव्हल' किंवा 'एकला चलो रे' नावाचा पर्यटनाचा प्रकार सुरू झाला, पण त्याने या क्षेत्राच्या आर्थिक उन्नतीला फारसा हातभार लागत नसल्याने, सामूहिक पर्यटनाकडे समाजास आकृष्ट करण्याची स्पर्धा सुरू झाली. झुंडीने किंवा समूहाने पर्यटन करण्याच्या वाढत्या सवयीमुळे एक नवी समस्या मात्र निर्माण होऊ पाहत आहे. या समस्येचीच एक चुणूक अलिकडेच महाराष्ट्राच्या ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात पाहावयास मिळाली. झुंडीने पर्यटनास निघालेल्यांच्या समूहाने भर जंगलात एका वाघाच्या बछड्यालाच वेढा घालून त्याची वाट रोखली आणि जंगलाचा अनभिषिक्त राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या राजबिंड्या प्राण्यास शेपूट पाडून पळ काढावा लागला. ज्या जंगलात अशा प्राण्यांनी हक्काने निर्भयपणे वावरावे, तेथे माणसांच्या उन्मादी अतिरेकापुढे हार मानून या बछड्याने काढता पाय घेण्यासाठी अक्षरशः केविलवाणी धडपड केली आणि झुंडीच्या पर्यटनातून मिळालेल्या आसुरी आनंदाचे वाटेकरी होत जमावाने जल्लोष केला. गेल्या रविवारी संध्याकाळच्या वेळी या अभयारण्यातील छोटी मधू नावाच्या वाघिणीचा बछडा रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करत असताना रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या पर्यटकांच्या वाहनांतील गर्दी वाहनांतून रस्त्यावर उतरली आणि वाघासोबत सेल्फी घेण्याची चढाओढ सुरू झाली. ज्या नीरव जंगलात एरवी फक्त वन्यप्राण्यांच्या सांकेतिक संवादाचा आवाज घुमत असतो, तेथे पर्यटक नावाच्या मानवी झुंडींच्या कोलाहलाने हा वाघदेखील गुदमरून गेला. अखेर कसाबसा जीव मुठीत धरून त्याने रस्ता पार केल्यावर गर्दीने विकृत आनंदाचा उत्सव साजरा केला आणि हा आनंद एकमेकांत वाटून घेत गर्दी पुढच्या प्रवासास निघाली. शहरांतून जंगल पर्यटनासाठी आणि वन्यप्राण्यांना न्याहाळण्यासाठी, विशेषतः व्याघ्रदर्शनासाठी जंगलांतील मातीचे रस्ते पालथे घालणाऱ्या पर्यटक नावाच्या मनुष्यसमूहास असा समोर चालून आलेल्या व्याघ्रदर्शनामुळे आनंदाचा उन्माद अनावर झाला असावा. या घटनेनंतर वन्यजीवांच्या जीवनशैलीतील बदलाच्या शक्यता डोके वर काढतील आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होईल, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. तो वाघाचा बछडा होता आणि कदाचित त्याला आपल्या शक्तीचा आक्रमक वापर करता येतो याचा साक्षात्कार झाला नसावा, अन्यथा अशा उन्मादी अवस्थेतील जमावाला पांगविण्यासाठी त्याने जमावावर हल्ला केला असता, तर तेथे काय परिस्थिती उद्भवली असती याची कल्पना करणे फारसे अवघड नाही.

आता त्या गर्दीच्या अतिरेकी उन्मादाची चौकशी होईल, त्यांच्यावर कारवाईदेखील होईल, पण अशा तात्कालिक कारवाया सहजीवनाच्या संस्कृतीची शिकवण पुन्हा रुजविण्यासाठी पुरेशा ठरतील का, हादेखील प्रश्नच आहे. उन्मादी जमावांच्या मानसशास्त्राने समाजजीवनही अनेकदा असुरक्षित वाटू लागते. अशा काळात, अशा उन्मादाची उबळ मानवी वस्त्यांपलीकडच्या वन्यप्राण्यांना त्रासदायक ठरू लागली, तर त्याला आवर घालण्याचे आव्हान अधिक जटिल होऊ शकते. अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने आणि दाट जंगलांमध्ये होत असलेली पर्यटनाची वाढ ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची सामाजिक, आर्थिक घडामोड मानली जाते. निसर्गाच्या सान्निध्यात काही क्षण घालवण्याची ओढ, वन्यजीवांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याची उत्सुकता आणि 'इको-टुरिझम'च्या नावाखाली वाढणारी पर्यटकांची संख्या या सगळ्यांमुळे जंगलांचे स्वरूप बदलत आहे. मात्र या पर्यटनाच्या लाटेतूनच झुंडीने फिरणाऱ्या माणसांचा उन्माद व त्यातून निर्माण होणाऱ्या निसर्गासोबतच्या विसंवादाची एक चिंताजनक प्रवृत्ती डोके वर काढत आहे. वस्तुतः, जंगलांमध्ये माणसांच्या वस्तीचे आणि जमावाच्या झुंडीचे नियम चालत नाहीत. तेथे निसर्गाच्या नियमांचे पालन करावयाचे असते. पण प्रत्यक्षात अनेक अभयारण्यात वाहनांच्या लांबलचक रांगा, प्राण्यांच्या दर्शनासाठी होणारी चढाओढ, मोठ्याने ओरडणे, सेल्फीसाठी धोकादायक जवळीक साधण्याचे प्रयत्न असेच सर्व दृश्य सामान्य होत चालले आहे. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प किंवा जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान यांसारख्या प्रसिद्ध अभयारण्यात अशा प्रकारच्या घटना वारंवार घडताना दिसतात.

अशा उन्मादी वर्तनामागे केवळ व्यक्तीची असंवेदनशीलता कारणीभूत नसते. त्यामागे एक विशिष्ट मानसशास्त्र कार्यरत असते. झुंडीमध्ये असताना व्यक्तीची वैयक्तिक जबाबदारीची जाणीव कमी होते. सगळेच करत आहेत, मग आपणही तसेच करावे, हा विचार सहजपणे मनात घर करतो आणि एकटे असताना एखादी व्यक्ती जे वर्तन कधीच करणार नाही, तेच वर्तन तो समूहात सहज करतो. जंगलात हेच वर्तन अधिक धोकादायक ठरते, कारण ते केवळ माणसांसाठी नव्हे, तर वन्यजीवांसाठीही त्रासदायक असते. कारण, जंगल हे त्यांचे हक्काचे व सुरक्षित निवासस्थान असते. पर्यटनाच्या नावाखाली मानवी झुंडींचा वाढता गजबजाट मात्र त्यांच्या नैसर्गिक जीवनशैलीत व्यत्यय आणतो. मानवी कोलाहलामुळे प्राणी घाबरतात, त्यांच्या हालचालींचे मार्ग बदलतात, पाणवठ्यांपासून दूर राहू लागतात. काही वेळा तर प्राण्यांना माणसांच्या उपस्थितीपासून बचाव करण्यासाठी पळ काढावा लागतो. असा पळ काढण्याची वेळ जेव्हा त्यांच्यावर येते, तेव्हा त्या अनुभवाचा त्यांच्या जगण्याच्या प्रक्रियेवरच परिणाम होत असतो. अशा अनुभवाची भीती घर करून राहिली, की वन्यप्राण्यांच्या शिकारीच्या वेळा बदलतात, विश्रांतीच्या नेहमीच्या जागा सोडून अन्यत्र सुरक्षित जागांसाठी भरकटणे सुरू होते किंवा पिल्लांच्या सुरक्षिततेच्या भयाने त्यांची स्वभावशैलीच बदलू शकते.

अशा घटना वारंवार घडताना दिसू लागल्याने, मानवी संस्कृतीच्या आणि सहजीवनाच्या संस्काराचा ऱ्हास होत आहे का, असा प्रश्न साहजिकच समोर येणार आहे. अर्थात, याचे उत्तर सरळ होकारार्थी किंवा नकारार्थीही देता येणार नाही. एकीकडे आपण तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा, पर्यटनाच्या वाढीचा आणि आर्थिक संधींचा अभिमान बाळगतो; तर दुसरीकडे निसर्गाशी वागण्यातील असंवेदनशीलता वाढताना दिसते. सुमारे सहा वर्षांपूर्वी, डिसेंबर २०२० मध्ये असंवेदनशीलतेचे दर्शन घडविणारी अशीच एक घटना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत, पुणे शहराच्या मध्यवस्तीत घडली. त्या दिवशी सकाळी कोथरूड परिसराच्या महात्मा सोसायटीमध्ये एका झाडाखाली एक गवा शांतपणे उभा होता. ही बातमी पसरताच जंगलातून भरकटत गावात आलेला हा प्राणी पाहण्यासाठी लोकांची गर्दी सुरू झाली. लोकांनी त्यांचे फोटो काढले, काहींनी व्हिडीओदेखील 'शूट' केले आणि ते सोशल मीडियावर झळकविण्याची चढाओढ सुरू होताच गावात गवा आल्याची बातमी आणखी वेगाने पसरली. गर्दी वाढली आणि गलबला सुरू होताच गोंधळलेला हा प्राणी बिथरून पळत सुटला. गोंगाट करणारी गर्दी मागे आणि तो भेदरलेला गवा पुढे, असा लपंडाव बराच वेळ सुरू होता. लोकांची हल्लडबाजी वाढली आणि गव्याला पकडण्याचे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांचा प्रयत्न अपुरे ठरू लागले. जमावाने गव्याचा पाठलाग सुरू केला होता. भेदरलेला हा जीव सैरभैर होऊन पळत असताना त्याने एक उंच भिंतदेखील उडी मारून ओलांडली आणि दमछाक झाल्याने तो तिथेच बसला. पुन्हा त्याला पकडण्याचा प्रयत्न सुरू झाल्याने तो अधिकच बिथरला. संतापून त्याने शेजारच्या एका मोटारीस टक्कर मारली आणि त्यामुळे रक्तबंबाळ झालेला हा गवा पुन्हा सैरावैरा पळू लागला, अडथळ्यांना धडका देताना तो पुरता जखमी होऊन घायाळ झाला असतानाच त्याला पकडण्यात यश आले, पण उपचारांसाठी नेले जात असतानाच त्याचा अंत झाला. भीतीमुळे रक्तदाब वाढून त्याचा मृत्यू झाला असे त्यानंतर सांगण्यात येत होते. हादेखील उन्मादी गर्दीच्या अविवेकी आनंदाचाच बळी म्हणावा लागेल. सेल्फी आणि सोशल मीडियासाठी 'क्षण टिपण्याची' घाई, 'मी तिथे गेलो' हे दाखवण्याची स्पर्धा या प्रवृत्ती निसर्गाचा अनुभव घेण्यापेक्षा त्याचा उपभोग घेण्याकडे झुकतात आणि हीच प्रवृत्ती उन्मादाला खतपाणी घालते. कोथरूडमधील गर्दीच्या उन्मादाचा बळी ठरलेल्या या गव्याची प्रतिकृती उभारून काही संवेदनशील लोकांनी त्याची क्षमायाचना करणारे फलक पुण्याच्या काही भागांत लावले. जंगलातून भरकटत मानवी वस्तीत आल्याची मोठी शिक्षा त्या दिवशी, माणसांनी उभारलेल्या कॉंक्रीटच्या जंगलात हरवलेल्या त्या दुर्दैवी जीवाला भोगावी लागली.

अशा उन्मादातून मिळणारा आनंद कोणासाठी तरी जीवघेणा ठरू शकतो, हे कोथरूडमधील त्या घटनेनंतर सिद्ध झाले. 'आम्ही चुकलो, आम्ही तुझे अपराधी आहोत, आम्हाला क्षमा कर' असा पश्चात्ताप व्यक्त करणारे फलक त्यानंतर लागले, पण पश्चात्तापाची ही जाणीव होईपर्यंत एका जीवाचा बळी गेला होता. म्हणून, अशा घटना घडून गेल्यानंतर अपराधीपणाची भावना जागी होण्यापेक्षा, त्या क्षणी संवेदनशीलता जागी ठेवणे गरजेचे ठरते. काही वर्षांपूर्वी, केरळमध्ये एका गर्भवती हत्तीणीला स्फोटकांनी भरलेला अननस खावयास घालून ठार मारल्याची घटना देशभर खळबळ माजवून गेली होती. पोटातल्या पिल्लाचे पोषण व्हावे यासाठी अन्नाच्या शोधात जंगलातून मानवी वस्तीत शिरलेल्या या हत्तीणीला मिळालेला अननस खात असताना तोंडात झालेल्या स्फोटांच्या वेदना असह्य झाल्यामुळे ती सैरावैरा धावत सुटली आणि गावाबाहेर येऊन तिने तीन दिवस स्वतःस नदीच्या पात्रात बुडवून घेतले होते. या अमानुष मानसिकतेविरुद्ध तीव्र संताप व्यक्त झाला होता. पिके उद्ध्वस्त करणाऱ्या रानडुकरांना ठार मारण्यासाठी स्फोटके भरलेले अन्न खाऊ घालण्याचा प्रकार अनेक ठिकाणी पाहावयास मिळतो. त्यामुळे, काही प्राण्यांवर हेतुतः जीवघेणे प्रसंग लादले जातात, तर काही प्राणी केवळ उन्मादाच्या दबावामुळे जीव गमावतात. जमावाच्या मानसशास्त्रात संवेदनशीलतेला फारसे स्थान नसते. म्हणून, सामाजिक विवेकशक्ती जागी ठेवण्याचे संस्कार घडविण्याची गरज असते. त्यासाठी या परिस्थितीच्या दुसऱ्या बाजूला बळ देण्याची गरज आहे. पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता वाढत आहे, 'जबाबदार पर्यटन' ही संकल्पना रुजत आहे, स्थानिक समुदायांच्या सहभागातून निसर्गसंवर्धनाचे प्रयत्न होत आहेत. अनेक पर्यटक नियम पाळतात, शांततेने जंगल अनुभवतात आणि निसर्गाशी एकात्म होण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे संपूर्ण समाजावर आणि सहजीवनाच्या संस्कृतीवर सरसकट ऱ्हासाचा शिक्का मारणे योग्य ठरणार नाही. परंतु ज्या प्रवृत्ती निसर्गाशी संघर्ष निर्माण करतात, त्यांना वेळीच आवर घालणे अत्यावश्यक आहे. जंगल हे 'मनोरंजनाचे उद्यान' नसून एक सजीव परिसंस्था आहे, ही जाणीव पर्यटकांच्या मनात रुजवावी लागेल. आपण जंगलात 'प्रेक्षक' म्हणून जाणार आहोत की 'अतिक्रामक' म्हणून जाणार हे ठरविले पाहिजे. कारण अशा असंस्कृतपणामुळे प्राणी केवळ माणसापासून पळ काढतील एवढेच नव्हे, तर माणूस निसर्गापासून दूर जात राहील. जंगली प्राण्यांना माणसांच्या झुंडीपासून बचाव करण्यासाठी पळ काढावा लागणे हे नैसर्गिक संतुलन बिघडल्याने लक्षण म्हणता येईल. निसर्गशास्त्राच्या दृष्टीने ही मानवी उपद्रवकारी प्रवृत्ती ठरते. ज्या जंगलात प्राण्यांनी आश्वस्तपणे आणि सुरक्षिततेच्या भावनेने जगायचे, त्याच जंगलात प्राणी माणसांना घाबरू लागले किंवा जंगलात जाणारी माणसे जंगली प्राण्यांनाच हुल्लडबाजी करून हुसकावण्याचे प्रयोग करत राहिली, तर या दोन्ही स्थिती संतुलनाच्या दृष्टीने धोकादायक ठरतात. माणसांना घाबरून जंगलातून प्राण्यांनी पळ काढावा हा त्यांचा स्वभाव नसतो. तसे होऊ लागले, तर ते माणसाच्या वर्तनाचे प्रतिबिंब ठरते. त्यामुळेच, आपल्या शक्तीचा वापर वर्चस्व प्रस्थापित करून अकारण हुकूमत गाजविण्याकरिता करावयाचा की सहअस्तित्वाच्या आश्वस्त जाणिवांचा विश्वास प्राण्यांमध्ये रुजविण्याकरिता करावयाचा या टप्प्यावर मानवी संस्कृतीची कसोटी उभी ठाकली आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### भटकंती

परवा संध्याकाळी मी व माझा मित्र मधू फिरावयास निघालो होतो. उन्हाळा सुरू झालेला पण पुण्यात संध्याकाळी हवा छान असते.

कानावर दुरून येत असलेले भजनाचे शब्द पडत होते, "रघुपती राघव राजाराम...पतीत पावन सीताराम...." नेहमीच ऐकिवात असलेले शब्द " ईश्वर अल्ला तेरो नाम ..... " पुढील शब्द मित्राने उच्चारले. मी त्याला मध्येच थांबविले व भजनाचे मूळ शब्द सांगितले .."रघुपती राघव राजाराम, पतितपावन सीताराम, सुंदर माधव मेघश्याम, गंगा तुलसी शालिग्राम, भद्रगिरीश्वर सीताराम, भगत जनप्रिय सीताराम

जानकीरमणा सीताराम, जय जय राघव सीताराम."

साहजिकच चर्चेला विषय मिळाला. अरे आपण सध्या जे विषय घेऊन समोर जात आहोत त्यातला स्वबोध आणिक काही वेगळे असेल काय? खरेतर आपल्याला शिक्षणातून जे मूळ विचार मिळावयाचे त्यापासून वंचित ठेवले गेले. आणि म्हणूनच आपल्या संस्कृतीपासून दुरावत चालल्याचे दिसते.

अगदी प्रथम आपल्या आहाराचेच घेऊया ना. जसा आहार तसा विचार हा तर सिद्धांतच आहे. चार ठाव आहार असावा म्हणजे काय तर अन्न चार प्रकारचे असावे. (१) भोक्ष्य : दाताने चाऊन खाण्यायोग्य, भाकरी, पोळी, पुरी, पापड इत्यादी. (२) भोज्य : विशेष चावण्याची आवश्यकता नसते. मऊ भात, खिचडी, शिरा, वरण, इ. (३) लेह्य : मध, चटणी, पंचामृत इ. (४) चोष्य : चोखून खावयाचे आंबा, शेवगा, इ. फास्ट फूडच्या व आजच्या वेगवान जमान्यात कसे जमणार पण अन्न ताजे असावे, गरम असावे याबाबत निश्चित विचार व्हावा.

आहारासंबंधात सात्त्विक, राजस व तामस असे देखील प्रकार सांगितले आहेत. केवळ तामस आहारापासून आपण दूर राहू शकणार नाही का?

स्वबोध हा विचार केवळ आहारापुरता मर्यादित नाही हे तर अधिक व्यापक आहे परंतु सूर्यनारायण आम्हा दोघासही घरी परत जाण्याचे संकेत देत आहे तेव्हा तूर्तास येथे थांबावे व पुढील टप्प्यात अन्य विषयांचा परामर्श घ्यावा.

**संजय विष्णू वेलणकर**/पुणे ८९२८६५०००५

### भारताचे आर्थिक वर्ष २२ मार्चपासूनच सुरू व्हावे

भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्यावेळी अस्तित्वात असलेल्या विविध कालगणनांमधील दोष दूर करून संपूर्ण देशासाठी लागू होणारी व शास्त्रीय मानकांवर आधारित कालगणना निर्माण करण्यासाठी सरकारने नोव्हेंबर १९५१ मध्ये खगोलशास्त्रज्ञ डॉ. मेघनाथ साहा यांच्या अध्यक्षतेखाली दिनदर्शिका पुनर्रचना समिती स्थापन केली. त्या समितीने नोव्हेंबर १९५५ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. सरकारने तो मान्य केला. २२ मार्च १९५७ ला १ चैत्र शके १८७९ पासून ही राष्ट्रीय दिनदर्शिका अस्तित्वात आली. ज्याप्रमाणे आपला एक राष्ट्रध्वज, एक राष्ट्रगीत आणि इतर राष्ट्रीय मानचिन्हे आहेत, तेवढेच महत्त्व राष्ट्रीय दिनदर्शिकेला असून तिचे पालन हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

आपले केंद्र सरकार मात्र आर्थिक वर्ष, कोणतेही महत्त्व नसलेल्या एका साध्या दिवसापासून अर्थात १ एप्रिलपासून सुरू करते. त्याऐवजी फक्त ९ दिवस आधीच्या, जागतिक महत्त्वाच्या खगोल शास्त्रीय दिन, २२ मार्चपासूनच आर्थिक वर्ष सुरू करून राष्ट्रीयता सिद्ध करावी. पूर्वी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर हे वर्ष होते, ते जसे बदलले, तसेच पुन्हा बदलावे ही अपेक्षा आहे. ४ ऑक्टोबर १९५६ ला गृह मंत्रालयाने सर्व राज्य सरकारे, रिझर्व्ह बँक व सर्व विभाग यांना आदेश काढून या दिनदर्शिकेचा वापर आणि त्यातील तारखेनुसार काढलेले धनादेश यांचा आदर करण्याचे निर्देश दिले. प्रतिवर्षी २१ मार्च हा विषुवदिन अर्थात दिवस-रात्र समसमान असतात. दोन्ही गोलार्ध सूर्यापासून समान अंतरावर असतात. त्याच्या दुसऱ्या दिवसापासून म्हणजे २२ मार्च हा पहिला दिवस, चैत्र शुद्ध १, वसंत ऋतू सुरू.

२२ मार्च ते २० एप्रिल चैत्र महिना, सूर्य मेष राशीत व २१ एप्रिल ते २१ मे वैशाख महिना. सूर्य वृषभ राशीत असतो. या महिन्यांची वैदिक नावे, अनुक्रमे मधुमास, व माधव मास.

२३ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबर, आश्विन मास, सूर्य तुळा राशीत. २३ ऑक्टोबर ते २१ नोव्हेंबर, कार्तिक मास, सूर्यरास वृश्चिक, शरद ऋतूचा काळ. वैदिक नावे : ईश मास, उर्ज मास.

२२ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर, मार्गशीर्ष मास, सूर्य धनु राशीत, २२ डिसेंबर ते २० जानेवारी, सूर्य मकर राशीत, हेमंत ऋतूचा काळ, वैदिक नावे : सहमास, सहस्यमास.

२१ जानेवारी ते २० फेब्रुवारी, माघ मास, सूर्य रास कुंभ, शिशिर ऋतू सुरू. २० फेब्रुवारी ते २१ मार्च, फाल्गुन मास, सूर्य मीन राशीत, वैदिक नावे : तप मास, तपस्य मास.

याप्रमाणे दरवर्षी प्रत्येक महिना व प्रत्येक ऋतू त्याच तारखेला येतो. जर १३ ऑगस्ट १९५३ ही तुमची जन्मतारीख आहे तर राष्ट्रीय दिनदर्शिका हा दिवस २२ श्रावण १८७५ असा दाखवील. प्रत्येक वर्षी १३ ऑगस्ट ला राष्ट्रीय दिनांक २२ श्रावण हीच राहणार. सर्व ऋतू, महिने अगदी त्याच तारखेला येतात. लीप वर्ष २१ मार्चला सुरू होते आणि सर्व वैशिष्ट्ये कायम राहतात. आज इंग्रजी तारीख व ही दिनदर्शिका यांचे परावर्ती (चार्ट) तक्ते उपलब्ध आहेत. आपले आर्थिक वर्ष, नवीन हिंदू वर्ष, जैन वर्षारंभ हे सर्व २२ मार्चच्या आसपास फक्त १५ दिवसांच्या अंतरात फिरत असतात आणि हे प्रतिवर्षी होणार आहे. मग आजच्या खगोलीय महत्त्वाच्या पवित्र दिनी आपल्या देशाने मान्य केलेली शास्त्रीय आधारावरील राष्ट्रीय कालगणना स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

**ॲड. अविनाश तेलंग**/९४२००७४१२५

### स्वतःच्या हृदयातला राम शोधू या

आपण सारे त्या परमपिता परमेश्वराची लेकरं आहोत. परमेश्वराचाचं अंश आपल्यात सामावलेला आहे, त्यामुळे साक्षात प्रभू श्रीराम आपली काळजी वाहत आहेत.



सूक्ष्मपणे विचार केल्यास, भगवान विष्णूचे दहा अवतार प्रत्येक मानवात सूक्ष्मरूपात विराजमान असल्याचे आढळून येतील. संपूर्ण आयुष्यात माणूस कधीतरी भगवान विष्णूच्या दहा अवतारांपैकी कोणत्या तरी एका अवतारासारखा कधीतरी वागलेलाच असेल. भूतकाळात जाऊन आठवून बघा तुम्हाला खात्री पटेल.

या दहा अवतारांपैकी नेमका कोणता अवतार आपण स्वतःत शोधायला हवा जेणेकरून मानवी जीवनाचे सार्थक होईल व देवाला सुद्धा आपण चांगला माणूस या भूतलावर पाठविल्याचे समाधान प्राप्त होईल, तसेच इतरांना सुद्धा आपल्या जगण्याचा फायदा होईल. माझ्या मते मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीराम जर आपण स्वतःच्या हृदयात शोधला तर जीवनाचे सार्थक होईल व जगणं अधिक अर्थपूर्ण होईल. प्रयत्नांती जर का आपला राम आपल्याला गवसला तर आपलं संपूर्ण जीवन अंतर्बाह्य बदलून जाईल किंबहुना प्रत्यक्षात त्याची अनुभूती सुद्धा येईल. ज्या वेळेस आपला राम आपल्याला गवसेल त्यावेळेस आपलं वागणं, बोलणं, कर्माकडे बघण्याचा दृष्टिकोन व जगण्याची पद्धत बदललेली असेल.

सत्य वचन, धर्मरक्षण, धर्माचरण, मर्यादापालन, पितृ आज्ञापालन, बंधुभाव, परस्त्री मातेसमान, एक पत्नीव्रत, शांतता, संयम, करुणा, कृतज्ञता, त्याग, प्रेम, शौर्य आणि कर्तव्य पालण. हे मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्री रामरायाच्या अंगी असलेले दैवी गुण, जीवन जगत असताना आपल्याकडून इतरांना अनुभवायला मिळाले तर समजून जावं की आपल्यातला राम आपण शोधला आणि इतरांच्या हृदयातील राम प्रकट करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगी आहे.

आजच्या युगात राम कुठे आहे, हे शोधणे सहज शक्य आहे. त्याकरिता हृदयात करुणा आणि प्रेम हे भाव रोजच्या जगण्यात प्रकट व्हायला हवे.

वृद्ध माता-पित्यांसाठी श्रावण बाळ, मातृभुमीसाठी मातृभक्त, कर्तव्यासाठी कर्तव्यपालन, धर्मासाठी धर्माभिमान, हिंदू संस्कृतीसाठी संस्कृतिरक्षक आणि मानवतेसाठी एक संवेदनशील व नैतिक मूल्यांची जपणूक करणारा चांगला माणूस जेव्हा आपल्या हृदयात विराजमान होईल तेव्हाच आपला राम आपण शोधला असे म्हणता येईल. जगण्यात राम आणि धर्म असला की आपलं जगणं हे केवळ जिवंत राहणं न ठरता, तो एक आनंदी जीवनाचा सोहळा होईल.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती बडनेरा

### आभासी जगात हरवलेलं बालपण

काळाचा प्रवाह अथांग असतो हे जरी सत्य असलं, तरी मन मात्र आजही गावाकडच्या त्या विस्तीर्ण माळरानावर आणि शेणानं सारवलेल्या अंगणात रेंगाळत राहतं. आजची पिढी लॅपटॉप आणि मोबाईलच्या निळ्या प्रकाशात हरवलेली असताना, आमच्या पिढीचा तो मुक्त संचार आठवला की, स्मृतींचं आकाश नकळत भरून येतं. आम्ही ती भाग्यवान पाखरं होतो, ज्यांच्या बालपणाला 'इंटरनेट'चं कुंपण नव्हतं. आमचं विश्व चार भिंतींच्या चौकटीत कोंडलेलं नव्हतं, तर ते रणरणत्या मातीत आणि मोकळ्या आभाळाखाली स्वच्छंद झुलत होतं. शाळेची सुट्टी म्हणजे आमच्यासाठी आनंदाचं लेणं असायचं. परीक्षेचा शेवटचा पेपर संपला की दप्तराचं ओझं खुंटीला टांगून आम्ही जो जोमानं सुटायचो, तो थेट सुट्टी संपल्यावरच स्थिरावत असू. ऊन-वारा, तहान-भूक कशाचंच भान नसायचं. रखरखत्या उन्हातही आमचा उत्साह सदैव उधाणलेला असायचा. सुट्टी म्हणजे एक मुक्त आकाश होतं, जिथं पंख पसरून मनसोक्त विहारायचो. लहानपण म्हणजे जणू आनंदाची एक सुंदर पहाट होती. सकाळच्या कोवळ्या उन्हात सुरू झालेला विटी-दांडूचा खेळ दुपारपर्यंत रंगायचा. एकावर एक रचलेली सात दगडांची लगोरी चेंडूनं फोडून ती पुन्हा रचण्यातला थरार शब्दांत पकडता येणार नाही. सायकलचं जुनं चाक काठीने पळवत गावभर हुंदडताना राजेशाही भास व्हायचा. लाकडी भोवऱ्याला सुतळीची पिळदार साथ देऊन जमिनीवर एखाद्या नर्तकासारखं फिरवताना मिळणारा आनंद गगनात मावेनासा व्हायचा. उन्हाचा तडाखा वाढला की पावलं वडाच्या शीतल छायेकडे वळायची. 'सूरपारंब्या' खेळताना आम्ही साक्षात वानरसेनाच व्हायचो. पारंब्यांना लटकून मारलेली ती धाडसी झेप आजच्या साहसी खेळांनाही फिकी पाडणारी होती. सावलीत बसून चिमुकल्या हातांनी मांडलेला भातुकलीचा संसार, रंगलेला पत्त्यांचा डाव आणि सागरगोट्यांचा मंजुळ नाद आजही कानात गुंजतो. उन्हाच्या झळा असह्य झाल्या की, विहिरीच्या संथ निळ्या पाण्यात मारलेली 'धपकन' उडी देहाबरोबरच मनालाही तृप्त करून जायची. रात्री चांदण्यांच्या साक्षीनं अंगणात रंगणाऱ्या भेंड्या आणि शब्दकोड्यांच्या खेळात ती रात्र कधी संपूच नये, असं वाटायचं. 'शिवणापाणी' आणि 'विषामृत' खेळताना मिळालेलं 'जीवदान' अन् 'जोडसाखळी'त एकमेकांचे हात घट्ट धरून धावताना विणलेली अतूट 'मैत्री' आजही हवीहवीशी वाटते. 'कच्चा लिंबू' म्हणून लहानग्यांना मायेनं सामावून घेण्याची ती निखळ वृत्ती आजच्या या स्पर्धेच्या युगात कुठंच दिसत नाही. या खेळांनी आम्हाला केवळ क्षणिक आनंद दिला नाही, तर शब्दांची, नात्यांची आणि अनुभवांची समृद्ध शिदोरी दिली. 'पगा-दुगा-तिगा' किंवा 'अबक-दुबक-तिबक' हे शब्द आजच्या पिढीला परक्या भाषेतील वाटतील; पण ती आमची सांकेतिक भाषा होती. या शब्दांच्या खेळातूनच आमची मैत्री अधिक घट्ट झाली आणि भाषेला खऱ्या अर्थानं मातीचा गंध लाभला. आजच्या या सिमेंटच्या जंगलात ती निरागस पाखरं कुठंतरी हरवून गेली आहेत. शहरातल्या गल्ल्यांमध्ये मुलांचा तो किलबिलाट आता ऐकू येत नाही. लगोरीचे दगड आता विखुरलेले दिसतात आणि विटी-दांडू कुठंतरी अडगळीत धूळ खात पडले आहेत. खिशातल्या गोट्यांची ती 'श्रीमंती' डिजिटल कॉईन्समध्ये बदलली आहे. पण त्या मातीशी जोडलेल्या नात्यात जो ओलावा होता, तो या आभासी जगात कुठंच दिसत नाही.

**मंगेश मुरलीधर दौंडकर**/पुणे, ९८९०६१९३५४

### चांदवडचे जागृत रेणुका माता मंदिर



नाशिक जिल्ह्यातील चांदवड गावात गडावर वसलेल्या रेणुका मातेची महती संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पसरलेली आहे. मुंबई-आग्रा महामार्गावर चांदवड शहरात रेणुका मातेचे हे प्रसिद्ध स्वयंभू, जागृत व प्राचीन मंदिर आहे. हे मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे सांगितले जाते. मंदिर परिसराच्या आत गेल्यावर समोरच्या प्रशस्त मोकळ्या जागेत उंचच उंच दोन भव्य दगडी दीपमाळा आपल्याला आकर्षित करतात. मंदिराचा परिसर खूपच प्रसन्न वाटतो. मंदिर परिसरातील वाहन तळाच्या बाजूने प्रवेश केल्यास पायऱ्या नसल्याने वृद्ध व्यक्ती सुद्धा पायी चालून सहजतेने मंदिरातील रेणुका मातेचे दर्शन घेऊ शकतात. पूर्वी चांदवड शहरात अहिल्याबाई होळकर यांच्याकडून रेणुका मातेच्या पूजा विधीचे सोपस्कार पार पाडले जात असत. त्यानंतर अनेक वर्ष होळकर घराणे हे काम पाहत होते. मात्र सद्यस्थितीत रेणुका माता मंदिराचे कामकाज ट्रस्टच्या माध्यमातून चालते. नवरात्रोत्सवाच्या काळात देवीला आभूषणांनी सजविले जाते. देवीचा मुखवटा सोन्याचा आहे. नवरात्रीत प्रत्येक दिवशी सकाळी एक पालखी रंगमहालातून निघते. त्या पालखीत देवीचा मुखवटा व दागदागिने असतात. ही पालखी डोंगरातील देवीच्या मंदिरात जाते. दिवसभर देवीचा सोन्याचा मुखवटा व दागदागिने मंदिरात देवीच्या अंगावर असतात. रात्री आठ वाजता ही पालखी पुन्हा रंगमहालात परत आणण्यात येते.

गेल्या अनेक वर्षांपासून या मंदिराची देखभाल करण्याचे काम ट्रस्टचे विश्वस्त मंडळ करीत आहे. या परिसरात भक्तनिवास, विश्रामगृह, प्रसाधनगृह तसेच वाहनतळ आहे. संपूर्ण मंदिर परिसरात सिमेंटचे रस्ते करण्यात आल्याने सगळीकडे स्वच्छता जाणवते. त्यामुळे या परिसराला एक वेगळेच सौंदर्य प्राप्त झाले आहे.

अशी आहे आख्यायिका : रेणुका माता ही महर्षी जमदग्नी ऋषींची पत्नी. परशुराम हे जमदग्नी ऋषी आणि रेणुका मातेचे पुत्र. रेणुका माता एकदा नेहमीप्रमाणे नदीवर पाणी आणायला गेली असता त्यांना घरी येण्यास उशीर झाला. रेणुका मातेच्या घरी उशिरा येण्याचे कारण लक्षात येताच जमदग्नी ऋषी अत्यंत रागावले. रागाच्या भरातच रेणुका मातेचे मस्तक धडावेगळे करण्याची आज्ञा त्यांनी पुत्र परशुरामाला दिली. वडिलांच्या तोंडून शब्द निघताच परशुरामाने आपल्या मातेचे मस्तक धडावेगळे केले. रेणुका मातेचे मस्तक तिथून जे उडाले ते चांदवडला सध्या जिथे देवीचे मंदिर आहे तिथे येऊन पडले आणि धड माहूर येथेच राहिले. तेव्हापासून माहूर आणि चांदवड येथे रेणुका मातेच्या मंदिरांची स्थापना झाली आहे.

नाशिक शहरापासून चांदवड हे गाव मुंबई-आग्रा महामार्गावर असून एकूण अंतर ६७ किलोमीटर आहे. जाण्यासाठी एसटी बससेवा, खाजगी वाहने उपलब्ध असून स्वतःच्या वाहनाने सलग प्रवास केल्यास मंदिरात पोहोचायला एक ते दीड तास लागतो. चांगल्या दर्जाचे चौपदरी रस्ते, पेट्रोल पंप, आजूबाजूचे निसर्गरम्य वातावरण, प्रत्येक पाच दहा किलोमीटर अंतरावर भरपूर हॉटेल्स आणि रेस्टॉरंट आहेत. उसाचा ताजा रस, गरम चहा, नाश्ता, भोजन स्वस्त दरात मिळत असल्याने प्रवास आर्थिकदृष्ट्या देखील परवडणारा, सुखावह आणि आनंददायी वाटतो.

**प्रमोद तिजारे**/८७६७१७७०८९

### पश्चिम आशियातील युद्ध, राजकारण आणि इतिहास

इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यातील युद्धाचे मुख्य कारण भू-राजकीय वर्चस्व, मध्यपूर्वेतील प्रदेशावर ताबा मिळविण्याची स्पर्धा, भांडवलासाठी पाश्चिमात्यांचे डावपेच आणि अण्वस्त्र क्षमतेवरून निर्माण झालेला संघर्ष हे आहे. इराणने इस्रायली हितसंबंधांवर हल्ले करणे आणि अमेरिकन तळांना लक्ष्य करणे यामुळे हा संघर्ष अधिकच तीव्र झाला आहे. सध्याच्या युद्धाची प्रमुख कारणे लक्षात घेतली तर ती खालीलप्रमाणे असावीत तसेच अमेरिका युद्धांमधील सहभागाची प्रमुख कारणे...

भू-राजकीय वर्चस्व आणि प्रदेशावरील संघर्ष : इस्रायल आणि इराण यांच्यात मध्यपूर्वेतील देशांवर आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी दीर्घकाळापासून संघर्ष सुरू आहे.

आर्थिक हितसंबंध आणि तेल : इराणसारख्या देशांच्या तेलाच्या खाणींवर आणि कच्च्या तेलाच्या व्यापारावर नियंत्रण मिळविण्यासाठी किंवा तो विस्कळीत करण्यासाठी अमेरिका युद्धात सहभागी आहे; जेणेकरून अमेरिकेचा जागतिक बाजारावर प्रभाव कायम राहील. मध्यपूर्वेसारख्या महत्त्वाच्या भागात अमेरिका स्वतःचे लष्करी वर्चस्व राखण्यासाठी आणि इराणसारख्या प्रतिस्पर्ध्यांना कमकुवत करण्यासाठी युद्धात प्रामुख्याने भूमिका बजावत आहे.

अण्वस्त्र सज्जता : इस्रायलचा असा आरोप आहे की, इराण अण्वस्त्रे मिळविण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यामुळे त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे

लष्करी ताकद आणि शस्त्रविक्री : अमेरिकन शस्त्रास्त्रांचा वापर करणे आणि संरक्षण उद्योगाला चालना देणे, ज्यामध्ये दर आठवड्याला हजारो कोटींचा खर्च होत असतो. अमेरिकेचे मित्र राष्ट्र असलेल्या अरब देशांवर इराणने घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे हा संघर्ष वाढला आहे, ज्यात अमेरिकन सैन्याच्या तळांनाही लक्ष्य केले जात आहे. इराणच्या धोरणांमुळे अमेरिका-इराण संघर्ष गुंतागुंतीचा झालेला आहे. इराणने इस्रायलवर गाझामध्ये नरसंहार केल्याचा आरोप केला आहे, या गाझा संघर्षामुळे दोन्ही देशांतील तणाव शिगेला पोहोचला आहे. पाश्चात्त्य देशाची धोरणे पूर्णपणे आदर्शवादी नव्हती. तर इराक, अफगाणिस्तान आणि व्हिएतनामसारख्या देशांमधील ऐतिहासिक संघर्षांप्रमाणे, आतंकवादविरोधी किंवा लोकशाही स्थापन करण्याच्या नावाखाली इतर देशांच्या अंतर्गत बाबींमध्ये अमेरिकेने धोरणात्मक हस्तक्षेप करणे.

अमेरिकन नागरिक आणि राजनयिकांचे संरक्षण करणे आणि सुरक्षा धोरणानुसार धोक्यांना परदेशातच रोखणे. तेल बाजारातील अस्थिरता, आर्थिक धोरण, निर्बंध यामुळे इराणची अर्थव्यवस्था अनुकूल नाही. तेल बाजारातील नियंत्रण हेच या युद्धामागील कारण आहे आणि या युद्धामुळे जागतिक महागाईचा दर झपाट्याने वाढू शकतो.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



महत्वाचे...



## बार कौन्सिल पंचवार्षिक निवडणुकीच्या अनुषंगाने संवाद कार्यक्रम

**सोलापूर, दि.२१ मार्च-**
बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर बार असोसिएशनतर्फे उमेदवारांना आपले विचार, भूमिका आणि भावी धोरणे मांडण्यासाठी विशेष मनोगत व संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येत्या दि. २४ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सोलापूर बार असोसिएशन हॉल येथे संपन्न झाला. कार्यक्रमासाठी सोलापूर बार असोसिएशनचे सभासद असलेले उमेदवार बारचे माजी उपाध्यक्ष ॲड. असीम बांगी, बारचे माजी अध्यक्ष ॲड. संतोष न्हावकर, विद्यमान जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग रजपूत, माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. हेमा शिंदे तसेच बार कौन्सिलचे विद्यमान सदस्य ॲड. मिलिंद थोबडे यांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. बारचे अध्यक्ष ॲड. बाबासाहेब जाधव यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन बारचे सचिव ॲड. बसवराज हिंगमिरे यांनी केले. आभार बारचे उपाध्यक्ष ॲड. रियाज शेख यांनी मानले.



## डोंबरजवळगे येथील काँग्रेस कार्यालयात तोडफोड करणाऱ्यांवर कारवाई करा

**सोलापूर, दि. २१ मार्च-**
अक्कलकोट तालुक्यातील डोबर जवळगे या गावातील अर्शदीप गायकवाड अक्कलकोट तालुका काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व काँग्रेसचे पदाधिकारी यांच्या कार्यालयाची तोडफोड करून खुर्च्या व पोस्टर फोडण्यात आले आहे. ही बातमी समजताच सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी घटनास्थळी भेट देऊन काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या समवेत चर्चा केली. आणि अक्कलकोट उत्तरचे तालुक्याचे पोलीस निरीक्षक दिपक भिंताडे यांच्याशी चर्चा करून वरील कृत्य करणाऱ्या समाजकंटकाला शोधून काढून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. यावेळी उपसरपंच शिवलाल नारायण, श्रीशैल पाटील, स्वप्निल हदलोरे, पांडुरंग नारायणकर, रामू माळगे, अविनाश नारायणकर, सतीश होदलूरे, दादा पाटील उपस्थित होते.

## वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २१ मार्च-**
सोलापूर- पुणे हायवे, बाळे येथून दि. १४ मार्च रोजी कल्याणी प्रवीण नाईक वय ३४, रा. खंडोबा चौक, छल्लारे कास चौक, जि. अहमदनगर यांचे पती प्रवीण नाईक हे त्यांच्या मोटरसायकल क्र. एम एच ३० व्ही २९०१ या गाडीवरून जात असताना अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हायगईने, भरधाववेगाने, निष्काळजीपनाणे चालवून प्रवीण नाईक यांना जोराची धडक दिली. त्यात कपाळाला, छातीला व सर्वांगास मुकामार होऊन जखमी झाले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. यात कारणीभूत ठरल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दि. २० मार्च रोजी अज्ञात वाहन चालका विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पाटील करत आहेत.

## वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**सोलापूर, दि. २१ मार्च-**
जुना तुळजापूर नाका येथून दि. २० मार्च रोजी चोलाराम सादाराम पटेल वय ३५, रा. चाटे गल्ली, बाळीवेस सोलापूर व त्यांची पत्नी कुसुम पटेल या त्यांची दुचाकी क्रमांक एम एच १३ ए व्ही ०३४१ या वाहनावरून बळकोटे नगर, सोलापूर येथे कामाकरिता जात असताना राहुल अंबादास जाधव वय ४० रा. गुळवंची सोलापूर याने त्यांच्या ताब्यातील वाहन क्रमांक एम एच १३ ईपी ०७२५ हे वाहन अतिवेगाने हयगईने, बेदरकारपणे चालवून चोलाराम पटेल यांच्या वाहनाला उजव्या बाजूने जोराची धडक दिली. त्यात त्यांची पत्नी कुसुम पटेल या खाली पडल्या व त्यांच्या उजव्या पायाच्या खोब्यावरून डंपरचे मागील चाक गेले. त्यात त्यांना गंभीर दुखापत झाली व त्यांचा मृत्यू झाला. याबाबत जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दि. २० मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास बामणे करत आहेत.

## गर्दीचा फायदा घेत आयफोन चोरला

**सोलापूर, दि. २१ मार्च-**
भाजी मंडे मध्ये बाजी आणण्याकरिता दि. १ मार्च रोजी अशोक कुमार मिठालाल वय ५३, रा. प्लॉट नंबर ५०१ कृष्णविहार, आपारमेंट, सम्राट चौक सोलापूर यांची पत्नी ही बाळीवेस येथे गेली असता भाजी घेताना गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने पांढऱ्या रंगाचा ४० हजार रुपयांचा आयफोन चोरून नेला आहे. याबाबत जुडभावी पेठ पोलीस ठाण्यात दि. २० मार्च रोजी अज्ञाता चोरट्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास शिवशरण करत आहेत.

Classifieds

**विकणे आहे**

**2325 स्क्वे. फुट, गंगा नगर येथे, NA, क्लिअर टायटल, खुला प्लॉट विकणे आहे. जुना देगाव नाका, मंगळवेढा रोडटच, CNS हॉस्पिटलजवळ, सोलापूर-1, मो. 8975744539**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

# महापौर कोंड्याल यांचा 'चौकार-षटकार' डाव

## ५२ विषयांना एकमताने मॅरेथॉन मंजुरी, प्रशासकीय पकड मजबूत, गोंधळावर ब्रेक, विकासाला गती

### पहिल्याच सभेत महापौरांचा करारी खेळ; विरोधक 'बॅकफूट'वर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च-**
सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापौर विनायक कोंड्याल यांनी दाखविलेल्या धडाकेबाज नेतृत्वामुळे संपूर्ण सभागृहात शिस्त, समन्वय आणि निर्णयक्षमतेचा अनोखा संगम पाहायला मिळाला. 'चौकार-षटकार' शैलीत सभा चालवत त्यांनी तब्बल ५२ विषयांना एकमताने मंजुरी मिळवून एकप्रकारे विक्रमच घडविला.

एक धुरंदर महापौर म्हणून विनायक कोंड्याल यांची चर्चा होत आहे.

मागील सभेतील गोंधळाच्या पार्श्वभूमीवर या वेळी महापौरांनी सुरुवातीलाच कडक भूमिका घेत सभागृहाची शिस्त अबाधित ठेवण्याचा स्पष्ट इशारा दिला. सभागृहात शिस्त आणि शांतता राखा अन्यथा संबंधितांना सभा सभागृहाबाहेर काढले जाईल अशी तंबीच महापौरांनी दिली. या ठाम भूमिकेचा परिणाम असा झाला की, संपूर्ण सभा शांत, संयमी आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. प्रत्येक नगरसेवकाला आपले मत मांडण्याची समान संधी देत कोंड्याल यांनी लोकशाही मूल्यांचे उत्तम उदाहरण घालून दिले.सभेत पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि नागरी सुविधा



अशा विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. विशेष म्हणजे, सर्व ५२ विषयांना एकमताने मंजुरी मिळाल्यामुळे शहर विकासाच्या दृष्टीने ही सभा ऐतिहासिक ठरली आहे.

विरोधकांनी मांडलेल्या 'शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे कर सवलत योजना' विषयावर सत्ताधाऱ्यांनी ठोस माहिती मांडत ही योजना २०१९ पासून लागू असल्याचे स्पष्ट केले. लिंगायत स्मशानभूमीच्या जागेच्या विषयातही कोंड्याल यांनी समन्वयाचा आदर्श दाखवत श्री सिद्धरामेश्वर देवस्थान आणि होटगी ब्रह्मठ मठ यांच्यात संतुलित निर्णय घेतला. समाजहिताला प्राधान्य देत या विषयात राजकारण करू नये असा स्पष्ट संदेशही त्यांनी सभागृहाला दिला. याशिवाय, महापालिकेच्या शाळांच्या सुरक्षेसाठी संरक्षक भिंती उभारण्याचा निर्णय, नगरोत्थान योजनेअंतर्गत कोट्यवधींच्या रस्ते कामांना मंजुरी, तसेच नगरसेवकांना प्रशासनाशी समन्वय साधण्यासाठी ओळख बिल्ला देण्याचा निर्णय हे या सभेतील ठळक निर्णय ठरले.सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेविका रोहिणी तडवळकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते यांच्यासह सत्ताधारी नगरसेवकांनीही महापौरांना भक्कम साथ दिल्यामुळे सर्व निर्णय वेगाने आणि एकमताने पार पडले. या सभेत महापौर विनायक कोंड्याल यांनी दाखविलेली प्रशासकीय पकड, समन्वय कौशल्य आणि निर्णयक्षमता यामुळे सोलापूर महानगरपालिकेच्या कामकाजाला नवी दिशा मिळाल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. 'गोंधळातून शिस्तीकडे' आणि 'वादातून विकासाकडे' नेणारी ही सभा कोंड्याल यांच्या नेतृत्वाची प्रभावी छाप उमटवून गेली. एक धुरंदर महापौर म्हणून त्यांची चर्चा होत आहे.

## विवाहितेचा छळ; तिघांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**
सासरी नांदत असताना डिसेंबर २०२३ ते नोव्हेंबर २०२५ पर्यंत शिवानी गणेश काळे वय २५, रा. से.फ्रि. कॉलनी नंबर एक सोलापूर हीला नागेश पती, संजय सासरे, नंदा सासू सर्व रा. मु.पो. मोहोळ क्रांतीनगर जिल्हा सोलापूर यांनी शिवानी हिला मारहाण करणे, शिवीगाळ करणे, उपाशी ठेवणे, घराच्या बाहेर जाऊ न देणे. माहेरहून एक लाख रुपये घेऊन ये म्हणून तिला वारंवार त्रास दिला आहे. शिवानीच्या माहेरची परिस्थिती नसल्याचे सांगितल्यावर देखील तिला दोन दिवस जेवण न देऊन, मानसिक - शारीरिक त्रास देऊन पती, सासरे, सासू यांनी शिवानीचा लहान मुलगा हिसकावून घेऊन तिला घराबाहेर हाकलून दिले आहे. याबाबत सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दि. २० मार्च रोजी तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास चौधरी करत आहेत.

## महिला घराचे घरपण आणि कुटुंबव्यवस्थेचा आधारस्तंभ : बिराजदार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २१ मार्च-**
आजच्या स्पर्धेच्या युगात महिला सर्वच क्षेत्रात कार्यरत आहेत. एक मुलगी शिकली तर घराला घरपण येईल म्हणून मुलीला शिक्षण द्या असे विचार वीरशैव ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने जागतिक महिलादिनानिमित्त आयोजित केलेल्या सत्तर वर्षांवरील वीरशैव महिला व नूतन निर्वाचित वीरशैव नगरसेविकांचा गौरव समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना बिराजदार रूग्णालयाचे सीईओ जयश्री बिराजदार यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय वीरशैव महासभेच्या अध्यक्षा समाजभूषण उमादेवी धर्मराज काडादी यांच्या अध्यक्षेतखाली लिंगशेट्टी मंगल कार्यालयात संपन्न झाले. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थाध्यक्ष



निलकंठप्पा कोनापूरे, कार्याध्यक्ष राजेंद्र मायनाळ, सचिव बाबासाहेब कुलकर्णी, सहसचिव शेखर लक्ष्मेश्वर, पुष्पा गुंगे उपस्थित होते.

सुशिला वाकळे यांच्या भक्तीगीतानंतर आराध्यदैवत श्री शिवयोगी सिध्दरामांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवर अतिथी, अध्यक्षांनी दीपप्रज्वलन करून अभिवादन केले. संस्थाध्यक्ष निलकंठप्पा कोनापूरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून संस्थेच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अतिथी व अध्यक्षांचे परिचय शेखर लक्ष्मेश्वर यांनी केले. बिराजदार यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करून ११ हजारांची देणगी दिली.

नंतर सत्तरी पर केलेल्या ६० हून अधिक महिला व नवनिर्वाचित वीरशैव नगरसेविकांचे भेटवस्तू व गुलाबपुष्प देऊन सत्कार केला.

त्यात ९० वर्षाच्या शांता माणिकशेट्टी, ८८ वर्षाच्या शशिरेखा लुपणे, सुमन कनाळे -सावित्री फताटे, ८७ वर्षांच्या शांता मरगुर, रतन अब्दुलपूरकर, श्रीदेवी सांडुरे, ललिता थोबडे, यांचे काडादी, बिराजदार यांचे कौतुक केले. नगरसेविका मंदाकिनी तोडकरी यांनी सत्काराला उत्तर दिले. यादी वाचन पुष्पा गुंगे यांनी केले. सूत्रसंचालन सपना पाटील यांनी केले. प्रमिला नंदगावकर आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंगला कोनापूरे, मल्लिकार्जुन निराळे, नागनाथ लिगाडे, सचिन सोळसे, बाबुराव पटणे, छाया वाले यांनी योगदान केले.

# महामार्गावर थाटण्यात आली थंड पेयांची दुकाने

### मठ्ठा-ताकाची वाढली विक्री; उन्हाचा वाढता प्रकोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**
सोलापूर शहरात मार्चच्या मध्यापासूनच उष्णतेचा तीव्र प्रकोप जाणवू लागला असून तापमान ४० अंशांच्या दिशेने झेपावत आहे. वाढत्या उकाड्याच्या पार्श्वभूमीवर विजयपूर मार्गावरील हत्तूर ते सैफुलपर्यंतच्या रस्त्यावर मठ्ठा, ताक तसेच उसाच्या रसाच्या विक्रीला चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.

रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांच्या सावलीत अनेक विक्रेते थंड पेयांचे स्टॉल लावून बसले असून प्रवासी व नागरिक या पारंपरिक पेयांचा आस्वाद घेत उन्हापासून दिलासा मिळवत आहेत.




विशेषतः दुचाकीस्वार व बाहेरून येणारे नागरिक या ठिकाणी थांबून ताक व मठ्ठा पिणे पसंत करत आहेत.

यंदा फेब्रुवारीच्या मध्यापासूनच उष्णतेची तीव्रता वाढलेली असून सकाळी दहापासूनच उन्हाचा तडाखा जाणवतो. ग्रामीण भागातील नागरिक विविध कामानिमित्त शहरात येत असल्याने या मार्गावरील थंड पेयांच्या स्टॉलना अधिक मागणी वाढली आहे. साधा व मसाला मठ्ठा, ताक, लस्सी तसेच उसाचा रस असे विविध पर्याय येथे उपलब्ध आहेत.

> दिवसभरात सुमारे १५० लिटर मठ्ठा व ताकाची विक्री होते. उन्हाच्या तडाख्यात ग्राहकांना थंड व पौष्टिक पेय देताना समाधान मिळते. या निमित्ताने आम्हाला रोजगारही मिळतो. नागरिकांनी दुग्धजन्य पेयांना प्राधान्य द्यावे.
>
> **- शिवा वाले, ताक विक्रेता (करजगी)**

मंद्रूप, भंडारकवठे, टाकळी, धुळखेड तसेच कर्नाटकातील काही भागातून येणारे प्रवासीही या ठिकाणी थांबून थंड पेयांचा आस्वाद घेताना दिसतात. दरम्यान, मठ्ठा व ताक विक्रीमुळे ग्रामीण भागातील काही युवकांना ३ ते ४ महिन्यांचा रोजगार उपलब्ध झाला आहे. बाटलीबंद थंड पेयांपेक्षा पारंपरिक व आरोग्यदायी पेयांना नागरिकांची अधिक पसंती मिळत असल्याचे चित्र आहे.

## यात्रेसाठी जात असताना ट्रकने दिली धडक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**
सोलापूर ते विजापूर हायवे रोडने दि. १९ मार्च रोजी गणेश सिंग, मनोज सिंग मनसावाले वय २०, रा. घर नंबर १४४ लोधी गल्ली, लष्कर सोलापूर व त्यांचे नातेवाईक हे दारासिंग राज्य कर्नाटक येथे यात्रेकरिता जात असताना हत्तुर गावच्या पुढे समोरून ट्रक क्रमांक के इ ५१ एजे ४३९० चा चालक याने त्याच्या ताब्यातील ट्रक हयगईने, निष्काळजीपणे चालवून मनसावाले यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. त्यात उजव्या हात - पायास व डोक्यास गंभीर दुखापत झाली. नातेवाईक वंशिका यांच्या डोक्यास व उजव्या पायास गंभीर दुखापत झाली आहे. याबाबत विजापूर नका पोलीस ठाण्यात दि. २० मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास घुगे करत आहेत.

## ट्रकच्या धडकेत एकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २१ मार्च-**
ट्रकमध्ये कांद्याची पोती भरून ताडपत्री टाकून रस्सीने बांधताना दि. १३ मार्च रोजी यशोदा राजू क्षीरसागर वय ४९, रा. १३३ शांतीसागर, मार्केट यार्ड सोलापूर यांचा मुलगा दीपक राजू क्षीरसागर याला एक चित्रवेल्लू या ट्रक क्र. टीएन ५२ ए ए ४०८१ चा चालक वय ४९, रा. इंदिरानगर मनालमेडु पोपड मैलाडयुराई तमिळनाडू याने कोणताही इशारा न देता ट्रक रिव्हर्स मध्ये पाठीमागे घेत असताना अचानक दीपक क्षीरसागर याला ट्रकचा धक्का लागला. तो डोक्यावर पडून, त्याला डोक्याला गंभीर दुखापत झाली व त्यात त्याचा मृत्यू झाला. याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात दि. २० मार्च रोजी आरोपी विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास मस्के करत आहेत.

## फळबाग योजनेसाठी चार हजार ३५६ शेतकऱ्यांचे प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**
राज्य सरकारच्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेसाठी सोलापूर जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, उपलब्ध निधीपेक्षा जास्त मागणी नोंदविण्यात आली आहे. राज्यस्तरावर सर्वसाधारण प्रवर्गासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असताना, सोलापूर जिल्ह्यातून तब्बल १२ कोटी ९९ लाख ८८ हजार रुपयांची मागणी प्रस्तावित करण्यात आली आहे.

दरम्यान, २० मार्चअखेर जिल्ह्यातील एकूण ४ हजार ३५६ लाभार्थ्यांचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गातील ४ हजार २५३ लाभार्थ्यांसाठीच १२ कोटी ७७ लाख रुपयांची आवश्यकता भासणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातील ९८ लाभार्थ्यांसाठी २० लाख ८३ हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीही स्वतंत्र निधीची गरज व्यक्त करण्यात आली आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत (मनरेगा) पात्र न ठरणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारकडून भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना राबवली जाते. २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी या योजनेसाठी एकूण १०४ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

फलोत्पादन संचालकांच्या प्रस्तावानुसार सर्वसाधारण प्रवर्गासाठी १० कोटी रुपयांच्या निधीचे वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, या निधीतून प्रथम २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षांतील प्रलंबित अनुदानाचे वाटप केले जाणार असून, त्यानंतर चालू वर्षातील लाभार्थ्यांना अनुदान दिले जाणार आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सध्याची मागणी लक्षात घेता निधी अपुरा पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पर्यावरण रक्षण लोकचळवळ व्हावी : डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च -**
पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबवण्यासाठी नागरिकांनी केवळ घोषणा न देता प्रत्यक्ष कृतीवर भर देणे आवश्यक आहे. विशेषतः ३ठ (ठशर्वीलश, ठशलूलश्रश, ठशींीश) या संकल्पनेचा अवलंब करून प्लास्टिकचा वापर पूर्णपणे टाळल्यास आपण निसर्गाचे रक्षण करू शकतो, त्यासाठी पर्यावरण रक्षण लोकचळवळ व्हावी, अशी अपेक्षा सेवानिवृत्त आयएएस तथा यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

जागतिक वन दिनानिमित्त युगंधर फाउंडेशन, सोलापूरच्या वतीने आयोजित 'युगंधर नवरत्न पुरस्कार' वितरण सोहळ्यात अध्यक्षीय स्थानावरून ते बोलत होते. लोकमान्य टिळक सभागृहात संपन्न झालेल्या या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील नऊ रत्नांचा सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. कलशेट्टी यांनी सिंगल युज प्लास्टिकला कडाडून विरोध करण्याचे आवाहन करत पर्यावरण संवर्धनासाठी लोकचळवळीची गरज व्यक्त केली.

### युगंधर फौंडेशनच्या नवरत्न पुरस्कारांचे थाटात वितरण



> **युगंधर नवरत्न पुरस्काराचे मानकरी**
>
> पर्यावरण - संतोष धाकपाडे, कला-सचिन जगताप, आरोग्य - डॉ. व्यंकटेश मेतन, पत्रकारिता- विजय गायकवाड, शिक्षण- प्रा. डॉ. युवराज सुरवसे, उद्योग- सविता जुजगार, महिला व बालकल्याण-ॲड. सरिता मोकाशी, कृषी- डॉ. स्वाती थिटे, क्रीडा - श्रेया परदेशी
>
> **विशेष सन्मान:** युवा प्रेरणा पुरस्कार: पंकज सुतकर (पर्यावरण व संशोधन)
> सामाजिक बांधिलकी पुरस्कार: सारथी युथ फाउंडेशन (सोलापूर) व वृक्ष संवर्धन समिती (बार्शी)
> **विशेष सत्कार:** वनसेवेत कार्यरत अधिकारी व कर्मचारी.

व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, डॉ. आशा रोकडे, केअर फाउंडेशन (पुणे) चे अवधूत कदम आणि सामाजिक वनीकरण विभागाच्या सहाय्यक वनरक्षक शुभांगी जावळे यांची उपस्थिती होती.

युगंधर फाउंडेशनच्या दशकपूर्ती निमित्त संस्थेचा १० वर्षांचा कार्यअहवाल मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. संस्थेने गेल्या १० वर्षांत पर्यावरण, शिक्षण, आरोग्य, महिला व बालकल्याण तसेच युवकांसाठी स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन संस्थेच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांनी प्रास्ताविकात केले.

शाल, सन्मानचिन्ह व पुस्तके देऊन सर्व मान्यवरांचा गौरव करण्यात आला. या सोहळ्याला नागरिक, विद्यार्थी व विविध क्षेत्रातील मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसुंधरा शर्मा यांनी केले, तर आभार संस्थेच्या खजिनदार सुप्रिया माने यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युगंधर फाउंडेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### फ्रीस्टाईल जलतरणात कॅमेरॉनचा विश्वविक्रम

**शेंझेन (चीन) :** ऑलिम्पिक व विश्व विजेता जलतरणपटू कॅमेरॉन मॅकइव्हॉयने पुरुषांच्या ५० मीटर फ्रीस्टाईल शर्यतीचा, गत १७ वर्षांपासून अबाधित असलेला जागतिक विक्रम मोडला आहे. या ३१ वर्षीय ऑस्ट्रेलियन



जलतरणपटूने शेंझेन येथे सुरू असलेल्या चायना ओपन जलतरण स्पर्धेत २०.८८ सेकंदांची वेळ नोंदविली. या कामगिरीसह त्याने ब्राझीलच्या सीझर सिएलोने प्रस्थापित केलेला आधीचा विक्रम ०.०३ सेकंदांनी मोडला. सिएलोने आपला २०.९१ सेकंदांचा जागतिक विक्रम २००९ मध्ये, जलतरण क्षेत्रातील तथाकथित 'सुपर सूट' युगादरम्यान प्रस्थापित केला होता. हे सुपर सूट्स नंतरच्या काळात प्रतिबंधित करण्यात आले; कारण या सूट्समुळे पाण्यात तरंगण्याची क्षमता वाढत असे आणि पाण्याचा रोध कमी होत असे. यामुळेच, २०१० मध्ये हे सूट्स प्रतिबंधित होण्यापूर्वी, केवळ २००९ या एकाच वर्षात जलतरण क्षेत्रातील जवळपास १५० जागतिक विक्रम मोडले गेले होते. मला माझी सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी नोंदविण्याची संधी आहे, याची मला खात्री होती, असे मॅकइव्हॉय म्हणाला. माझी जुनी सर्वोत्तम वेळ २१.०६ सेकंद होती; त्यामुळे कदाचित २०.९९ सेकंदांपर्यंत पोहोचता येईल असे मला वाटले होते.

# पृथ्वीराज, हर्षवर्धन उपांत्य फेरीत

### ६८ वी राज्य कुस्ती व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा, वाघोली ● शिवराज राक्षेचे आव्हान संपुष्टात

◆ **वाघोली, पुणे, २१ मार्च**

पुण्यातील वाघोली येथे सुरू असलेल्या ६८ व्या वरिष्ठ महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी किताब कुस्ती स्पर्धेत शनिवारी गतविजेता पुण्याचा पृथ्वीराज मोहोळ, कोल्हापूरच्या पृथ्वीराज पाटील व नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरने विजयी हॅट्ट्रिकसह उपांत्य फेरीत धडक मारली. माजी केसरी किताब विजेता शिवराज राक्षेचे आव्हान संपुष्टात आले. नांदेडच्या शिवराज राक्षेला पृथ्वीराज पाटीलकडून ६-१० गुणांनी पराभव पत्करावा लागला.

रामकृष्ण आण्णा सातव पाटील आयोजित या स्पर्धेत शनिवारी डोळ्याचे पारणे फेडणारा कुस्त्या रंगल्या. गतविजेते शिवराज राक्षे व पृथ्वीराज पाटील यांच्यातील सामना लक्षवेधी ठरला.

पुण्यातील कोथरुड येथील स्पर्धेत महाराष्ट्र केसरी किताब जिंकलेल्या शिवराजला स्पर्धेत वाईल्ड कार्डने प्रवेश देण्यात आला आहे. गत स्पर्धेत पंचाला मारहाण केल्याबद्दल बंदी घालण्यात आली होती. २०२२ मध्ये सातारा येथील स्पर्धेत महाराष्ट्र केसरी झालेल्या पृथ्वीराज पाटील हा आंतरराष्ट्रीय कुस्तीगीर असून त्याने कडवी झुंज देत शिवराजचे आव्हान संपुष्टात आणले.



महाराष्ट्र केसरी गटाच्या उपांत्यपूर्व लढतीतील रोमांचक क्षण

महाराष्ट्र केसरी किताब गटातील गादी विभागातील उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत अकोल्याचा सिध्दांत गवई गैरहजर राहिल्यामुळे पुण्याच्या पृथ्वीराज मोहोळला पुढे चाल मिळाली आहे. साताऱ्याच्या दिग्विजय जाधवने सोलापूर शहरच्या जय पाटील सरळ १० -० गुणांनी मात केली.

नाशिकच्या हर्षवर्धन सदगीरने सोलापूरच्या अक्षय मंगवडेला १०-० गुणांनी मात दिली.

**रविराज, महेंद्रची आगेकूच**

महाराष्ट्र केसरी किताब गटातील माती विभागातील उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत सोलापूर शहरच्या रविराज चव्हाणने कोल्हापूरच्या शुभम शिंदनाळेचा ५-२ गुणांनी पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. सोलापूरच्या महेंद्र गायकवाडने सांगलीच्या इम्रान मुजावरला १०-० गुणांनी धूळ चारली.

**माती विभाग अंतिम निकाल**

**५७ किलो:-** प्रथम- मृणाल पाटील (कोल्हापूर जिल्हा), द्वितीय- ओंकार निगडे (पुणे शहर), तृतीय- सुदर्शन पाटील (कोल्हापूर शहर). ६१ किलो:- प्रथम- अमोल वालगुडे (पुणे जिल्हा ), द्वितीय- अजय कापडे (कोल्हापूर जिल्हा अ), तृतीय- गोरख कोळेकर (सातारा). ७९ किलो :- प्रथम- बिरुदेव बनसोडे (सोलापूर जिल्हा), द्वितीय- अविनाश शिंदे (बीड), तृतीय- प्रणव हांडे (सोलापूर जिल्हा). ८६ किलो:- प्रथम- मशीद शेख (सोलापूर जिल्हा ब ), द्वितीय- चंद्रहार नरळे (पुणे शहर), तृतीय- जय जाधव (सोलापूर अ).

**गादी विभाग अंतिम निकाल**

**५७ किलो:-** प्रथम- अक्षय ढेरे (कोल्हापूर शहर), द्वितीय- शुभम अचपळे (नाशिक जिल्हा), तृतीय- रोहित पाटील (कोल्हापूर जिल्हा अ), तृतीय- अमोल बोंगार्डे ( कोल्हापूर जिल्हा ब). ६१ किलो :- प्रथम- वैभव पाटील (कोल्हापूर शहर), द्वितीय- विवेक धावडे (कोल्हापूर जिल्हा), तृतीय- पांडुरंग माने (सांगली), तृतीय- आरु खांडेकर (सातारा).

**७९ किलो:-** प्रथम- विकास करे (सोलापूर जिल्हा अ), द्वितीय- सुरज माने (ठाणे जिल्हा), तृतीय- निखिल वाडेकर (पुणे जिल्हा), तृतीय- पृथ्वीराज बोडके (कोल्हापूर शहर).

**८६ किलो:-** प्रथम- अभिषेक कापडे (कोल्हापूर जिल्हा), द्वितीय- शुभम दुधाळे (सोलापूर शहर), तृतीय- शुभम मगर (सोलापूर जिल्हा), तृतीय- तेजस आपलकर (धुळे).

◂(वृत्तसंस्था)

# भारतीय संघ आयर्लण्डविरुद्ध टी-२० सामने खेळणार

### २६, २८ जून रोजी सामने

◆ **नवी दिल्ली, २१ मार्च**

विद्यमान विश्वविजेता संघ असलेल्या भारताने आयर्लण्डमध्ये २६ व २८ जून रोजी अनुक्रमे दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचे निश्चित केले आहे. बीसीसीआयने शनिवारी या सामन्यांविषयी माहिती दिली. हे सामने इंग्लंडमधील मर्यादित षटकांच्या मालिकेपूर्वी खेळले जातील.



हे दोन्ही सामने बेलफास्ट येथे खेळले जातील. २००७ नंतर भारतीय संघ या मैदानावर प्रथमच खेळणार आहे.

भारतीय वरिष्ठ पुरुष संघ जून २०२६ मध्ये दोन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी आयर्लण्डचा दौरा करेल.

गत आठ वर्षांत (२०१८, २०२२ व २०२३) तीन वेळा आयर्लण्डचा दौरा केल्यानंतर भारतीय संघ या दौऱ्याद्वारे २००७ नंतर प्रथमच बेलफास्टमध्ये पुनरागमन करेल, असे बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी म्हटले आहे.

आयर्लण्डचे हाय परफॉर्मन्स डायरेक्टर ग्रॅहम वेस्ट यांनी या मालिकेची पुष्टी केली. वेस्ट यांनी पॉल स्टर्लिंगने टी-२० कर्णधारपदावरून पायउतार होण्याचा निर्णय जाहीर करताना या मालिकेची माहिती दिली होती.

भारत सध्या अफगाणिस्तानचे यजमानपद भूषवित असून, त्यांच्याविरुद्ध एक कसोटी व तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका २० जून रोजी संपणार आहे. त्यानंतर, १ ते १९ जुलै या कालावधीत ५ टी-२० व ३ वन-डे सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघ इंग्लंडचा दौरा करेल.

गत सात वर्षांत भारताने तीन वेळा आयर्लण्डचा दौरा केला आहे. या दौऱ्यांदरम्यान डब्लिनच्या उपनगरातील मालाहाइड येथे सामन्यांना प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद लाभला होता. भारतासोबतची ही मालिका आमच्या आगामी उन्हाळी हंगामातील नियोजनाचाच एक भाग आहे, असे ते म्हणाले.

२०२८ च्या टी-२० विश्वचषकासाठी पात्रता निश्चित झाल्यामुळे, पॉल स्टर्लिंग याने टी-२० कर्णधारपदावरून पायउतार होण्याचा घेतलेला निर्णय एका नवीन कर्णधाराला आपली शैली आणि कार्यपद्धती अंमलात आणण्याची संधी उपलब्ध करून देतो. याची सुरुवात जूनमध्ये होणाऱ्या भारत मालिकेपासून होईल, असे वेस्ट यांनी म्हटले.

◂(वृत्तसंस्था)

### केकेआरचा आकाश दीप आयपीएल स्पर्धेच्या बाहेर




**कोलकाता :** २०२६ च्या आयपीएलमध्ये हर्षित राणा आणि मथिशा पथिराणा यांच्या अनुपस्थितीमुळे कोलकाता नाईट रायडर्सचा गोलंदाजी विभाग अत्यंत कठीण संकटाचा सामना करत आहे. गत शुक्रवारपासून कोलकाता येथे सुरू झालेल्या केकेआरच्या सराव शिबिरात आकाश दीप अनुपस्थित असल्याची बातमी समोर आली आहे. राणा हा उजव्या गुडघ्यातील अस्थिबंधाला झालेल्या दुखापतीमुळे या संपूर्ण हंगामातून बाहेर झाला आहे, तर पथिराणाला केकेआरच्या शिबिरात सहभागी होण्यासाठी अद्याप श्रीलंका क्रिकेटकडून परवानगी मिळालेली नाही. कडे या वृत्ताला दुजोरा दिला असून म्हटले आहे की, "दुर्दैवाने, आकाश दीप आयपीएलमधून बाहेर झाला आहे. या हंगामासाठी त्याला स्पर्धेबाहेर घोषित करण्यात आले आहे, असे फ्रॅन्चायझीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. आकाशच्या दुखापतीची नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत. सध्या तो बंगळुरू येथील सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पुनर्वसन प्रक्रियेतून जात आहे.

### शिवरामकृष्णन् यांचा समालोचन पॅनेलमधून राजीनामा

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेटमधील माजी खेळाडू आणि अनुभवी समालोचक लक्ष्मण शिवरामकृष्णन् यांनी अचानकपणे समालोचनाच्या जबाबदारीतून बाजूला होण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामागे त्यांनी गंभीर आरोप केले आहेत. शिवरामकृष्णन् यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या समालोचन गटातून माघार घेत असल्याची घोषणा करत, आपल्यावर अन्याय झाल्याची भावना व्यक्त केली आहे. गत अनेक वर्षांपासून मला महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये संधी दिली जात नव्हती. नाणेफेक किंवा बक्षीस वितरण यांसारख्या प्रमुख प्रसंगी नव्या समालोचकांना प्राधान्य दिले जात असताना, आपल्याकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले, असे त्यांनी नमूद केले. या वागणुकीमुळे निराशा निर्माण झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दोन दशकांहून अधिक काळ त्यांनी समालोचन क्षेत्रात आपली छाप पाडली. त्याआधी त्यांनी भारतासाठी कसोटी आणि एकदिवसीय सामने खेळले होते. आपल्या फिरकी गोलंदाजीमुळे त्यांनी एक काळ गाजवला होता. त्यांनी केलेल्या आरोपांमुळे समालोचन क्षेत्रातील कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुढील काळात या प्रकरणात कोणते नवे खुलासे होतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## हिरो इंडियन ओपन गोल्फ स्पर्धेत स्टार खेळाडूंचा सहभाग

◆ **गुरुग्राम, २१ मार्च**

जगातील अव्वल १०० खेळाडूंमधील पाच खेळाडू व अनेक वर्ल्ड टूर विजेते हिरो इंडियन ओपन स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यामुळे २६ ते २९ मार्च दरम्यान डीएलएफ गोल्फ ॲण्ड कंट्री क्लब येथे होणारी २०२६ ची ही आवृत्ती, स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात मजबूत आणि दिग्गज खेळाडूंचा समावेश असलेली स्पर्धा ठरणार आहे.

भारताचा अक्षय भाटिया व इटलीचा फ्रान्सिस्को मोलिनारी या जागतिक दर्जाच्या स्पर्धेचे मुख्य आकर्षण असेल. अक्षय सध्या जागतिक क्रमवारीत २२ व्या क्रमांकावर आहे व त्याने नुकताच पीजीए टूरवर विजय मिळवला आहे. फ्रान्सिस्को मोलिनारी २०१८ चा ओपन विजेता व तीन वेळा रायडर कप विजेता आहे.

भाटियाशिवाय अव्वल १०० खेळाडूंमध्ये स्थान मिळवलेल्या इतर खेळाडूंमध्ये केसी जार्विस (६९), एल्विस स्मायली (७४), डेव्हिड पुइग (८५) आणि थ्रिस्टन लॉरेन्स (८९) यांचा समावेश आहे.

जार्विस सध्या अत्यंत बहारदार फॉर्ममध्ये आहे, त्याने या हंगामाच्या सुरुवातीलाच सलग दोन स्पर्धांची विजेतेपदे पटकावली आहेत. एकापाठोपाठ येणाऱ्या आठवड्यांमध्ये त्याने इन्वेस्टेक साऊथ आफ्रिकन ओपन आणि मॅजिकल केनिया ओपन या स्पर्धा जिंकल्या आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# एकही क्षण वाया घालवू नका, सज्ज व्हा

### कोहलीचा सहकाऱ्यांना संदेश

◆ **बंगळुरू, २१ मार्च**

आपल्या विजेतेपदाचे रक्षण करण्यासाठी सज्जा होत असताना, संघाचा आधारस्तंभ असलेला धडाकेबाज फलंदाज विराट कोहलीने शनिवारी आपल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघातील सहकाऱ्यांना 'पूर्णपणे सज्ज' होण्याचे आणि सराव सत्रांमधील एकही मिनिट वाया न घालवण्याचे आवाहन केले.

एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या पहिल्या सराव सत्रादरम्यान संघाला संबोधित करताना, कोहलीने गत वर्षी संघाला विजेतेपद मिळवून देणारी तीच तीव्रता कायम राखण्याची गरज असल्याचे सांगितले.

गत वर्षी आम्ही जे यश संपादन केले, ते मिळवण्यासाठी आम्ही मागील दोन-तीन हंगामांमध्ये खूप मेहनत घेतली होती. आता हे आव्हान अधिक कठीण होणार आहे, कारण इतर संघ आमच्याविरुद्ध पूर्ण ताकदीने मैदानात उतरतील, असे कोहली म्हणाला.




शिबिरात मार्गदर्शन करताना विराट कोहली

आपल्या आयपीएल २०२६ मोहिमेची सुरुवात २८ मार्च रोजी एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबाद विरुद्धच्या सामन्याने होणार आहे.

**इतरांच्या एक पाऊल पुढे रहा, १२० टक्के योगदान द्या**

पहिल्या दिवसापासूनच कामात तत्परता असायलरा हवे. आपण हे दिवस वाया घालवायचे नाहीत. आपण नेहमी इतरांच्या एक पाऊल पुढे राहिले पाहिजे. त्यामुळे, आताच पूर्णपणे सज्ज व्हा. आपण सहभागी असलेल्या कोणत्याही सराव सत्राचा एकही मिनिट आपण वाया घालवायचा नाही. या अडीच महिन्यांच्या कालावधीत आपण आपले १२० टक्के योगदान दिलेच पाहिजे, असे कोहली यावेळी म्हणाला.

**महत्त्वाचे विभाग अधिक बळकट : फ्लॉवर**

फ्रॅन्चायझीने संघातील महत्त्वाच्या विभागांना अधिक बळकट केले आहे. आम्ही काही उत्कृष्ट नवीन खेळाडूंचा संघात समावेश केला आहे. विराट व रजत यांच्या नेतृत्वाखालील अनुभवी खेळाडूंच्या सोबतीने या नवीन खेळाडूंना आरसीबीच्या कार्यपद्धतीशी एकरूप करून घेणे, हा संघ उभारणी प्रक्रियेचा एक अत्यंत रोमांचक भाग आहे, असे विद्यमान आयपीएल विजेत्या आरसीबी संघाचे मुख्य प्रशिक्षक ॲण्डी फ्लॉवर म्हणाले. विद्यमान विजेते असण्याचे महत्त्व अधोरेखित करताना फ्लॉवर म्हणाले की, संघ केवळ भूतकाळातील यशाचा विचार करत न बसता, समोर आलेल्या आव्हानाचा स्वीकार करेल, असेही ते म्हणाले. आमच्या जर्सीवर आता एक स्टार (विजेतेपदाचे प्रतीक) झळकत आहे. आरपसीबीच्या सर्व चाहत्यांसाठी ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. आता आपल्यासमोर एक नवीन आव्हान उभे आहे. या वर्षीचे विजेतेपद पटकावण्यासाठीच आम्ही येथे आलो आहोत, असे ते म्हणाले.

लिलावादरम्यान आरसीबीने आपल्या संघात व्यंकटेश अय्यर, मंगेश यादव, जॉर्डन कॉक्स, विकी ओस्तवाल व सात्विक देसवाल या खेळाडूंचा समावेश केला. ◂(वृत्तसंस्था)

## गिल अधिक उत्स्फूर्तपणे खेळेल : पुजारा

◆ **नवी दिल्ली, २१ मार्च**

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिल हा आयसीसी पुरुष टी- २० विश्वचषकासाठी भारतीय संघात निवड न झाल्याच्या गोष्टीचा वापर, आगामी आयपीएल स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी एक प्रेरणा म्हणून करू शकतो. या आयपीएलमध्ये तो अधिक उत्स्फूर्तपणे खेळेल, असे मत भारताचा माजी फलंदाज चेतेश्वर पुजारा याने व्यक्त केले.

शुभमन गिल हा तिन्ही क्रिकेट प्रकारासाठी योग्य असलेला एक दर्जेदार खेळाडू आहे, अशा शब्दां पुजाराने गिलचे कौतुक केले.

आयपीएलमधील त्याची एक दमदार कामगिरी त्याच्या भारताच्या टी-२० संघात पुनरागमनाचा मार्ग मोकळा करू शकते, असेही तो म्हणाला.

टी-२० विश्वचषकाच्या संघात निवड न होणे ही बाब शुभमन गिलला नक्कीच अधिक पेटवून देईल. ◂(वृत्तसंस्था)

# कर्नाटकच्या तुमाकुरुमध्ये प्रथमच आयटीएफ महिलांची टेनिस स्पर्धा

◆ **बंगळुरू, २१ मार्च**

कर्नाटकच्या टेनिस क्षेत्रातील वाढत्या प्रतिष्ठेला मोठी चालना देत, तुमाकुरु शहर ४ ते १० मे या कालावधीत आपल्या इतिहासातील पहिल्याच आयटीएफ महिला जागतिक टेनिस टूर डब्ल्यू ३५ स्पर्धेचे यजमानपद भूषवणार आहे.

ही स्पर्धा तुमाकुरु विद्यापीठ परिसरातील तुमाकुरा जिल्हा टेनिस स्टेडियमवर आयोजित केली जाईल. आगामी डब्ल्यू ३५ टेनिस स्पर्धा ही तुमाकुरुच्या इतिहासातील दुसरी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ठरेल; तसेच, गत दोन दशकांहून अधिक काळातील पहिलीच आयटीएफ महिला स्पर्धा असेल.

३०,००० अमेरिकन डॉलर्सचे बक्षीस असलेल्या या स्पर्धेचा समावेश जागतिक आयटीएळ महिला सर्किटमध्ये होतो. ही स्पर्धा खेळाडूंना व्यावसायिक मानांकन गुण मिळवून देण्याची आणि डब्ल्यूटीए टूरच्या दिशेने प्रगती करण्याची संधी उपलब्ध करून देते.

या स्पर्धेच्या ३२ खेळाडूंच्या सिंगल्स मेन ड्रॉ आणि पात्रता फेऱ्यांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर उदयास येत असलेले खेळाडू आणि भारतातील अव्वल व्यावसायिक खेळाडू एकमेकांशी भिडतील.

बंगळुरू आणि कलबुर्गी येथे आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धांचे यशस्वी आयोजन झाल्यानंतर, तुमाकुरुमधील ही स्पर्धा जागतिक टेनिस नकाशावर कर्नाटकचे स्थान अधिक बळकट करते. यापूर्वी २००३ मध्ये म्हणजेच तब्बल दोन दशकांपूर्वी येथे एटीपी चॅलेंजर (तुमाकुरा ओपन) या आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ◂(वृत्तसंस्था)

## पाकिस्तान संघात बाहेरील हस्तक्षेप जास्त : गॅरी कर्स्टन

◆ **नवी दिल्ली, २१ मार्च**

भारतीय संघाला विश्वविजेतेपद मिळवून देणारे माजी प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनी पाकिस्तान क्रिकेटमधील अंतर्गत परिस्थितीवर भाष्य करत मोठा खुलासा केला आहे. त्यांनी पाकिस्तान क्रिकेट मंडळाच्या कामकाजाच्या पद्धतीवर टीका करत, तेथील वातावरण समाधानकारक नसल्याचे स्पष्ट केले आहे.

गॅरी कर्स्टन यांनी काही काळ पाकिस्तानच्या मर्यादित षटकांच्या संघाचे मार्गदर्शन केले होते. मात्र, अवघ्या काही महिन्यांतच त्यांनी ही जबाबदारी सोडण्याचा निर्णय घेतला. आता त्यांनी त्या काळातील अनुभव मांडताना सांगितले की, संघाच्या कामकाजात बाहेरील हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात होता, ज्यामुळे प्रशिक्षक म्हणून काम करणे कठीण होत होते.

अशा परिस्थितीत खेळाडूंशी संवाद साधणे आणि संघात समन्वय राखणे आव्हानात्मक ठरते. सतत होणारा हस्तक्षेप संघाच्या कामगिरीवरही परिणाम करत असल्याचे त्यांनी नमूद केले. ◂(वृत्तसंस्था)

## धोनीचा शेवटचाच आयपीएल असेल : रॉबिन उथप्पा

◆ **नवी दिल्ली, २१ मार्च**

महेंद्रसिंग धोनी इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) पुन्हा एकदा चेन्नई सुपर किंग्जचे (सीएसके) प्रतिनिधित्व करण्यास सज्ज झाला आहे. या अनुभवी यष्टीरक्षक-फलंदाजासाठी हा हंगाम कदाचित शेवटचाच ठरू शकतो, असे मत भारताचा माजी क्रिकेटपटू रॉबिन उथप्पा याने व्यक्त केले आहे.




२०२६ हे वर्ष कदाचित धोनीचे पिवळ्या जर्सीतील शेवटचेच वर्ष असेल. या वर्षी तो मार्गदर्शक-तसेच-खेळाडू अशी दुहेरी भूमिका अधिक प्रमाणात निभावताना मला दिसत आहे. तो सातव्या क्रमांकावर फलंदाजी करेल असे मला वाटत नाही; त्याऐवजी तो आठव्या क्रमांकावर फलंदाजी करताना दिसेल असे मला वाटते. आता आपण निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहोत हे जाणून, तो स्वतःला हळूहळू यातून बाजूला करून निवृत्त होऊ इच्छितो. मला वाटते की तो तसेच करेल, असे ४० वर्षीय उथप्पा म्हणाला.

४४ वर्षीय धोनी हा अशा चार सक्रिय खेळाडूंपैकी एक आहे, ज्यांनी आयपीएलच्या आतापर्यंतच्या सर्व हंगामांमध्ये सहभाग घेतला आहे, यात रोहित शर्मा, विराट कोहली आणि मनीष पांडे हे इतर तीन खेळाडूंचा या यादीत समावेश आहेत.

धोनीने आयपीएल मधील २७८ सामन्यांमध्ये ३८ च्या सरासरीने आणि १३७ च्या स्ट्राईक रेटने ५४३९ धावा केल्या आहेत. आयपीएलच्या इतिहासात सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो सहाव्या क्रमांकावर आहे. ◂(वृत्तसंस्था)

# लखनौ संघाने घेतले अयोध्येत श्रीरामाचे दर्शन

◆ **अयोध्या, २१ मार्च**

आगामी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ हंगामाच्या पृष्ठभूमीवर लखनौ सुपर जायण्ट्सचे (एलएसजी) मालक संजीव गोयनका व संघाचा कर्णधार ऋषभ पंत यांच्यासह संघातील खेळाडूंनी अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

प्रभू श्रीरामांची प्रार्थना करणे हे कधीच पुरेसे नसते; आणि आता आयपीएलचा हंगाम सुरू होणार असल्याने, सर्व खेळाडूंनी येथील मंदिरात प्रार्थना केली आहे. प्रभू श्रीरामांच्या आशीर्वादाने, सर्व काही सुरळीत पार पडते, असे संजीव गोयनका यांनी श्रीराम मंदिरामध्ये पूजा-अर्चा केल्यानंतर सांगितले.

ही भेट संघाच्या हंगामापूर्व उपक्रमांचाच एक भाग होती. यावेळी गोयनका व पंत यांच्यासोबत एलएसजी व्यवस्थापन समितीचे काही निवडक सदस्यही उपस्थित होते.



प्रभू श्रीरामाचे दर्शन घेतल्यानंतर संजीव गोयनका, कर्णधार ऋषभ पंत व इतर खेळाडू

यापूर्वी, पंतने संघाच्या तयारीबद्दल भाष्य केले व फ्रॅन्चायझीचा नवीन गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून भारत अरुण यांचा संघात समावेश झाल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

पंतच्या नेतृत्वाखालील लखनौ सुपर जायण्ट्स संघ आपल्या आयपीएल २०२६ हंगामाची सुरुवात १ एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्स विरुद्धच्या सामन्याने करेल. त्यांचे पुढील सामने ५ एप्रिल रोजी सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध, ९ एप्रिल रोजी कोलकाता नाईट रायडर्स विरुद्ध आणि १२ एप्रिल रोजी गुजरात टायटन्स विरुद्ध खेळले जातील. ◂(वृत्तसंस्था)

# सीएसकेच्या तुलनेत मुंबई इंडियन्स सर्वोत्कृष्ट : इरफान पठाण

◆ **मुंबई, २१ मार्च**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये चेन्नई सुपर किंग्सच्या (सीएसके) तुलनेत मुंबई इंडियन्स सर्वोत्कृष्ट संघ आहे, असे मत भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाण याने शनिवारी व्यक्त केले.

गत काही वर्षांत उत्कृष्ट युवा खेळाडूंना घडवून व त्यांना वाव देऊन मुंबई इंडियन्सने भारतीय क्रिकेटमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे, त्यामुळे मुंबई इंडियन्स सर्वोत्तम आहे, असे तो म्हणाला.



या दोन्ही संघांनी प्रत्येकी पाच वेळा आयपीएल विजेतेपद पटकावले आहे. रोहित शर्मा व एम.एस. धोनी यांसारख्या रणनीतीकार कर्णधारांनी या संघांचे नेतृत्व केले आहे; त्यामुळे सर्वोत्कृष्ट फ्रॅन्चायझी कोण, या चर्चेत या दोन संघांमध्ये फारसा फरक करणे कठीण जाते.

तथापि, मुंबई इंडियन्सची खेळाडू-निवड प्रणाली व त्यांची एकूणच कार्यपद्धती ही या फ्रॅन्चायझीसाठी तसेच भारतीय क्रिकेट संघासाठी अत्यंत फायदेशीर ठरली आहे. हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव, ईशान किशन व तिलक वर्मा यांसारखे गुणवान खेळाडू त्यांनीच भारतीय संघात आणले आहेत आणि याच खेळाडूंमुळे अलीकडच्या काळात भारताच्या विजेतेपदांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

आयपीएलमधील सर्वोत्कृष्ट संघ म्हणून सीएसके की मुंबई इंडियन्स यापैकी कोणाची निवड करावी, हा विषय नेहमीच चर्चेचा आणि मतभेदांचा राहील, असेही तो म्हणाला. मुंबई इंडियन्सने २०१० पासून आयपीएल विजेतेपदे जिंकण्यास सुरुवात केली. त्यांनी २०१० आणि २०११ मध्ये सलग दोनदा विजेतेपद पटकावले आणि अशी कामगिरी करणारा तो पहिलाच संघ ठरला. परंतु, जेव्हा २०१३ मध्ये सीएसकेने विजेतेपद जिंकण्यास सुरुवात केली, तेव्हा त्यांनी त्यानंतर दर एका वर्षाआड आयपीएल विजेतेपद जिंकण्याची मालिकाच सुरू ठेवली. त्यानंतर त्यांनी २०१९ आणि २०२० मध्ये सलग दोनदा करंडक जिंकला. ◂(वृत्तसंस्था)

## महत्वाचे...



### ईदनिमित्त टेंभुर्णीत बंधुभावाचे दर्शन

**प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांच्याकडून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा**

**टेंभुर्णी, दि. २१ मार्च-**

ईदच्या पावन पर्वानिमित्त टेंभुर्णी शहरात आनंद, उत्साह आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले. शहरातील विविध मशिदींमध्ये मुस्लिम बांधवांनी मोठ्या श्रद्धा आणि शिस्तीने ईदची नमाज अदा केली. या पार्श्वभूमीवर टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल आत्राम (भा.पो.से.) यांनी नमाजानंतर मुस्लिम बांधवांना पुष्पगुच्छ देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे पोलीस प्रशासन आणि नागरिकांमधील स्नेह व विश्वास अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. ईद सणाच्या निमित्ताने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी शहरातील संवेदनशील ठिकाणी दक्षतेने कर्तव्य बजावले. त्यामुळे संपूर्ण नमाज कार्यक्रम शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पडला. नमाज संपल्यानंतर अकलूज रोड, एसटी स्टँड परिसरात प्रभारी अधिकारी राहुल आत्राम यांनी स्वतः उपस्थित राहून नमाजासाठी आलेल्या मुस्लिम बांधवांना पुष्पगुच्छ देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेक नागरिकांनी पोलीस प्रशासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करत, धर्म वेगळे असले तरी आपण सर्व भारतीय एकच आहोत, अशी भावना व्यक्त केली.



### 'स्वेरी'च्या विद्यार्थ्यांची मॅकलॉइड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेडमध्ये निवड

**पंढरपूर, दि. २१ मार्च-**

येथील 'स्वेरी संचालित कॉलेज ऑफ फार्मसीमधील बी.फार्मसीचे १७ आणि डी.फार्मसीचे १२ अशा २९ विद्यार्थ्यांची गुजरात येथील आंतरराष्ट्रीय दर्जा असलेल्या 'मॅकलॉइड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेड' या औषध निर्मिती क्षेत्रातील कंपनीत कॅम्पस इंटरव्यूव्हद्वारे निवड करण्यात आली आहे.अशी माहिती बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार यांनी दिली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ.सुरज रोंगे यांनी अभिनंदन केले.

**या विद्यार्थ्यांची झाली निवड**

वैष्णवी देवरडे, काजल भोसले, आदित्य बोडके, प्रियांका मोकळे, प्रचिती काटकर, आरती मेटकरी, सुमेध वाघमारे, सोमनाथ गावंधरे, संदीप काळे, मयूर फंड, समीर शिंदे, रोहित माळी, आदित्य खुळे, आदर्श चव्हाण, रुजुल भोसले, हरी खोत व अंकिता लेंगरे, गणेश ढोणे, विनोद बंडगर, आर्यन शेळके, महेश नाईकनवरे, श्रीकांत नरुटे, सतीश कोळी, आदित्य भंडारे, निखिल पवार, प्रमोद काळे, आदेश पारसे, समाधान नरळे व अमेय जाधव.

### सांगोल्यातील बसवेश्वर पतसंस्थेची फसवणूक केल्याची तक्रार

**सांगोला, दि.२१ मार्च-**

सांगोल्यातील एका पतसंस्थेच्या सचिवाने दुसऱ्या बँकेत लॉकरमध्ये ठेवलेले सोने परस्पर काढून पतसंस्थेची फसवणूक केल्याची तक्रार सांगोला पोलीस ठाण्यात दिली आहे. अमर कृष्णाथ लोखंडे (वय-४५), व्यवसाय-व्यापार, रा.स्टेशन रोड, सांगोला यांनी श्री.बसवेश्वर व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सांगोला मधील सचिव रमेश विठ्ठल रणदिवे, (रा. अलराईनगर, सांगोला) यांना संस्थेचे पंढरपूर अर्बन को बँक शाखा सांगोला याकडील लॉकर क्र.२३९ व २४० हे हाताळणीचे सन २००७ सालापासून अधिकार दिले होते. याचा गैरफायदा घेवून आम्हा सर्व संचालक मंडळाचा विश्वास संपादन करून आमचे संस्थेतील एकूण ४४ सोने तारण कर्जदारांचे पंढरपूर अर्बन बँक मधील लॉकरमध्ये ठेवलेल्या सोन्यापैकी ४० सोने तारण कर्जदारांचे सोने आढळून आले नाही. त्यामुळे आमची खात्री झाली की रमेश रणदिवे याने स्वतःचे आर्थिक फायद्याकरता व त्याला दिलेल्या अधिकाराचा गैरवापर करून संस्थेतील एकुण ४० सोने तारण कर्जदारांचे सोने घेवून गेला आहे. त्याचे नक्की वजन ७३४.८५० ग्रॅ.इतकी आहे. त्यामुळे संस्थेचे अंदाजे ८७ लाख ४४ हजार ७१५ इतके किंमतीच आर्थिक नुकसान होवून आमची फसवणूक केली आहे, अशी कायदेशीर तक्रार सांगोला पोलीस ठाण्यात दिली आहे. पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत.

## निधन वृत्त...

### राजेंद्र काटे



**सोलापूर, दि. २१ मार्च-**

न्यू तिऱ्हे गाव येथील रहिवासी राजेंद्र बलभीम काटे यांचे (वय ६३) यांचे दि. १७ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे.

### संग्राम आखाडे



**सोलापूर, दि. २१ मार्च-**

दलित पँथरचे कार्यकर्ते आणि माजी कोषाध्यक्ष संग्राम उर्फ मुन्ना नागनाथ आखाडे यांचे हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने शनिवारी निधन झाले. सामाजिक चळवळीत काम करित कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी सोलापुर महानगरपालिकेत रोजंदारी कर्मचारी म्हणुन कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी आणि दोन मुले असा परिवार आहे.

# अकलूजमध्ये ईद-उल-फित्र साजरी

**ईदगाह मैदानाचे लवकरच सुशोभीकरण करणार**

**आमदार उत्तमराव जानकर यांचे प्रतिपादन**



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २१ मार्च-**

मागील संपूर्ण महिनाभर रमजानचे रोजे केल्यानंतर ३१ वा दिवस म्हणजेच हिजरी सनानुसार शव्वालच्या एक तारखेला रमजान ईद साजरी केली जाते त्या अनुषंगाने अकलूज येथील नीरा नदी काठी असलेल्या भव्य इदगाह मैदानावर अकलूज आणि परिसरातील हजारो मुस्लिम बांधवांनी ईद-उल-फित्र म्हणजे रमजान ईदचे नमाज अदा केली.

प्रारंभी हाफिज झाकीर हुसेन सहाब यांनी ईदची नमाज अदा करून प्रवचन केले तर खुत्बा जनाब रमजान मदारी यांनी दिला

यांप्रसंगी बोलताना हाफीज जाकीर हुसेन म्हणाले की आपला देश म्हणजे समता ,एकता बंधुत्वाचे प्रतिक असून जगात आपल्या देशासारखी एकता कोठे दिसून येत नाही सर्व हिंदू मुस्लिम बांधव एकमेकांच्या उत्साहात सहभागी होऊन शुभेच्छा देतात ही आपल्या देशाची संस्कृती आहे यांप्रसंगी मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा देण्यासाठी आमदार उत्तमराव जानकर, आमदार रणजित सिंह मोहिते पाटील, नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष, शिवतेजसिंह मोहिते-पाटील नगरसेवक विशाल मोरे विलास क्षीरसागर, पृथ्वीराज अंबुरे नाशिक आबा सोनवणे, नगरसेवक योगेश गांधी मोहसीन शेख अजहर शेख तसेच लालासाहेब आडगळे उपस्थित होते.

या ईदनिमित्त ईदगाह मैदानावर आल्यानंतर ईदची नमाज पडण्यासाठी समाज बांधवांना खडबडीत जाग्यामुळे त्रास सहन करुन असुविधेचा सामना करावा लागत आहे गेली अनेक वर्ष अशाच खडबडीत जागेत समाज बांधव नमाज अदा करतात त्यामुळे समाजात एक निराशा जनक भावना निर्माण झाली होती मात्र आमदार उत्तमराव जानकर आणि उपनगराध्यक्ष-शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी ईदगाह मैदानात सोयी सुविधा आणि सुशोभीकरणाचे आश्वासन दिल्याने समाज बांधवात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झालेअसुन समाजाच्या आशा पल्लवीचे झाले आहेत. अकलूज नगर परिषदेने मागील आठवड्यात ईदगाहाची रंगरंगोटी केली मात्र ती अर्धवट केली असल्याने ईदगाह चे मिनार आहेत असेच असून त्याची रंगरंगोटी केली नसल्याने समाजात नाराजीचा सूर दिसून येत होता तोंडाला पाणी पुसण्याची काम नगरपरिषदेने केले असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे आगामी काळात या इसगाह मैदानाचे सुशोभीकरण करून खडबडीत जागेत पेविंग ब्लॉक बसवावे अशीही मागणी समाज बांधवातून होत आहे. होत आहे.

या रमजान ईद प्रसंगी मागील गेली ३२ वर्ष रमजानचे रोजे करत असलेले हिंदू बांधव सुरेश भाऊ गंभीरे यांचा यावेळी अकलूज शहर मुस्लिम समाजाच्यावतीने सत्कार करण्यात आला. या ईद निमित्त अकलूज पोलीस स्टेशनच्यावतीने चूक बंदोबस्त ठेवण्यात आला होता

### मनोरमा बँक परिवाराच्या वतीने गुरुवारी रामनवमीनिमित्त गीतरामायण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

येथील मनोरमा को-ऑपरेटिव बँक आणि मनोरमा मल्टीस्टेट यांच्या वतीने गुरुवार दि. २६ मार्च २०२६ रोजी गंधार प्रतिष्ठान प्रस्तुत ग. दि. माडगूळकर लिखित गीत रामायण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे यांनी दिली.

हुतात्मा स्मृती मंदिर येथे अतुल बेले आणि सहकलाकार हा कार्यक्रम सादर करणार आहेत. गुरुवारी सायंकाळी ६:१५ ते रात्री दहा वाजेपर्यंत हा कार्यक्रम चालणार असून सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन चेअरमन श्रीकांत मोरे, व्हाईस चेअरमन संतोष सुरवसे, मनोरमा मल्टीस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, बँकेच्या कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड आणि समस्त संचालक मंडळ आणि संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. प्रवेशिका कार्यक्रम स्थळीच देणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## लिंगायत समाजाचे तुळजापुरात आज राज्यव्यापी अधिवेशन

**जीवनगौरव, समाजभूषण व अक्कमहादेवी पुरस्काराचेही वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

लिंगायत महासंघ, शाखा धाराशिव जिल्ह्याच्यावतीने रविवार दि. २२ मार्च २०२६ रोजी त्रीमुर्ती मंगल कार्यालय, तुळजापूर येथे लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष प्रा. सुदर्शनराव बिरादार यांच्या नेतृत्वाखाली लिंगायत समाजाचे राज्यव्यापी अधिवेशन आयोजित करण्यात आल्याचे लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले. २२ मार्च २०२६ रोजी होणाऱ्या अधिवेशनात एकूण ९ सत्र ठेवण्यात आले आहेत. महात्मा बसवेश्वरांच्या तत्वांची माहिती वचन, कायक, दासोह, अनुभवमंटप, आष्टावरण व इष्टलिंग यावर अनेक मान्यवर वक्ते मार्गदर्शन व प्रात्यक्षीके सादर करणार आहेत. याबरोबरच अक्कामहादेवी, चन्नबसवेश्वर, सिध्दरामेश्वर यांच्या जीवन चरित्रावर मार्गदर्शन होणार आहे.

या अधिवेशनाचे पहिले सत्र सकाळी ६.३० वाजता ५०० दाम्पत्यां जीवनगौरव, समाजभुषण व अक्कमहादेवी पुरस्काराचेही वितरण च्या सामुहिक सहभागाने इष्टलिंग पुजा होणार असुन या पुजेला वैज्ञानिक दृष्टीकोनातून मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. अमरनाथ सोलपूरे - बिदर, डॉ. मन्मथ गताटे निलंगा व अमृताताई बचाटे तुळजापूर हे उपस्थित राहणार आहेत. तर दुसऱ्या वचनोत्सव सत्रात संगमेश्वर तवरखेडे बसवकल्याण हे मार्गदर्शन करणार आहेत. तिसर्या सत्रात अक्कमहादेवीच्या चरित्रावर यशवंत गणेशकर सास्तुर हे मार्गदर्शन करणार आहेत. चौथ्या सत्रात सिध्दरामेश्वराच्या जीवन चरित्रावर सोलापूर येथील वक्ते श्री चन्नवीर भद्रेश्वर मठ हे मार्गदर्शन करणार आहेत. तर पाचव्या सत्रात चन्नबसवेश्वराच्या जीवनचरित्रावर नांदेड येथील वक्ते प्रा. आनंद कर्णे हे मार्गदर्शन करणार आहेत.

या सत्राचे उद्घाटन प्रा. प्रभाकर उदगीरे हे करणार आहेत. तर सहाव्या सत्रात आष्टावरण या विषयावर म ल्लिकार्जुन मुलगे सोलापूर हे मार्गदर्शन करणार आहेत. सातव्या सत्रात महात्मा बसवेश्वरांचे तत्व व मंगळवेढा येथील त्यांचे वास्तव्य या विषयावर महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूरचे माजी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे हे मार्गदर्शन करणार आहेत. तर आठव्या सत्रात जाहीर महासभा होणार असुन या कार्यक्रमाचे उद्घाटन तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या सभेत माधवराव पटणे नांदेड, श्रीमंत तांदूळकर पुणे व प्राचार्य डॉ. रामलिंग मुळे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे तर शशिकांत बिराजदार, सुरेश हत्ती, रवींद्र कानडे, उमेश पाटील, धनराज पांडे, प्रा बसवराज कोरे, गणेश गुळवे, शेषराव मानकरी, डॉ. वसंतराव लंवगे, आनंद कर्णे, डॉ. ओमप्रकाश कदम, गुरुनाथ बडुरे, नरेंद्र गिरवलकर, पत्रकार शेखर पाटील, श्रीमंत कावळे, ऋषी बोमणे, आदींना समाजभुषण पुरस्कार तर आकांक्षा चौगुले व पुष्पाताई गुंगे यांना अक्कमहादेवी पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच धाराशिव, लातूर व सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत निवडून आलेले नगराध्यक्ष, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी व अनेक मान्यवर समाज बांधवांच्या भेटीसाठी प्रा. बिरादार सोलापूर येथे आले असता ही माहिती दिली. कार्यक्रम यासाठी प्रवचन किर्तनकार मंडळ उदगीर चे प्रदेशाध्यक्ष शि भ प शिवराज नावंदे गुरुजी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.



## बौध्द विहाराच्या जागेसाठीचे आमरण उपोषण स्थगित

**आंदोलन स्थळी आमदार राजू खरे यांची भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ मार्च -**

येथील यमाई तलावानजिक असणाऱ्या नगरपरिषदेच्या जागेवर बुध्द विहार उभारण्याच्या मागणीसाठी बुद्धभूमी निर्माण कृती समितीने येथील तहसील कचेरीसमोर उपोषण सुरु केले होते. दरम्यान या आंदोलनस्थळी मोहोळचे आमदार राजू खरे यांनी भेट देवून बुद्ध विहारासाठी प्रस्ताव तयार करून त्वरित शासनाची मंजुरी मिळवण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन दिल्यानंतर अखेर आंदोलन स्थगित करण्यात आले.

पंढरपूर येथील यमाई तलावानजिक असणाऱ्या नगरपरिषदेच्या जागेवर बुध्द विहार उभारण्याची बुद्धभूमी निर्माण कृती समितीची मागणी आहे. गेली चौदा वर्षापूर्वी सर्व सामाजिक संघटनांच्या मागणी नुसार पंढरपूर नगरपरिषदेने ठराव करून तसेच समितीकडून वारंवार पाठपुरावा करून देखील प्रशासनाची संशयास्पद भूमिका असल्याने न्याय मिळत नसल्याने महाड चवदार तळे मुक्तिसंग्रामच्या ९९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून बुद्धविहार उभारण्याच्या प्रस्तावास शासनाची मंजुरी त्वरित मिळावी या मागणीसाठी शुक्रवार (दि.२० ) पंढरपूर तहसील कार्यालयासमोर बुद्धभूमी निर्माण कृती समितीचे संस्थापक सिद्धार्थ जाधव, कार्याध्यक्ष दिपक चंदनशिवे, सचिव स्वप्निल गायकवाड, उपाध्यक्ष योगेश जाधव, उपाध्यक्ष महेश मोटे, जनसंपर्कप्रमुख अमित कसबे यांनी आमरण उपोषण आंदोलन सुरू केले होते.

या आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी मोहोळचे आमदार राजू खरे, तहसीलदार सचिन लंगोटे यांनी भेट देऊन मुख्याधिकारी, भूमिअभिलेख अधिकारी यांना संपर्क साधून परिस्थिती जाणून घेऊन बुद्ध विहार उभारण्याबाबत शासन दरबारी प्रयत्न करू असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. यावेळी सुनिल सर्वगोड, आप्पासाहेब जाधव, बाळासाहेब कसबे, जितेंद्र बनसोडे, संतोष सर्वगोड, प्रशांत लोंढे, रवींद्र शेवडे, अमर फडतरे, दीपक साबळे, रुपेश वाघमारे, अर्जुन माने, एडवोकेट गौतम भालेराव, समाधान लोखंडे, राहुल सर्वगोड, लखन माने उपस्थित होते.

## पंढरपूर सिंहगड कॉलेजला पीसीईआरएफचे उपकेंद्र

**विद्यार्थ्यांना संशोधन व उद्योग अनुभवाच्या नव्या संधी**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२१ मार्च-**

पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग रिसर्च फाउंडेशन (पीसीईआरएफ) यांच्या वतीने पुणे येथे आयोजित उपकेंद्र कॉन्क्लेव्हमध्ये एस.के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाला 'पीसीईआरएफ' चे उपकेंद्र म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली. या मान्यतेमुळे परिसरातील तांत्रिक शिक्षणाला उद्योगाभिमुख दिशा मिळणार असून विद्यार्थी, प्राध्यापक आणि बांधकाम क्षेत्रातील तज्ज्ञ यांच्यातील सहकार्य अधिक बळकट होणार आहे.

पुणे येथे आयोजित या कॉन्क्लेव्हसाठी एस.के.एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरचे प्रतिनिधित्व सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील प्रा. गणेश लकडे व प्रा. अमोल कांबळे यांनी केले. तसेच विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून प्रणव वनवे व ओम जाधव उपस्थित होते.

या मान्यतेमुळे सिव्हिल इंजिनिअरिंग व आर्किटेक्चर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना संशोधन, नवकल्पना आणि उद्योग-अनुभवाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, असे मत प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी व्यक्त केले. तांत्रिक शिक्षण अधिक दर्जेदार व उद्योगाभिमुख करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास उपप्राचार्य डॉ.स्वानंद कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

या उपकेंद्राचे कार्यक्षेत्र सोलापूर जिल्हा व परिसर असेल. त्यामुळे या भागातील सिव्हिल इंजिनिअरिंग क्षेत्रातील विद्यार्थी, शिक्षक तसेच बांधकाम उद्योग क्षेत्राला विविध शैक्षणिक व तांत्रिक उपक्रमांचा लाभ मिळणार आहे.

या मान्यतेमुळे विभागाला उद्योग क्षेत्राशी अधिक जवळून काम करण्याची संधी मिळणार असून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रकल्प, इंटर्नशिप आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाईल, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. यशवंत पवार यांनी दिली.

## डोळे नसलेल्या सापाची आंतरराष्ट्रीय स्तरावर नोंद

**सोलापूरचे सर्प अभ्यासक राहुल शिंदे व पुण्याचे अनिल कानस्कर यांचे संशोधन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

जन्मतःच डोळे नसलेल्या तस्कर सापाची संशोधनात्मक नोंद २० मार्च रोजी प्रकाशित झालेल्या अमेरिकेतील रेपटाईल्स अँड अँफीबियन्स या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये झाली आहे. सोलापूरचे सर्प अभ्यासक राहुल शिंदे आणि पुण्याचे अनिल कानस्कर यांच्या संयुक्त संशोधनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे.

पुणे येथील सुतारवाडी, पाषाण परिसरात १९ डिसेंबर २०२४ रोजी एका रेस्क्यू कॉलदरम्यान हा साप पकडण्यात आला. हा तस्कर जातीचा साप असून त्यामध्ये डोळे पूर्णतः अनुपस्थित असल्याचे आढळले. सुमारे २० सेंमी लांबीच्या या सापाच्या डोळ्यांच्या जागी गुळगुळीत खवले होते. तेथे डोळ्यांची बाहुलीच नव्हती. तसेच त्याच्या जबड्याच्या रचनेतही काही प्रमाणात विकृती दिसून आली. या घटनेची माहिती सोलापूरचे सर्प अभ्यासक राहुल शिंदे यांना देण्यात आली. त्यांनी हा साप विचित्र दिसत असला तरी यावर



संशोधनात्मक नोंद होणे गरजेचे असल्याचे सांगितले. हे जन्मजात दोषाचे लक्षण असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. या विकृतीला शास्त्रीय भाषेत 'बायलॅटरल अनऑफथालमिया' असे म्हणतात. बायलॅटरल म्हणजे दोन्ही बाजूला आणि अनऑफथालमिया म्हणजे डोळे अनुपस्थित असणे. विशेष म्हणजे, अशा प्रकारची ही विकृती सापांमध्ये अत्यंत दुर्मिळ असून, तस्कर या सापामधील ही पहिली नोंद आहे. त्यामुळे या संशोधनाला सर्पशास्त्र आणि प्राणीजन्य विकृतींच्या अभ्यासात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ही जन्मजात विकृती भ्रूणावस्थेत डोळ्यांची निर्मिती न होणे किंवा त्याचा विकास अर्धवट राहणे यामुळे निर्माण होते. यामागे जनुकीय किंवा पर्यावरणीय घटक कारणीभूत असू शकतात. या सापाच्या शारीरिक विकृती असूनही तो अन्य बाबतीत निरोगी दिसत होता. त्यामुळे त्याला सुरक्षितपणे त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. या संशोधनासाठी पुणे वनविभागाचे सहकार्य लाभले असून पुण्याचे रफीक शेख आणि गणेश माने यांचे सहकार्य लाभले.

हा प्रकार अत्यंत दुर्मिळ असून आंतरराष्ट्रीय स्तरावरील अशा सापाची नोंद होणे ही मोठी वैज्ञानिक बाब आहे. ही एक जन्मजात अवस्था आहे. भ्रूणाच्या सुरुवातीच्या टप्प्यात डोळ्यांची प्राथमिक रचना तयार होत नाही किंवा तयार होऊन नंतर नष्ट होते. त्यामुळे डोळे विकसित होत नाहीत. सापांमधील ही अवस्था अत्यंत दुर्मिळ असून या संशोधनामुळे सापाच्या भ्रूणविकासाच्या अभ्यासात महत्वाची नोंद ठरली आहे.

**राहुल शिंदे,** सर्प अभ्यासक

रेस्क्यू दरम्यान अशा वेगळ्या वैशिष्ट्यांचा साप आढळणे हे आमच्यासाठीही अनोखे होते. मी पकडलेल्या या तस्कर सापाला डोळे नसल्याचे पाहून याची माहिती घेण्याकरिता सर्प अभ्यासक राहुल शिंदे यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी हा प्रकार अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असून या सापाचे योग्य निरीक्षण करून त्यावर संशोधन करता आले, ही आनंदाची बाब आहे. या संशोधनात सहभागी असणाऱ्या सर्वांचा मी आभारी आहे.

**अनिल कानस्कर,** पुणे

# पार्किंग जागांचा कमर्शियल वापर महापौरांनी थांबवावा

## ● शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सुटणे आणि पार्किंगची सुविधा होण्यास होईल मोठी मदत

## ● महापौर, उपमहापौर, पक्षनेता, विरोधी पक्षनेत्यांसह सर्व नगरसेवकांनी सुंदर सोलापूर, स्वच्छ सोलापूरसाठी घ्यावा पुढाकार

**सोलापूरचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी पदभार घेतल्यापासून सोलापूरच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य देत नुकतेच शहर पोलिस आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेवून शहरातील वाहतूक समस्या सोडविणे आणि पार्किंगची सुविधा यासाठी चर्चा करून मार्ग काढण्यासंदर्भात हालचाली सुरु केल्या हे खरंच कौतुकास्पद आहे. परंतु महापौरांनी सर्वप्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, शहरातील वाहतूक समस्या आणि पार्किंग सुविधा नसणे हे सर्व का होते आहे. याला महत्वाचे कारण म्हणजे शहरातील काही अपवाद वगळता बहुतांश इमारतींमधील पार्किंगच्या जागांचा वापर हा कमर्शियल झालेला आहे. शहरातील व्हाआयपी रोड, प्रमुख चौक यासह आता जुळे सालापूर आणि शहरातील विविध भागात उभारण्यात येत असलेल्या रहिवासी अन् कमर्शियल अनेक इमारतींमधील पार्किंगच्या जागा या पार्किंगसाठीच वापरल्या जातात की, या पार्किंगच्या जागांचा वापर कमर्शियल कारणासाठी होतो आहे. महापालिका पथकांकडून याप्रकाराची सर्वप्रथम तपासणी होणे गरजेचे आहे. महापालिकेच्या नगररचना आणि बांधकाम परवाना विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संगनमताने तर हे झाले अथवा होत नाही ना? याचीही गांभीर्याने चौकशी होणे गरजेचे आहे. कारण महापालिका बांधकाम परवाना विभागातील अधिकाऱ्यांनीच समांतर प्रशासकीय बोगस बांधकाम परवाना विभाग सुरु केला होता अन् याप्रकरणी पोलिसात गुन्हाही दाखल आहे. महापौरांना काही करावयाचे असल्यास हे अगोदर करावे.**






### पार्किंग जागांचा सर्रास गैरवापर

शहरातील बहुतांश इमारतींमधील पार्किंग जागांचा वापर कमर्शियल कारणासाठी सर्रासपणे होतो आहे. शहरातील अनेक दवाखाने प्रमुख रस्त्यांवर, चौकांमध्ये असून येथील पार्किंग जागांचा वापर ओपीडी अथवा स्टोअरूम, मेडिकल दुकान यासाठी केलेला दिसून येतो. यामुळे याठिकाणी वाहने घेवून येणारे आपली वाहने रस्त्यावर उभी करून जातात. त्यामुळे रस्त्यावर वाहतूककोंडीची समस्या निर्माण होते. बांधकाम आणि वापर परवाना दिला जात असताना महापालिकेची यंत्रणा डोळेझाकपणे काम करते असे यावरून दिसून येते. बांधकाम, नगररचना या विभागाशिवाय इतर विभागातील कर्मचाऱ्यांकडून याप्रकाराची तपासणी करून महापौरांनी वस्तुस्थिती जाणून घेतल्यास सोलापूरची पार्किंग समस्या मोठ्या प्रमाणात सुटू शकते.



### वाहतूक पोलिस विभागाचे महत्व

महापालिकेने बांधकाम परवाना दिल्यानंतर वापर परवाना घेणे बंधनकारक आहे, पण अनेकजण वापर परवानाच घेत नाहीत. मनपा अधिकारी संगनमत करतात म्हणून वापर परवाना देताना शहर वाहतूक शाखेचे नाहरकत पत्र बंधनकारक केल्यास संबंधित इमारतीमध्ये पार्किंग जागा सोडली आहे का आणि त्या जागेचा वापर कमर्शियल होत नाही याची खात्री वाहतूक पोलिस विभागाने केल्यास अशा प्रकारांची जबाबदारी महापालिका व पोलिस यांच्यावर संयुक्तपणे जावू शकते.

### फायर एनओसी तपासणी गरजेची

मनपा नियमानुसार ठराविक उंचीच्या इमारतींच्या विकासकांनी इमारतींमध्ये आग प्रतिबंधक यंत्रणा उभारणे बंधनकारक आहे. इमारत बांधतांना त्या परिसरात अग्निशामक गाडी तिथे पोहचू शकेल इतकी जागा असणे गरजेचे आहे. बांधकाम व वापर परवाना देताना महापालिकेची संबंधित यंत्रणा चिरिमिरीसाठी याकडे दुर्लक्ष करते आणि मोठी दुर्घटना घडून जिवितहानी झाल्यानंतर मात्र सर्व यंत्रणा धावपळ करते आणि ब्लेमगेम सुरु होतो, पण अशा दुर्घटनांमध्ये निष्पापांचे बळी जातात. यासाठी महापौरांनी गांभीर्याने लक्ष घालून पालिका यंत्रणेवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करणे अपेक्षित आहे.

### गृहनिर्माण सोसायट्यांमधील बंधनकारक रिकाम्या जागांचा गैरवापर

एखाद्या विकासकाला गृहनिर्माण सोसायटी उभारण्यास परवानगी देताना महापालिकेकडून अनेक नियम व अटी घातल्या जातात पण त्याचे सर्रासपणे उल्लंघन होताना दिसते. अनेक सोसायट्यांमधील नियमानुसार सोडलेल्या मोकळ्या जागा बिल्डरकडून महापालिकेला हस्तांतर केल्या जात नाहीत अन् या जागांचा गैरवापर केला जातो. सोसायट्यांमधील घरे विकत घेणाऱ्यांना पाणी, ड्रेनेज, लाईट, मुलांना खेळण्यासाठी रिकामी जागा बिल्डरकडून या सुविधा दिल्या जात नाहीत. तर अनेकदा संबंधित प्रभागाचा नगरसेवकच मनपा निधीतून ही विकासकामे करताना दिसतात. संबंधित बिल्डर मात्र घर विकून पैसे कमवतो. मनपा यंत्रणा याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करते. महापौरांनी याकडे लक्ष दिल्यास अनेक समस्या सुटू शकतात.

### अनेक वसाहतीत अनधिकृत बांधकामे

गावठाणासह जुळे सोलापुरातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये अनेकांनी जुनी घरे पाडून बहुमजली इमारती उभारल्या आहेत. हे करत असताना अंगणातील व घराच्या मागच्या रिकाम्या जागांमध्ये बांधकाम केले आहे. बांधकाम परवाना वेगळा आणि बांधकाम पूर्ण वेगळे असे प्रकार मोठ्या प्रमाणात आहेत. यामुळे महापालिकेचा महसूल तर बुडतच आहे पण अनेक घरांना धोका निर्माण झालेला आहे. जुळे सोलापुरातील पनाश इमारतीप्रमाणे अनेक प्रकार सुरु असतानाही महापालिका प्रशासन याकडे अक्षम्य डोळेझाक का करते हा गंभीर विषय आहे. असे प्रकार भविष्यात वाढल्यानंतर महापालिकेला कारवाईची जाग येते मग लोक विरोध करतात. असे प्रकार रोखण्यासाठी महापौरांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

### घरांच्या अंगणात थाटली दुकाने

शहर, हद्दवाढ भागात अनेक ठिकाणी ज्यांची घरे रोडलगत आहेत, अशांनी घराच्या अंगणात दुकाने थाटली आहेत. जुळे सोलापुरातील भंडारी मैदानाच्या समोरील म्हाडाच्या सोसायटीतील रोडलगतच्या सर्वच घरांनी अंगणात दुकाने बांधलेली असून हॉटेल्स सुरु केली आहेत. यामुळे या रस्त्यावर दिवसरात्र वाहने उभारलेली असतात आणि वाहतुकीला अडथळा होतो अन् अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या हॉटेल्सकडून सांडपाणी रस्त्यावरच सोडण्यात येत असल्याने नवीन रस्त्यांची लवकर दुरवस्था होते. घर रहिवासी आणि वापर मात्र वाणिज्य होत असल्याने महापालिकेच्या टॅक्सचीदेखील मोठ्या प्रमाणात चोरी होत असून महसूल नुकसान होत आहे. महापौरांनी याकडे लक्ष देणे महत्वाचे आहे.

### भाजीमंडई ओस अन विक्रेते रस्त्यावर

शहरातील अनेक भाजी मंडई अशा आहेत की त्या मंडईत भाजी, फळ विक्रेते बसत नाहीत तर ते रस्त्यावर अतिक्रमण करून बसतात. त्यामुळे वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होते. जुळे सोलापुरातील डीमार्ट चौकात संध्याकाळी चालायला जागा नसते इतक्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावर अतिक्रमण असते. एकट्या विजापूर रोडची परिस्थिती महापौरांनी समक्ष जावून पहावी, उपमहापौर तर जुळे सोलापुरातच राहतात. छत्रपती संभाजी महाराज तलाव रोडवर तर फळविक्रेते जीवघेण्या परिस्थितीत रस्त्यावर अतिक्रमण करून भोंगे लावून गाड्यांवर व्यवसाय करत असल्याचे चित्र सर्रास असते.

### अतिक्रमण कारवाई दिखावाच

गेल्या काही महिन्यात शहरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण विरोधी कारवाई होताना दिसते, पण कारवाईनंतर काही वेळातच अतिक्रमण पुन्हा जैसे थे असते. मग अशा दिखाव्याच्या कारवाईने कायमचे प्रश्न कसे सुटणार आहेत. अतिक्रमण कारवाई करताना साहित्य जप्त, मोठा आर्थिक दंड आणि पोलिस गुन्हा दाखल करण्यासारखी कारवाई सातत्याने झाल्यास हे प्रकार रोखण्यास मदत होणार आहे. अतिक्रमण विभागाने एकाच रस्त्यावर दररोज महिनाभर दिवसभर कारवाई सुरु ठेवली तर असे प्रकार थांबून लोकांना सुरक्षित वाहने चालविणे शक्य होणार आहे.



### भाजी मंडईच्या जागांवर बहुमजली पार्किंग उभारावे...

शहरातील अपवाद वगळता बहुतांश भाजी मंडईमध्ये भाजी, फळे विक्रेते बसत नाहीत. मंडईतील ओट्यांचा वापर स्टोअर म्हणून करतात आणि रस्त्यावर बसून व्यापार करतात. त्यामुळे शहरात सर्रास वाहतूक कोंडी पहावयास मिळते. लक्ष्मी मंडईच्या परिसरात तर सर्वचजण रस्तयावर बसून व्यवसाय करतात. भंगारवाल्याचे साहित्य रस्त्यावर पडलेले असते. लोकांना फुटपाथ असते हे तर आता माहितीच होत नाही. महापालिकेने भाजी मंडईतील काही भागावर बहुमजली पार्किंगची सुविधा उभारली तर शहरातील पार्किंग समस्या मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होणार आहे. महापौरांनी पोलिसांची बैठक नक्कीच घेवून पार्किंग समस्येवर चर्चा करावी, पण अगोदर महापालिकेपासून कारवाईची सुरुवात केली तर सोलापूरकर महापौरांचे नक्कीच कौतुक करतील, यात शंका नाही.



# जीवन समजून घ्यायचे असेल तर साहित्याकडे वळा

## सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार; लोकमंगल साहित्य पुरस्काराचे थाटात वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

साहित्य हे समाजाला विचार, संस्कार आणि संवेदनशीलता देणारे प्रभावी माध्यम असून, लोकमंगल साहित्य पुरस्कारांच्या माध्यमातून हीच जाणीव अधिक बळकट होते. प्रत्येकाला आपले जीवन समजून घ्यायचे असेल तर त्यांनी साहित्याकडे वळावे, असे प्रतिपादन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केले.

सोलापूरातील अँपी थिएटर येथे शनिवारी आयोजित लोकमंगल साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दक्षिण सोलापूरचे आमदार व लोकमंगल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सुभाष देशमुख होते. आधुनिक जीवनशैलीमुळे माणूस यंत्रांवर अधिक अवलंबून झाला असून, निसर्ग, माणुसकी आणि भावनांपासून दूर जात आहे. अशा काळात प्रत्येक गोष्टीत सकारात्मकता शोधण्याची वृत्ती जोपासली पाहिजे. परमेश्वराने निर्माण केलेल्या प्रत्येक घटकाला समजून घेतल्यास जीवन अधिक समृद्ध होईल. प्रत्येकामध्ये चांगले पाहण्याची दृष्टी निर्माण झाली, तर जीवनात 'मोगरा' फुलेल, असेही शेलार यांनी नमूद केले.

यावेळी विविध साहित्यिकांच्या उल्लेखनीय साहित्यकृतींचा सन्मान करण्यात आला. प्रसाद कुमठेकर (वसई) यांच्या 'इतर गोष्टी', प्रदीप सिद्धभट्टी (बुलढाणा) यांच्या 'विस्मरणाच्या अरण्यात', चित्रा पालेकर (मुंबई) यांच्या 'तर अशी सारी गंमत' तसेच मयूरेश कुलकर्णी (पुणे) यांच्या 'त्सुबाकी स्टेशनर्स' या कादंबरीच्या अनुवादाला लोकमंगल पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच ज्ञानेश्वर जाधवर (बोरगाव, ता. बार्शी) यांच्या 'शून्यरेषा' या विज्ञान कादंबरीलाही सन्मानित करण्यात आले. साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे यांना विशेष सन्मान देण्यात आला. प्रत्येक पुरस्कारामध्ये २५ हजार रुपये रोख रक्कम, गौरवचिन्ह आणि सोलापुरी चादर देण्यात आली. समन्वयिका शोभा बोल्ली तसेच निवड समितीतील नितीन वैद्य, प्रा. डॉ. ऋचा कांबळे, शिरीष देखणे आणि डॉ. दत्ता घोलप यांचाही सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर उपस्थित होत्या. कार्यक्रमात आशिष शेलार व अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. प्रास्ताविक आमदार सुभाष देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन शोभा बोल्ली यांनी मानले.

### जिल्ह्याने आमदार देशमुखांकडून शिकावे

लोकमंगलच्या विविध योजना पाहिल्यावर आमदार देशमुख यांचे मंगल कार्य कळून येते. आमदार सुभाष देशमुख यांचे काम बोलते. कमी बोलणे आणि जास्त काम करणे हे सुभाष देशमुख करतात. त्यामुळे राज्यातील ते ताकदवर आमदार आहेत आम्हीही त्यांच्यापासून काहीतरी शिकतो आहे. जिल्ह्यानेही त्यांच्याकडून शिकले पाहिजे, असे नामदार शेलार म्हणाले.

# पिकअपची चारचाकीला धडक

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

घरी जात असताना दि. १८ मार्च रोजी त्रिदेव भीमराव मोगल वय ३१, रा. १४३ / ४४ रेल्वे लाईन, सोलापूर हे एलपीजी पेट्रोल पंप समोर आले असता पिकअप क्रमांक एम एच २५ एजे ४९०१ चा चालक याच्या ताब्यातील पिकप हे रस्ता क्रॉस करून त्रिदेव यांच्या मारुती ईरटिगा मॉडेल नंबर एम एच १३ डी एम ८५७६ कारच्या उजव्या बाजूच्या मागील दरवाज्याला धडक देऊन त्रिदेव यांच्या कारच्या मागील बाजूच्या बंपरला धडक देऊन नुकसान केले आहे. याबाबत जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दि. २० मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास रुपनर करत आहेत.



### कुर्म अवतार...

**पूर्व विभाग श्रीराम मंदिरच्या वतीने श्रीराम नवमीनिमित्त शनिवारी प्रभु श्रीरामास कुर्म अवताराने अलंकृत करण्यात आले होते.**





# एस.पी. प्रतिष्ठानच्या आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी चंदनशिवे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**



भीम युवक क्रीडा मंडळ संचलित एस.पी. प्रतिष्ठानच्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त वार्षिक बैठक घेण्यात आली. या बैठकीत उत्सव अध्यक्षपदी यशराज चंदनशिवे यांची निवड करण्यात आली.

यावेळी मंडळाचे आधारस्तंभ सिद्धेश्वरजी पांडगळे व प्रतिष्ठान चे संस्थापक समीर पांडगळे यांच्या मार्ग मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. या वेळी सर्व प्रथम भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच पूजा करून बुद्ध वंदना घेण्यात आली त्या नंतर बैठक महादेव तोरणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.







**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## सोरोजीन कंपनीच्या स्टोअरमधून ९.६५ लाखांचा कॉपर केबलची चोरी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**
धाराशिव तालुक्यातील शेकापूर शिवारातील सोरोजीन कंपनीच्या स्टोअर यार्डमधून तब्बल ९ लाख ६५ हजार ७०० रुपयांच्या कॉपर केबल बंडलची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

दि २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजण्यापूर्वी अज्ञात चोरट्यांनी ज्युनिपर एन २५२३४४६ व एन २५२३४४७ नेसलमधील एकूण ६२ विद्युत कॉपर केबल बंडल चोरून नेल्याची माहिती समोर आली आहे.

याप्रकरणी फिर्यादी अनिल मधुकर तिर्थकर (वय ४२, रा. रुईभर, ता. धाराशिव) यांनी दि.२० मार्च रोजी तक्रार दाखल केली. त्यावरून धाराशिव शहर पोलीस ठाणे येथे भा.न्या.सं. कलम ३०३ (२) सह कलम १३६ वीज अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### जयप्रकाश विद्यालयात जागतिक वन दिन वृक्षारोपणाने साजरा

**धाराशिव, दि.२१ मार्च -**
जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे जागतिक वन दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष दादा कोळगे, रामदास कोळगे, घुटे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, विकास क्षीरसागर तसेच भिंगडे व इतर कर्मचारी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

### 'ज्ञानसंस्कार'चा नवोदय परीक्षेत उल्लेखनीय निकाल

**लोहारा, दि.२१ मार्च -**
लोहारा येथील ज्ञानसंस्कार कोचिंग क्लासेसने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



१३ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थी पात्र ठरले असून अजिंक्य भोंडवे (९८.७५), ओमकार शिंदे (९७.५०) व हर्षद ढोबळे (९७.५०) यांनी उत्तम यश मिळवले. विशेष म्हणजे ही क्लासेसची पहिलीच बॅच असून ७ विद्यार्थ्यांनी ९० पेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. या यशामागे प्रा. गणेश गुंड यांचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांची मेहनत महत्त्वाची ठरली.



### आळणी गावाचा अभिमान; डॉ. दिव्या वीर हिला एमबीबीएस पदवी प्रदान

**धाराशिव, दि.२१ मार्च -**
धाराशिव तालुक्यातील आळणी येथील डॉ. दिव्या अरुण वीर यांनी भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज मधून एमबीबीएस पदवी संपादन केली. ग्रामीण पार्श्वभूमीतून येत त्यांनी जिद्द व परिश्रमाच्या जोरावर डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण केले. त्यांच्या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण असून ग्रामस्थांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. डॉ. दिव्या वीर ही दिव्यंगत माजी सरपंच अरूण (पापा) वीर यांची सुकन्या असून आळणी गावचे विद्यमान सरपंच प्रमोद वीर यांची ती पुतणी आहे.



### तोरंबा शाळेत हनुमान यात्रेनिमित्त भव्य शोभायात्रा

**लोहारा, दि.२१ मार्च -**
लोहारा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तोरंबा येथे श्री हनुमान यात्रेनिमित्त भव्य शोभायात्रा व नृत्याविष्काराचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालय ते हनुमान मंदिर दरम्यान काढण्यात आलेल्या या शोभायात्रेत इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी हनुमान, राम, लक्ष्मण, सीता व वानर यांची आकर्षक वेशभूषा परिधान करून केसरी के लाल, रामजी की निकली सवारी यांसारख्या गीतांवर बहारदार नृत्य सादर केले. या कार्यक्रमासाठी सहशिक्षक गहिनीनाथ माने व मुख्याध्यापक आशा मोहीते यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषद सभापतींची निवड २७ मार्चला!

**विशेष सभेचे आदेश जारी, राजकीय मोर्चेबांधणी सुरु ...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**
जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीनंतर आता सभापती पदांसाठी अधिकृत तारीख जाहीर झाल्याने इच्छुकांनी राजकीय हालचालींना वेग दिला आहे. २७ मार्च रोजी होणाऱ्या या बैठकीत कोणाला संधी मिळते आणि कोण बाजूला पडतो, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

जि.प. राजकारणात आता खऱ्या अर्थाने निर्णायक टप्पा सुरू झाला असून, रिक्त असलेल्या विषय समिती सभापती पदांच्या निवडीसाठी २७ मार्च रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी अधिकृत आदेश जारी करत प्रशासनाला तयारीला लागण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ मधील कलम ८३ तसेच १९६२ च्या निवडणूक नियमांनुसार अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समिती सभापतींची निवड निश्चित मुदतीत करणे बंधनकारक आहे. याच अनुषंगाने ही विशेष सभा बोलावण्यात आली आहे. या बैठकीसाठी पीठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या देखरेखीखाली संपूर्ण प्रक्रिया पार पडणार आहे. २७ मार्चला सकाळी ११ वा. सभेला सुरुवात होणार असून, दुपारपर्यंत सभापती पदांवर अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. गेल्या काही महिन्यांपासून जिल्हा परिषदेत सुरू असलेल्या सत्तासंघर्षामुळे या निवडीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. अर्थ, शिक्षण, आरोग्य आणि बांधकाम या महत्त्वाच्या समित्यांच्या सभापती पदांसाठी सत्ताधाऱ्यांमध्येच तीव्र चढाओढ होण्याची चिन्हे आहेत.

### तालुका समतोलाचा प्रश्न ऐरणीवर; उर्वरित तालुक्यांना प्रतिनिधित्व मिळणार का?...

जिल्हा परिषदेत अध्यक्षपद धाराशिव तालुक्याला आणि उपाध्यक्षपद उमरगा तालुक्याला मिळाले असून आता उर्वरित तालुक्यांकडे लक्ष केंद्रित झाले आहे. विशेषतः परंडा, भूम, कळंब आणि तुळजापूर या तालुक्यांना विषय समित्यांमध्ये प्रतिनिधित्व मिळणार का, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सत्तासंतुलन राखण्यासाठी विविध तालुक्यांना संधी देण्याची परंपरा लक्षात घेता, या चार तालुक्यांतील इच्छुकांनी लॉबिंग सुरू केल्याचे दिसत आहे. विषय समित्यांच्या सभापती पदांद्वारे राजकीय वजन वाढवण्याची संधी असल्याने स्थानिक नेते सक्रिय झाले आहेत. अर्थ, शिक्षण, आरोग्य, बांधकाम, समाजकल्याण, कृषी यांसारख्या महत्त्वाच्या समित्यांमध्ये या तालुक्यांना स्थान मिळते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सत्ताधारी गटामध्येच समतोल साधण्याचे मोठे आव्हान असल्याने अंतिम क्षणापर्यंत राजकीय हालचाली वेगात राहण्याची शक्यता आहे.

## धाराशिव जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**
जिल्हा तसेच शहर परिसरात रमजान ईद (ईद-उल-फित्र) मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. पवित्र रमजान महिन्यातील तीस दिवसांच्या रोज्यानंतर मुस्लिम बांधवांनी आज (दि.२१) सकाळी मोठ्या संख्येने इदगा मैदानावर एकत्र येत नमाज अदा केली.

सकाळी सुमारे नऊ वाजता नमाज पठण पार पडले. नमाजानंतर उपस्थितांनी एकमेकांना 'ईद मुबारक'च्या शुभेच्छा देत आनंद व्यक्त केला.

लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांमध्ये सणाचा उत्साह ओसंडून वाहताना दिसला. यावेळी खा. ओम राजेनिंबाळकर, आ. कैलास पाटील, जिल्हा पोलीस अधिक्षक रितू खोखर तसेच विविध राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. शासकीय अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या उत्सवात सर्व धर्मीय नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक ऐक्याचा आदर्श संदेश दिला.

यावेळी परस्पर स्नेह, बंधुभाव आणि एकोप्याचे दर्शन घडवत ईदचा सण अधिक गोड झाला.

## तुळजापूरात आज 'इंद्रायणी विराट हिंदू संमेलन'

### सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**
येथील नळदुर्ग रोडवरील श्रीनाथ लॉन्स येथे रविवार (दि.२२) रोजी सायंकाळी ५.३० वा. 'इंद्रायणी विराट हिंदू संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनासाठी नागरिकांनी सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या संमेलनाच्या माध्यमातून गावपातळीवरील प्रश्न सोडवण्यासाठी ऊर्जा व संघटित शक्ती निर्माण करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. संमेलनात महंत इच्छागिरी महाराज (सोमवारगिरी मठाधिपती, तुळजापूर) यांचे आशीर्वचन लाभणार असून, सेवा भारतीचे अखिल भारतीय सहसंघटन मंत्री विजय पुराणीक हे मार्गदर्शन करणार आहेत.



या कार्यक्रमाचे आयोजन 'इंद्रायणी विराट हिंदू संमेलन समिती'च्या वतीने करण्यात आले आहे.

## कावड यात्रेने वाशी तालुका भक्तिमय; शिखर शिंगणापूरकडे भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ मार्च -**
वाशी तालुक्यात सध्या कावड यात्रांचा उत्साह शिगेला पोहोचला असून हर हर महादेवच्या जयघोषात हजारो भाविक श्री क्षेत्र शिखर शिंगणापूर (जि. सातारा) येथे मार्गस्थ होत आहेत.



चैत्र महिन्यातील शंभू महादेव यात्रेनिमित्त भाविक कावडीत पवित्र पाणी घेऊन पायी प्रवास करत जलाभिषेकासाठी निघाले आहेत. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या परंपरेत तरुणांसह महिला व ज्येष्ठ नागरिकांचाही उत्स्फूर्त सहभाग दिसून येत आहे.

वाशी तालुक्यातील कडकनाथवाडी-बार्शी मार्गावर भाविकांची मोठी वर्दळ असून डोक्यावर कावड, ओठांवर हर हर महादेवचा गजर आणि अंगात भक्तीचा उत्साह असे वातावरण सर्वत्र पाहायला मिळत आहे. चैत्र यात्रेमुळे तालुक्यात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

## कत्तलीसाठी ठेवलेली बेकायदेशीर गोवंशीय जनावरे जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**
धाराशिव शहरातील खिरणीमळा परिसरात गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या ठेवून त्यांच्यावर क्रूरता केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

या प्रकरणी मुसाविर मतीन कुरेशी (वय २५, रा. आझाद चौक, कुरेशी गल्ली, धाराशिव) याने दि.१९ मार्च रोजी रात्री सुमारे १० वाजता एकूण १० खालवड, वासरे, खोंड व एक जर्शी गाय अशी सुमारे २ लाख १७ हजार रुपये किंमतीची जनावरे चारा-पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बांधून ठेवल्याचे आढळून आले.



या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाणे यांनी प्राण्यांवर क्रूरता प्रतिबंधक अधिनियम कलम ११ (१) (ब) तसेच पशु संरक्षण अधिनियम कलम ५ (अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## पारगाव येथे हरभरा खरेदी केंद्राचा शुभारंभ; शेतकऱ्यांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ मार्च -**
वाशी तालुक्यातील पारगाव येथे केंद्र शासनाच्या किमान आधारभूत किंमत (MSP) योजनेअंतर्गत हरभरा खरेदी केंद्राचा शनिवार (दि.२१) रोजी शुभारंभ करण्यात आला. NFED व महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांच्या माध्यमातून हे केंद्र सुरू करण्यात आले.

माजी मंत्री तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वाखाली तसेच भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन केशव ऊर्फ विक्रम सावंत यांच्या प्रयत्नातून हे केंद्र सुरू झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. हे खरेदी केंद्र 'शनेश्वर कृषी प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित, वाशी-पारगाव' यांच्या वतीने चालवले जाणार असून, हमीभावामुळे शेतकऱ्यांना योग्य दर मिळण्यास मदत होणार आहे. या केंद्राचे उद्घाटन युवा सेना जिल्हा प्रमुख बाळासाहेब मांगले यांच्या हस्ते पार पडले. यावेळी जिल्हा परिषद सदस्या सविता तळेकर, कृषी उत्पन्न बाजार समिती वाशीचे संचालक तथा शिवसेना उपतालुका प्रमुख विकास तळेकर, ग्राम पंचायत सदस्या अंजली समाधान मोटे यांच्यासह अनेक मान्यवर व शेतकरी उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांनी प्रमाणात नोंदणी करून हमीभावाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विकास भगवान तळेकर यांनी केले.

## उमरगा-लोहारा तालुक्यात नाट्यगृह उभारणीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ मार्च -**
उमरगा-लोहारा तालुक्यात नाट्यगृह उभारण्यात यावे, या मागणीसाठी तालुक्यातील कलावंतांनी आमदार प्रवीणजी स्वामी तसेच उमरगा नगर परिषद नगराध्यक्ष किरण गायकवाड यांना निवेदन दिले.



कर्नाटक व आंध्रप्रदेश सीमेलगत असलेला उमरगा तालुका हा बहुभाषिक असून विविधतेत एकता जपत मराठी संस्कृतीची परंपरा जतन करत आहे. मात्र, शासनदरबारी दुर्लक्षित राहिल्याने येथे लोककला व नाट्यकलेचा ऱ्हास होत असल्याची खंत कलावंतांनी व्यक्त केली.

उमरगा व लोहारा परिसराला लोककला, नाट्यकला आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची समृद्ध परंपरा लाभली आहे.

पूर्वी रात्रभर चालणारे नाट्यप्रयोग व मेळे रंगत असत; मात्र सध्या आवश्यक सुविधा, दर्जेदार प्रेक्षागृहाचा अभाव आणि प्रेक्षकांची कमी होत चाललेली आवड यामुळे ही कला मागे पडत आहे.

मुंबई-पुण्याच्या तुलनेत येथेही दर्जेदार कलावंत, लेखक, दिग्दर्शक व अभ्यासक मोठ्या प्रमाणात असून त्यांना व्यासपीठ उपलब्ध नसल्याने त्यांची घुसमट होत आहे. पारंपरिक कला जतन व्हावी आणि नव्या पिढीला संधी मिळावी, यासाठी नाट्यगृह उभारणी अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

यावेळी भागवत गायकवाड, किरण क्षीरसागर, युवराज जाधव, बालाजी साने, हिरेमठ षडाक्षरी, हिरेमठ पंचाक्षरी, तमा शेटगार आदी उपस्थित होते.

## धाराशिवमध्ये जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांना प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**
धाराशिव येथे 'मेरा युवा भारत' कार्यालय व छत्रपती क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदित्य पाटील (कार्यकारी अधिकारी, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, धाराशिव) होते, तर प्रमुख उपस्थिती म्हणून अक्षय बिराजदार (तालुका क्रीडा अधिकारी) उपस्थित होते.

मार्गदर्शनपर भाषण विश्वास खंदारे (तालुका क्रीडा अधिकारी, धाराशिव) यांनी केले. तसेच 'मेरा युवा भारत' कार्यालयाचे वैभव लांडगे, रविकांत सुरवसे, रोहिले गोविंद, ऋतुराज आगळे व छत्रपती क्रीडा मंडळाचे प्रा. प्रवीण बागल, रोहित चव्हाण, सुनील मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आदित्य पाटील यांनी युवकांना मोठ्या संख्येने क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.

क्रीडा क्षेत्रातील संधींचा लाभ घेऊन युवकांनी आपले कौशल्य सिद्ध करावे व देशाचे नाव उज्वल करावे, असे त्यांनी सांगितले.

या स्पर्धांमध्ये उमरगा, लोहारा, भूम व परंडा तालुक्यांतील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. खो-खो, कबड्डी, १०० मीटर धावणे, गोळा फेक, लांब उडी व स्लो सायकलिंग अशा विविध क्रीडा प्रकारांमध्ये सुमारे २०० ते २५० खेळाडूंनी सहभाग घेतला.

## यमगरवाडी संकूलात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा संपन्न

**क्रिकेट स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील विविध भागांतून तब्बल २२० माजी विद्यार्थी सहभागी...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ मार्च -**
तालुक्यातील यमगरवाडी येथील एकलव्य विद्या संकुलमध्ये माजी विद्यार्थी मेळावा व भव्य क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन तुळजापूर येथील पुजारी नगर फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भटके विमुक्त विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धवराव काळे व कार्यवाह विवेक अयाचित, समाजवादी पार्टीचे तालुका अध्यक्ष राहुल जाधव, बापू जगदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



माजी विद्यार्थ्यांच्या सहभागातून आयोजित करण्यात आलेल्या या क्रिकेट स्पर्धेचे यंदाचे चौथे वर्ष असून, महाराष्ट्रातील विविध भागांतून तब्बल २२० माजी विद्यार्थी सहभागी झाले आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याप्रसंगी मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर, प्रतिष्ठानचे सदस्य राजाभाऊ गिजरे, यमगरवाडी मित्र मंडळ (पुणे) येथील महेश गायकवाड, माजी विद्यार्थी विभाग प्रमुख अनिल घुगे, अण्णासाहेब मगर, संतोष बनसोडे, यशवंत निंबाळकर, माऊली भुतेकर यांच्यासह विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व शेवटी सर्व उपस्थितांचे आभार अनिल घुगे यांनी मानले.

## संक्षिप्त...

### नवोदय परीक्षेत स्वराज येरूळे याचे यश; आदर्श माध्यमिक विद्यालय कारेपूरचे नवोदय परीक्षेत यश



**रेणापूर :** रेणापूर तालुक्यातील कारेपूर येथील ज्ञानविकास शिक्षण संस्था संचलित आदर्श माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी चि.स्वराज शशांक येरूळे याने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत ९५ गुण घेऊन ग्रामीण भागातून ओबीसीमधून ८ वा क्रमांक तर सर्वसाधारण गुणवत्ता यादीत ६२ वे स्थान मिळवून पात्रता प्राप्त केली आहे. त्याच्या या यशामुळे विद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेच्या उज्वल यशपरंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल ज्ञानविकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव, आदर्श माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व संबंधितांनी चि.स्वराज आणि त्याच्या पालकांचे कौतुक करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. चि. स्वराज येरुळे याच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे. येरूळे परिवारकडून कौटुंबिक सोहळ्यात चि. स्वर-ाजचा सत्कार करून त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

### जनकल्याण निवासी विद्यालयात वर्षप्रतिपदेला अग्निहोत्राने हिंदू नववर्षाचे स्वागत



**लातूर :** हरंगुळ (बु.), ता. लातूर – जनकल्याण निवासी विद्यालयात वर्षप्रतिपदा तथा हिंदू नववर्षाचे स्वागत पारंपरिक पद्धतीने अग्निहोत्राच्या माध्यमातून करण्यात आले. विद्यालयाच्या मैदानात अग्निहोत्रांसाठी ११ अग्नीकुंडांची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी सुमारे सहाशे विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभागी होत नववर्षाची मंगल सुरुवात केली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संकल्प पाठ, अग्निहोत्र मंत्र, ईश्वरस्तुतीप्रार्थना उपासना मंत्र, दीपप्रज्वलन मंत्र,प्रात:कालीन आहूती मंत्राने सह संपूर्ण विधी पार पाडले. त्यानंतर राष्ट्र मंत्राच्या माध्यमातून राष्ट्रभावना व्यक्त करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी उज्वल आयुष्य, तेज, बल आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळावी, अशी प्रार्थना केली. या अग्निहोत्र कार्यक्रमासाठी प्रकल्पाध्यक्ष श्री. प्रकाशजी लातूरे हे सहपरिवार उपस्थित होते. तसेच इयत्ता सहावीचे पालक श्री. सचिन देशमुख यांनी सहकुटुंब सहभाग नोंदवला. यावेळी वसतिगृहातील सर्व पालक पर्यवेक्षकही कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती संगीता ताई भदाडे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी संचलन इयत्ता नववीतील विद्यार्थिनी समृद्धी चौधरी, प्रणाली थोरबोले, ईश्वरी तम्मेवार आणि ओम मगर यांनी केले. विद्यालयात पारंपरिक पद्धतीने साजरा झालेला हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, राष्ट्रभक्ती आणि आध्यात्मिकतेची जाणीव वाढवणारा ठरला.

### . देऊळवाडी येथे ३९२ रुग्णांची तपासणी, ४९ जणांचे रक्तदान; आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न





**उदगीर :** उदगीर तालुक्यातील आदर्श गाव देऊळवाडी येथे श्री समर्थ सद्गुरू धोंडूतात्या महाराज यांच्या ९४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर सर्व रोग निदान शिबिर व भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न झाले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी एकनाथ केदार यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून खुलताबादचे तहसीलदार संतोष गुट्टे, वैजापूरचे पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नागरगोजे यांची उपस्थिती होती. तसेच देऊळवाडी गावचे सरपंच शुभम केंद्रे व उपसरपंच संतोष केंद्रे यांचीही उपस्थिती होती. कै. त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान, उदगीर यांच्या वतीने आयोजित या शिबिराला ग्रामस्थ व पंचक्रोशीतील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये विविध आजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात एकूण ३९७ रुग्णांची तपासणी, तर ४९ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.ङ्गशिबिरात डॉ. विजय बिराजदार, डॉ. राधिका बिराजदार, डॉ. हर्षवर्धन जाधव, डॉ. उबेद शेख, डॉ. वसंत बलांडे, डॉ. महादेव मठपती लायन्स क्लबचे वैद्यकीय अधिकारी यांनी नागरिकांची तपासणी करून मोलाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबस माळेवाडे यांचे मार्गदर्शन लाभले. शिबिराची प्रस्तावना प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष संजय राजुळे यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास केदार यांनी केले. याप्रसंगी मोहन गडीकर, शेषराव फड ,वीरभद्र गोगे गणराज केंद्र विलास गताटे दत्ता गुट्टे, व समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखंड हरिनाम सप्ताह समिती, देऊळवाडी तसेच ग्रामपंचायत कार्यालय यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे गावात आरोग्याबाबत जनजागृती होऊन सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

# शेती परवडत नसल्याने शेतकऱ्यांचा कल वाट्याने देण्याकडे

**तभा वृत्तसेवा/शंकर मिटकर**

**शिरूर अनंतपाळ, दि. २१ मार्च :** ग्रामीण भागाचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव सह अनेक गावांतील शेतकरी मशागतीची तयारी जोरात करत असलेले दिसत असले तरी, निसर्गाच्या तडाख्यामुळे तसेच दिवसेंदिवस वाढत असलेल्या महागाईमुळे भांडवली शेती परवडत नसल्यामुळे तालुक्यातील अनेक शेतकरी आपली जमीन बटाव , हिस्सेवारी, किंवा खंडुन देण्यात धन्यता मानत आहेत. दोन वर्षापासून पाऊस समाधानकारक असला तरी एका मागून एक येणाऱ्या संकटामुळे शेतकरी बेजार झाला असून, आजच्या घडीला शेतकऱ्यांना शेती करणे परवडत नाही. म्हणून अनेक शेतकरी आवाक्या बाहेर लागत असलेल्या भांडवली खर्चामुळे आपली शेती हिस्सेवारी देताना दिसत आहेत. ज्या शेतकऱ्याकडे चार ते पाच एकर जमीन आहे ते शेतकरी ज्यांच्याकडे बैल बारदाना आहे अशांना एका वर्षासाठी दहा ते पंधरा हजार रुपये एकराने कसण्यासाठी देत आहेत. कोरोना महामारीच्या काळापासून निसर्गाच्या संतुलनात कमालीचा बदल घडला असून, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ यासारखे संकट निर्माण झाल्याने अनेक वेळा शेतकऱ्याने शेतीसाठी लावलेले भांडवल सुध निघत नाही. त्यामुळे जे शेतकरी उदार उसनवारी घेतलेली पैसे घेऊन आपल्या शेतात भांडवल लाव-तात ते दिवसेंदिवस अधिकच कर्जबाजारी होत आहेत. नैसर्गिक आपत्तीसह शेतकऱ्यांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. रासायनिक खते, बी बियाणे, यांच्या किमती गगनाला भेटलेल्या आ-हेत. मजुराच्या टंचाईमुळे वाढलेली मजुरी, सतत उद्भवणारी बोंड आळी, वाहतुकीचा वाढलेला खर्च, जमीन मशागतीचा वाढलेले दर, उत्पादनात झा-लेली घट, यासारख्या असंख्य समस्यांना सध्या शेतकरी तोंड देत आहेत. त्यामुळे



हताश होऊन अनेक सामान्य शेतकरी आपली जमीन बैल बारदाना असणाऱ्या शेतकरी किंवा शेतमजुरांना हिस्सेवारी किंवा एक दोन वर्षासाठी १०/१५हजार रुपये एकराच्या बोलीवर कसण्यासाठी देत आहेत. पूर्वी जे नौकरदार शेतकरी बाहेरगावी नोकरीसाठी तेच शेतकरी आपली जमीन हिस्सेवारी देत होते. मात्र आता वर्षानुवर्ष शेती करणारा सधन शेतकरी ही शेतीमध्ये येत असलेल्या अनंत अडचणी तसेच भांडवली खर्च परवडत नसल्याने आपली जमीन बटाव, हिस्सा,खंडुन देण्यात धन्यता मानत आ-हेत. बाजारपेठेमध्ये सर्व वस्तूंचे भाव गग-नाला भिडले परंतु शेतकऱ्याच्या मालाला भाव आला नाही. किराणा मालाचे भाव गगनाला भिडले आहेत. शेती योग्य वस्तू यामध्ये बी बियाणे, रासायनिक खते, औषधे, अवजारे यासारख्या वस्तूंचे भाव दिवसेंदिवस वाढतच आ-हेत. शेतकऱ्याचा माल बाजारपेठेत घेऊन जायचं असेल तर हमालीचे भाव पूर्वी-पेक्षा तिप्पट वाढले आहेत. वाहतुकीचे दर ही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. घर बांधण्यासाठी विटा, सिमेंट, वाळू, खडी, लोखंड, कारागीर, मिस्त्री, बिगारी यांचे भाव वाढले, परंतु शेतकऱ्याचे नशीब असे आहे की, आयुष्यभर राबराब राबून दुसऱ्याच्या तोंडात घास भरवणारा जगाचा पोशिंदा आज चोहूबाजूने संकटात सापडला आहे. आणि त्याच्याच मालाला भाव मिळत नाही ही मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे शेतकरी त्रस्त झाला असून, कर्जबाजारीपणामुळे हताश होऊन शेती करणे नकोशी वाटत असल्याने आपली जमीन दुसऱ्या शेतकऱ्याला किंवा शेतमजुराला ज्याच्याकडे बैल बारदाणा आहे अशांना वाट्याणे, किंवा खंडुन देण्यात आपली पसंती देताना दिसत आहेत.

## समर्थ पब्लिक स्कूल चे विद्यार्थी नवोदय प्रवेशास पात्र

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २१ मार्च :** नवोदय वर्ग ६ वी प्रवेश परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच लागला ज्यात समर्थ पब्लिक स्कूलच्या भार्गव राजीव मुंढे हा विद्यार्थी ९५% गुण घेऊन नवोदय विद्यालयाच्या प्रवेशासाठी पात्र झाला आहे. या सोबतच आदित्य संजय पाटील ९३.७५%, आदित्य अच्यूत भंडे ९१.२५% व समर्थ ओमप्रकाश चाफेकर ९१.२५% गुण घेऊन परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. आणखी बऱ्याच विद्यार्थ्यांना चांगले गुण मिळाले आहे.

समर्थ पब्लिक स्कूल मध्ये जून २०२५ पासून प्रथमच शाळेतील शालेय अभ्यासक्रमासोबतच ५ वी वर्गासाठी नवोदय परीक्षेची तयारी करुन घेण्यास सुरुवात केली. काही तास नवोदय परी-क्षेचे वेगवेगळया विषयाच्या तयारीसाठी वर्षभर राखुन ठेवले व विद्यार्थ्यांची तयारी करुन घेतली.

यासोबतच सराव परीक्षेचाही वेगळा टाईम टेबल करुन भरपूर सराव परीक्षा



घेतल्या. प्रत्येक सराव परीक्षेच्या पेप-रचे सोल्यूशन दुसऱ्या दिवशी घेऊन विद्यार्थ्यांच्या अडचणी वर्षभर दूर केल्या व पूढेही हा उपक्रम शाळेत आणखी जोमाने सूरु राहील. वरील विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे श्री गुट्टे , भोसले व प्रतिमा मॅडम यांचे अभिनंदन सर्व कर्मचारी, प्राचार्य सथीश मॅथ्यू, उपप्राचार्या डॉ. सुमन लामतूरे तसेच संस्थेचे अध्यक्ष प्रा. जगताप, सचिव प्रा. फुलमंटे व उपाध्यक्ष तथा प्राचार्य प्रा. कुलकर्णी यांनी सर्वांचे अभिनंदन केले. या यशामुळे वरील विद्यार्थी व समर्थचा नावलौकिकात भर पडला आहे.

## महिला शेतकरी गटांसाठी कृषी अवजारे बँक स्थापनेची संधी; ५ एप्रिलपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) अंतर्गत ग्रामीण भागात शेतकऱ्यांना आधुनिक कृषी यंत्रसामग्री भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यासाठी एक गाव, एक कृषी अवजारे बँक या तत्त्वावर महिला शेतकरी गटांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नोंदणीकृत महिला स्वयंसहाय्यता गट, उमेद महिला गट किंवा महिला ग्राम संघ यांना गावस्तरावर कृषी अवजारे बँक स्थापन करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा यंत्रसामग्रीवर होणारा खर्च कमी होईल आणि शेती उत्पादकता वाढेल. निवड झालेल्या महिला गटाला कमाल ४० लाख रुपयांपर्यंत लाभ मिळू शकतो. फार्मर कप स्पर्धेत सहभागी झालेल्या महिला शेतकरी गटांना या योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात येईल. तरी इच्छुक महिला गटांनी https://dbt-ndksp-agribusiness.mahapocra.gov.in/ या अधिकृत पोर्टलवर जाऊन ५ एप्रिल २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत. अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून, प्रत्येक गावातील पात्र गटांची निवड पारदर्शक पद्धतीने केली जाईल. लातूर जिल्ह्यातील महिला गटांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प संचालक दिलीप जाधव यांनी केले आहे.

## दयानंद विज्ञानमध्ये संगणकशास्त्र विभागातील बी.सी.एस.तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागातील बी.सी.एस.तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम दि.१५ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला होता.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने,विभाग समन्वयक डॉ. संगीता जाजू,प्रा.सुजाता काळे,प्रा.वैभव कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी अध्यक्षीय समारोपामध्ये महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यश मिळवायचे असल्यास शिस्त आणि मेहनतीशिवाय पर्याय नाही. त्यामुळे मेहनत, जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर करिअर घडवा असे सांगितले.प्रास्ताविकातून संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे यांनी आपली काम करण्याची पद्धत आणि कामाचे कौशल्य इतक्या उत्कृष्ट पद्धतीने असावे की, त्यावरती कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित नाही केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.तसेच डॉ.गजानन बने असे म्हणाले, महाविद्यालयातील जीवन आणि या जीवनातील आठवणी अनुभवांची शिदोरी असते,त्यात जुळणारे मित्र हे आयुष्यभराचे सोबती बनतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते.तसेच डॉ. संगीता जाजू असे म्हणाल्या की, कॉलेज जीवन हे करिअर घडविण्याचे असते, तुम्ही ज्या पद्धतीने योग्य सवय,वळण लावून व वेळेचे नियोजन करून यशस्वी झाले पाहिजे असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विणा भंडारी, गौरी मराळे, रितिका राठोड, सादेवड विश्वजीत, गंगाधर सुरणार, मधुरा धानोरकर,वैभवी मर्डिकर यांनी केले तर आभार विद्यार्थीनी वैभवी मार्डिकरने मानले.यावेळी बी.सी. एस.तृतीय वर्षातील तनुजा भोसले, प्रणव कुलकर्णी आणि श्रद्धा जाधव या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून महाविद्यालयातील तीन वर्षांच्या आठवणी सांगितल्या.याप्रसंगी प्रा.मंगेश सुगरे, प्रा.पूजा नंदगावे, प्रा.व्ही.ए.पवार, प्रा.आशा बोराडे, प्रा.अरूणा चौधरी, प्रा.सुमित जोशी, प्रा.बांगड, प्रा.दीपाली दाडगे, प्रियंका हिप्परकर, मानसी गायकवाड, संजय पांडे, राहुल बनभेरू आदींची उपस्थिती होती.महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांचे मनापासून आभार व्यक्त करताना अतिशय भावपूर्ण वातावरणात निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

## देवणी येथे २ एप्रिल रोजी महादेव यात्रेनिमित्त पशु व पक्षी प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत देवणी येथे गुरुवार, २ एप्रिल २०२६ रोजी जिल्हास्तरीय पशुप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनासाठी पशुधन व कुक्कुट गटांची नोंदणी २ एप्रिल रोजी प्रदर्शनस्थळी सकाळी ८.३० वाजता सुरु होईल व उद्घाटन ठिक ११ वाजता करण्यात येणार आहे. या पशु प्रदर्शनात देशी गोंवश (देवणी व लालकंधारी), संकरीत गोवंश, उस्मानाबादी शेळी, अश्र्व व कुकुट पक्षी मोठ्या संख्येने सहभागी होतात.

सर्व पशुपालकांनी आपल्या जातीवंत पशुधनासह या भव्य पशु व पक्षी प्रदर्शनात सहभागी होवून यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवणी पंचायत समितीचे पशुधन विकास अधिकारी यांनी केले आहे.

**असे राहतील पशुधनाचे गट**

**देवणी नर गट –**

१) देवणी नर १ वर्षाखालील वासरे गट

२) देवणी नर १ वर्षावरील वासरे अदात गट

३) देवणी नर २ दात वळू गट

४) देवणी नर ४ दात वळू गट



**देवणी मादी गट –**

१) देवणी मादी १ वर्षाखालील वासरे गट

२) देवणी मादी एक वर्षावरील वासरे गट

३) देवणी मादी गाभण कालवड गट

४) देवणी मादी गाभण गाय गट

५) देवणी मादी दुधाळ गाय दुधाळ गट

**लालकंधारी नर गट –**

१) लालकंधारी नर १ वर्षाखालील वासरे गट

२) लालकंधारी नर १ वर्षावरील अदात गट

३) लालकंधारी नर २ दात वळू गट

४) लालकंधारी नर ४ दात वळू गट

५) लालकंधारी नर ६ दात वळू गट

**लालकंधारी मादी गट –**

१) लालकंधारी मादी १ वर्षाखालील वासरे गट

२) लालकंधारी नर एक वर्षावरील अदात गट

३) लालकंधारी मादी गाभण कालवड गट

४) लालकंधारी मादी गाभण गाय गट

५) लालकंधारी मादी दुधाळ गाय गट

**संकरित मादी गट –**

१) संकरित मादी १ वर्षाखालील वासरे गट

२) संकरीत मादी एक वर्षाखाली वासरे गट

३) संकरित मादी गाभण कालवड गट

४) संकरित मादी दुधाळ गाय गट

उस्मानाबादी शेळी गट– तीन व त्यावरील पिल्लांची शेळी

अश्व नर गट व मादी गट , अदात, दोन दात वरील,

**कुक्कुट गट –**

१) देशी कोंबडी गट

२) विदेशी कोंबडी गट

**श्वान गट –**

वर्गवारी निहाय

# आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वीरित्या पार

**तभा वृत्तसेवा**

**देवणी, दि. २१ मार्च :** २० मार्च रोजी आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज देवणी चे वार्षिक स्नेहसंमेलन 'रसिकोत्सव'२०२५-२६ पार पडले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जनसेवा सेवाभावी संस्था भोपनीचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर हे होते. तसेच या कार्यक्रमाचे उद्घाटन मधुकर गायकवाड (माजी कुलगुरू स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड) यांच्या हस्ते पार पडले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत मोहिते (माजी प्राचार्य छत्रपती शिवाजीमहाविद्यालय,उदगीर), गंगाधर दापकेकर (सचिव नंदिग्राम कृषी एवं ग्राम विकास संस्था,मुखेड), सोमनाथ वाडकर ( तहसीलदार साहेब देवणी ),भीमरावजी गायकवाड साहेब( पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन दे-वणी), राजकुमार जाधव सर कट साधन व्यक्ती (गट साधन केंद्र देवणी), पालक प्रतिनिधी हनुमंत गवळी सर इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात कार्यक्रमाचे अध्यक्ष,उद्घाटक व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे यांचा सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमाचे उद्घाटन व प्रमुख पाहुणे यांचे भाषण झाली त्यात कार्यक्रमाचे उद्घाटक मधुकर गायकवाड यांनी कै रसिका कॅम्पस मध्ये केजी टू पीजी इथपर्यंत येथे चालत असलेल्या शैक्षणिक कार्याबद्दल प्रशंसा केली व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

देवणी तालुक्याचे तहसीलदार सोमनाथ वाडकर यांनी या शाळेतील शैक्षणिक कार्याबद्दल समाधान व्यक्त करून गोविंदराव भोपणी कर यांनी लावलेल्या ह्या वटवृक्षाच्या सावलीत हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमांमध्ये एलकेजी टू क्लास टेन पर्यंतच्या सर्व मुला मुलींनी विविध कला गुणदर्शनाचा आविष्कार 'रशिकोत्सव' २०२५- २६ मध्ये दाखवला. यात विद्यार्थ्यांनी विविध गाण्यावर डान्स, गायन, नाटक व एकांकिका सादर केले व उपस्थित सर्व पालक वर्गांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे उपप्रा-चार्य रामदास नागराळे यांनी तर सूत्रसंचालन शुभांगी माने यांनी केले.




हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडण्यासाठी शाळेचे प्राचार्य सफी अहमद भट,मॅनेजिंग कोऑर्डिनेटर डॉक्टर सत्यवान सोनटक्के ,स्वाती कोयले व शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमाचा आभार श्रद्धा घोलपे यांनी केले.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## उमरगा पोलिसांची जुगारावर कारवाई; दोन ठिकाणी छापे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ मार्च -**
उमरगा पोलीस ठाणे हद्दीत जुगारविरोधी मोहिमेदरम्यान पोलिसांनी दि. २० मार्च रोजी दोन ठिकाणी छापे टाकून कारवाई केली.

पहिल्या कारवाईत नेताजी इंद्रजित मंडले (वय २७, रा. तुरोरी ता. उमरगा) यांच्याकडून आष्टा-जाहाबीर रोडवरील सूर्यवंशी सलून शेजारी कल्याण मटका



जुगाराचे साहित्य व ७२० रुपये जप्त करण्यात आले.

दुसऱ्या कारवाईत शांतेश्वर कमलाकर खुने (वय ३४, रा. कसगी ता. उमरगा) यांच्याकडून बसवेश्वर चौक, कसगी येथे जुगाराचे साहित्य व ६७० रुपये जप्त करण्यात आले.

या प्रकरणी पोलिसांनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये दोघांविरुद्ध उमरगा पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत. याप्रकरणी तपास सुरू आहे.

# आई तुळजाभवानी मातेस 'वारा घालण्याच्या' परंपरेला प्रारंभ



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ मार्च -**
चैत्र पाडव्यानंतर उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने आई तुळजाभवानी मातेला उकाड्याचा त्रास होऊ नये, यासाठी दरवर्षीप्रमाणे पारंपरिक 'वारा घालण्याची' सेवा सुरू करण्यात आली आहे. यंदा शुक्रवार, दि.२० मार्चपासून या प्राचीन परंपरेचा विधिवत प्रारंभ झाला. शेकडो वर्षांची परंपरा जपत, आई तुळजाभवानीची ही सेवा आजही तेवढ्याच श्रद्धा, निष्ठा आणि भक्तिभावाने सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दररोज दुपारी १ ते ४ या वेळेत देवीच्या मुख्य मूर्तीला मखमली पंख्याने वारा घालण्यात येतो. या सेवेदरम्यान देवीला लिंबू सरबत, पन्हे आणि पेढे यांचा नैवेद्य अर्पण केला जातो. भक्तिभावाने आणि अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ही सेवा पार पाडली जाते. या परंपरेचा मान पलंगे परिवाराकडे असून, त्या परिवारातील एक सदस्य दररोज ठरलेल्या वेळेत देवीची सेवा करतो. वारा घालण्यासाठी चांदीचा दांडा, मखमली पंखा आणि पडदा यांचा वापर केला जातो, ज्यामुळे या सेवेला धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

ही परंपरा चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दुसऱ्या दिवसापासून सुरू होऊन मृग नक्षत्रातील पावसापर्यंत अखंडपणे सुरू राहते. वारा घालण्याच्या कालावधीत गर्भगृहात कोणालाही प्रवेश दिला जात नाही, अशी व्यवस्था मंदिर प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

## मोहा येथे मारहाण; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२१ मार्च -**
कळंब तालुक्यातील मोहा येथे किरकोळ वादातून झालेल्या मारहाण प्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दि.२० मार्च रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास समाज मंदिरासमोर फिर्यादी अमोल मुकुंद कसबे (वय ३९, रा. मोहा) यांना बाबासाहेब सोमनाथ कसबे, राहुल सोमनाथ कसबे, नाना सोमनाथ कसबे, प्रियांका बाबासाहेब कसबे व शितल राहुल कसबे (सर्व रा. मोहा) यांनी पुतळा व जयंतीसाठी पट्टी दिली नाही, येथे येण्याचा तुला अधिकार नाही असे म्हणत वाद घातला.यानंतर आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादीस शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व लोखंडी रॉडने मारहाण करून जखमी केले.

# वडिलांच्या निधनानंतरही जिद्दीने गाठले यशाचे शिखर

### रुद्राक्ष साळुंकेची नवोदय विद्यालयात निवड...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ मार्च -**
संकटाच्या काळातही ध्येय निश्चित असेल तर यश मिळवता येते, हे तुळजापूर तालुक्यातील काटी येथील रुद्राक्ष राहुल साळुंके याने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत त्याने ९७.५० टक्के गुण मिळवत पुणे येथील नवोदय विद्यालयात आपली निवड निश्चित केली आहे.

रुद्राक्षचे वडील कै. राहुल जगन्नाथ साळुंके आणि आई सुप्रिया साळुंके हे मुलांच्या शिक्षणासाठी पुण्यात स्थायिक झाले होते. मात्र, अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी वडिलांचे आकस्मिक निधन झाल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. अशा कठीण परिस्थितीतही रुद्राक्षने खचून न जाता जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले. माझ्या पप्पांचे स्वप्न आज पूर्ण झाले, अशी भावूक प्रतिक्रिया त्याने व्यक्त केली.

रुद्राक्षच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शुक्रवार, दि.२० रोजी काटी येथील त्याच्या निवासस्थानी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. धाराशिव सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुजित हंगरगेकर, उमाजी गायकवाड, उद्योजक सचिन इंगळे व सुनील गायकवाड यांच्या हस्ते त्याला शाल, पुष्पहार व पेढे देऊन गौरविण्यात आले. यावेळी सुजित हंगरगेकर म्हणाले, पितृछत्र हरपलेल्या अवस्थेत रुद्राक्षने मिळवलेले हे यश अत्यंत प्रेरणादायी असून संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

या कार्यक्रमास रुद्राक्षचे चुलते सुहास साळुंके, प्रदीप साळुंके, विकास साळुंके, आजी तसेच इतर नातेवाईक उपस्थित होते. मुलाच्या यशाने सर्वांचे डोळे पाणावले, तर राहुल साळुंके यांच्या आठवणींनी वातावरण भावूक झाले होते. रुद्राक्षच्या या यशाचे काटी गावातून सर्वत्र कौतुक होत आहे.

## वाहतूक नियमभंगावर कारवाई; २८९ प्रकरणांत २.७२ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.२१ मार्च -**
धाराशिव शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी दि.२० मार्च रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर विशेष मोहीम राबवत मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली.

या मोहिमेत एकूण २८९ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली असून २ लाख ७२ हजार रुपयांचा तडजोड शुल्क वसूल करण्यात आला आहे. वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन यावेळी पोलिसांकडून नागरिकांना करण्यात आले.

## मार्डी येथे घरकुलांची पाहणी; अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२१ मार्च -**
लोहारा तालुक्यातील मार्डी येथे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घरकुल योजनांची पाहणी करत संबंधित यंत्रणेला महत्त्वाच्या सूचना दिल्या. या पाहणीदरम्यान प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना व यशवंतराव चव्हाण मुक्त आवास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या घरकुलांची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली.

अपूर्ण असलेली घरकुले तातडीने पूर्ण करावीत, तसेच सुरू नसलेल्या घरकुल लाभार्थ्यांना नोटीस देऊन काम सुरू करण्यास प्रवृत्त करावे, अशा स्पष्ट सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच मनरेगा (एमआरजीएस) अंतर्गत मास्टर वेळेत काढण्याचेही निर्देश संबंधित



अधिकाऱ्यांना देण्यात आले.

या पाहणीवेळी जिल्हा परिषद धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, जिल्हा प्रोग्रामर मेघराज पवार, जिल्हा डाटा प्रोग्रामर महेश मगर उपस्थित होते. यावेळी मार्डी गावातील घरकुल लाभार्थी, ग्रामपंचायत अधिकारी गाडेकर, ग्रामरोजगार सेवक कदम तसेच पंचायत समिती लोहारा येथील ग्रामीण गृह अभियंता आरती उन्हाळे हेही उपस्थित होते.

## तेरणा अभियांत्रिकीत एआय प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**
धाराशिव येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात फार्मसी विद्यार्थ्यांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) टूल्सवरील तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम (दि.१७ ते १९ मार्च) उत्साहात पार पडला.

संभव फाउंडेशन, बेंगळुरू येथील प्रशिक्षक रोहन घाडगे यांनी विद्यार्थ्यांना एआयचे दैनंदिन जीवन, आरोग्य, औषधनिर्मिती, कृषी व उद्योग क्षेत्रातील उपयोग समजावून सांगितले. तसेच जनरेटिव्ह व एजेंटिक एआय टूल्ससह रिझ्युमे बिल्डिंगचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले.

प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी एआयचे शिक्षण सर्व क्षेत्रांसाठी उपयुक्त असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अशोक जगताप, प्रा.जी.बी. चिवटे, डॉ.पी.टी. माने व टीमने परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांनीही प्रशिक्षणाचा भविष्यात फायदा होईल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.

# कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी मुंबईत आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**
कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी भारतीय मजदूर संघाच्या वतीने येत्या २६ एप्रिल रोजी मुंबईतील कामगार आयुक्त कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चात असंघटित तसेच संघटित क्षेत्रातील सुमारे एक लाख कामगार सहभागी होणार असल्याची माहिती संघटक विजयकुमार वाघमारे यांनी दिली.

या मोर्चात घरेलू कामगार, अंगणवाडी सेविका, आशा कामगार, वीज कंत्राटी कामगार यांसारख्या असंघटित क्षेत्रातील कामगारांसोबतच वीज महामंडळ, एस.टी. कर्मचारी, सुरक्षा रक्षक, राज्य सरकारी कर्मचारी, एल.आय.सी. कर्मचारी, नगर परिषद कर्मचारी तसेच विविध खाजगी उद्योगांतील कामगार मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. दि.१४ व १५ मार्च रोजी पुणे येथे आयोजित भारतीय मजदूर संघाच्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

केंद्र व राज्य सरकारच्या कंत्राटीकरण धोरणाच्या विरोधात तसेच प्रलंबित कामगार कायद्यांबाबत निषेध नोंदवण्यासाठी हा मोर्चा आयोजित करण्यात येत आहे.

धाराशिव जिल्ह्यातून सुमारे ५ हजार कामगार या मोर्चात सहभागी होणार असल्याची माहिती भारतीय मजदूर संघाचे लातूर विभाग संघटक विजयकुमार वाघमारे, सहसंघटक नरहरी मुळे, जिल्हाध्यक्ष अनंत गोवर्धन व सरचिटणीस विकास गाडेकर यांनी दिली.

## मालोजी निंबाळकर यांचा सत्कार

**धाराशिव, दि.२१ मार्च -**
शहरातील मालोजी निंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आयोजित कार्यक्रमात शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# अणदूर येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२१ मार्च -**
तुळजापूर तालुक्यातील आणदुर येथे अश्वमेघ मित्र मंडळाच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.पुणे अंधजन मंडळ संचलित शंकरसेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर तसेच दादाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने धनराज मुळे कॉम्प्लेक्स,अणदुर येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाटन श्रीमती नवलबाई गोवे सेवानिवृत्त मुख्याद्यापक व जिल्हा एस.टी. बसचे माजी डीसीएम खोबरे प्रदिप यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात शेकडो रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच ४० रुग्णांवर मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. ग्रामीण भागातील रुग्णांना वेळेवर व योग्य उपचार मिळावेत, यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला. शंकरसेठ साबळे नेत्र रुग्णालय, सोलापूर येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक ते मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे अणदुर परिसरातील अनेक रुग्णांना दिलासा मिळाला असून, भविष्य काळात गोरगरीब जनतेच्या आरोग्याचे प्रश्न सोडविण्यासाठी अशी शिबिरे वारंवार आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती अश्वमेघचे सदस्य दत्ता आलुरे यांनी यावेळी दिली. तर या उपक्रमाचे कौतुक करून, अशा सामाजिक उपक्रमांची गरज असल्याचे नागरिकांनी व्यक्त केले.

# नळदुर्गात ईद-उल-फित्र उत्साहात; हजारो मुस्लिम बांधवांची नमाज





यावेळी नगरपालिकेच्या वतीने ईदगाह मैदान येथे मुस्लिम बांधवांना ईद - उल- फित्रची नमाज व्यवस्थित अदा करता यावी यासाठी मैदानाची स्वच्छता करण्याबरोबरच मंडप उभारून सावलीची व्यवस्था करण्यात आली होती.नगरपालिकेच्या या कामाचे मुस्लिम बांधवांनी कौतुक केले आहे.

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ मार्च -**
नळदुर्ग व परिसरात दि.२१ मार्च रोजी ईद-उल-फित्र मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन नमाज अदा केली.

यावेळी जामे निजामियाचे शेखुल हदीस अल्लामा मौलाना हाफेज व खारी सय्यद सगीर अहमद जागीरदार यांनी रमजानबाबत धार्मिक प्रवचन केले. त्यानंतर शहर काझी हाफेज मोहम्मद अली मैनोदीन काजी यांनी खुदबा पठण केले.

धर्मगुरूंनी सुख, शांती, समृद्धी व बंधुभावासाठी प्रार्थना केली. नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या वतीने मुस्लिम बांधवांचे स्वागत करण्यात आले. तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक मेघना आय.एन. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला.

नळदुर्गसह अणदूर, जळकोट, इटकळ, निलेगाव, काटगाव, केशेगाव, वागदरी, शहापूर आदी गावांमध्येही ईदची नमाज अदा करण्यात आली. यावेळी हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला.

## ढोकी येथे अवैध गावठी दारू जप्त; एकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**ढोकी, दि.२१ मार्च -**
ढोकी पोलीस ठाणे हद्दीत अवैध मद्यविक्रीविरोधी कारवाई करत पोलिसांनी दि.२० मार्च रोजी एका महिलेवर गुन्हा दाखल केला आहे.

फातीमा जगदीश जाधव (वय ४८, रा. कोंड ता. जि. धाराशिव) यांच्या राहत्या घरासमोरून अंदाजे ५ हजार रुपये किंमतीची ५० लिटर गावठी दारू अवैध विक्रीच्या उद्देशाने जप्त करण्यात आली.

या प्रकरणी पोलिसांनी महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# तुळजापूरमध्ये ईद-उल-फितर उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ मार्च -**
रमजान महिनाभर श्रद्धेने रोजे ठेवून अल्लाहची इबादत केल्यानंतर शनिवारी तुळजापूर शहरात ईद-उल-फितर मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरी करण्यात आली. या पवित्र सणानिमित्त हिंदू बांधवांनीही मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देत सामाजिक ऐक्याचे सुंदर उदाहरण घालून दिले. शुक्रवारी सायंकाळी चंद्रदर्शन होताच 'ईद का चाँद मुबारक'च्या शुभेच्छांची देवाणघेवाण सुरू झाली. यावेळी मौलाना समीर आणि मौलाना गुलाम रजवी मोहम्मद यांनी रमजानचे महत्त्व स्पष्ट केले.

नमाजनंतर हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांना भेटून ईदच्या शुभेच्छा दिल्या. घरोघरी तयार करण्यात आलेल्या 'शिरखुर्मा'चा आस्वाद घेत सणाचा आनंद द्विगुणित झाला. दिवसभर ईद मिलन कार्यक्रमांमुळे शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

### नगराध्यक्षांकडून ईदगाह मैदानावर मंडप व्यवस्था

वाढत्या उन्हाचा विचार करून नगराध्यक्ष विनोद गंगणे यांनी ईदगाह मैदानावर भव्य तात्पुरता मंडप उभारला. सलग तिसऱ्या वर्षी करण्यात आलेल्या या व्यवस्थेमुळे नमाज शांततेत पार पडली. या उपक्रमाबद्दल ईदगाह कमिटी व मुस्लिम बांधवांनी त्यांचे आभार मानले. ईदनिमित्त लहान मुलांना सुमारे कॅडबरीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे मुलांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कॉर्पोरेटमध्ये समाजकार्य विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातर्फे बीएसडब्ल्यू तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कनेक्ट फॉर (रोझी ब्ल्यु फाऊंडेशन), मुंबईचे सामाजिक कार्यकर्ते गणेश चव्हाण उपस्थित होते.

यावेळी बोलताना चव्हाण म्हणाले की, १९६० मध्ये टाटा समाज विज्ञान संस्थेद्वारे भारतात व्यावसायिक समाजकार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. आज कॉर्पोरेट सेक्टरमध्ये समाजकार्य विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या सुवर्णसंधी उपलब्ध आहेत, त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. त्यांनी विद्यार्थ्यांना एमएसडब्ल्यू प्रवेश प्रक्रिया, गट चर्चा, फील्ड वर्क आणि प्रभावी सादरीकरण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच इंग्रजी संभाषणाची भीती न बाळगता कौशल्य विकासावर भर देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रभारी प्राचार्य प्रो.डॉ.आनंद शेवाळे यांनी भूषवले. यावेळी अझीम प्रेमजी युनिव्हर्सिटी, बेंगलोर येथे निवड झाल्याबद्दल अजय राऊत व गौरी रसाळ या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विभागप्रमुख प्रो.डॉ.दिनेश मौने, डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, प्रा.काशिनाथ पवार व प्रा.आशिष स्वामी उपस्थित होते.कौशल्य विकासावर स्पर्धात्मक युगात भर द्या केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून, विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व विकास आणि सादरीकरण शैलीवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. गणेश चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनात मुलाखत तंत्र, अहवाल लेखन आणि फील्ड वर्कचे महत्त्व अधोरेखित केले.



# लातुरात रमजान ईद उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** लातूर शहर व जिल्हाभरात शनिवारी रमजान ईद उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. मुस्लिम बांधवांनी परस्परांना ईदच्या शुभेच्छांची देवाण - घेवाण केली. तसेच समाजातील अन्य समाज घटकांमधील आपल्या इष्ट मित्र - आप्तेष्टांसह शिरखुर्म्याचा आस्वादही घेतला.

रमजान ईद हा मुस्लिम समाज बांधवांचा अतिशय महत्वाचा सण असतो. रमजानच्या एक महिन्याच्या उपवासानंतर मुस्लिम शव्वाल महिन्याच्या पहिल्या दिवशी हा सण साजरा केला जातो. तत्पूर्वी ईदच्या आदल्या दिवशी चंद्रदर्शन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी ईद साजरी करण्यात येत असल्याची घोषणा शाही इमामांकडून केली जाते.

खऱ्या अर्थाने हा राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवणारा उत्सव मानला जातो. हिंदू बांधवांची दिवाळी आणि मुस्लिम बांधवांची रमजान ईद हे दोन्ही उत्सव राष्ट्रीय एकात्मता जोपासण्याकामी महत्वाची भूमिका बजावण्याचे काम करतात. ईदच्या अनुषंगाने शहरातील दयानंद महाविद्यालया समोरील ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज अदा करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. ईदच्या निमित्ताने हजारोंच्या संख्येने मुस्लिम बांधव नमाज पठणासाठी एकत्रित येत असल्याने होणारी गर्दी लक्षात घेता प्रशासनाने अगोदरच वाहतूक व्यवस्थेत बदल केले होते. शहराच्या मुख्य रस्त्यावरील वाहतूक अन्य मार्गावरून वळविण्यात आली होती. प्रशासनाने केलेल्या या पूर्वतयारीमुळे मुख्य रस्त्यावर होणारी वाहतुकीची कोंडी टाळणे शक्य होऊ शकले.

लातूर शहरात रमजान ईदच्या पार्श्र्वभूमीवर नेहमी गर्दीने, हातगाड्यांनी गजबजलेली गंज गोलाई बऱ्यापैकी शांत होती. ईद मुळे मुस्लिम बांधवानी घेतलेल्या सुटीचाही तो परिणाम असल्याचे निदर्शनास आले. अन्यथा अतिक्रमणाच्या विळख्यात नेहमीच गंज गोलाई हरवून गेलेली पाहावयास मिळते. प्रशासनाने गंज गोलाईची सौंदर्य अबाधित ठेवून हातगाड्यांवर व्यवसाय करणाऱ्या सर्व बांधवांना स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिल्यास कधीही गंज गोलाई अतिक्रमणाच्या विळख्यात भावना अनेकांनी व्यक्त केल्याचे ऐकायला मिळाले. रमजान ईदच्या पार्श्र्वभूमीवर लातूर शहरात आठवडाभरापासून कपडे, बूट, चप्पल यासह दैनंदिन उपयोगाच्या वस्तू स्वस्त दरात उपलब्ध करून दिल्या जात होत्या. त्याच्या खरेदीसाठी मुस्लिम तसेच समाजातील अन्य समाज बांधवही या खरेदीसाठी मोठी गर्दी करताना दिसून आले. रमजान ईदचा उत्साह मुस्लिम समाजबांधवांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहताना पाहायला मिळाला. एकंदर सर्वांना सोबत घेऊन त्यांनी ईद साजरी केली.

## पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमांतर्गत शिरूर अनंतपाळ येथे प्रलंबित वादाचा निपटारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** लातूर जिल्हा पोलीस दलाकडून पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या पोलिस शेतकऱ्यांच्या बांधावर या उपक्रमांतर्गत शिरूर अनंतपाळ पोलीस ठाणे हद्दीत एक महत्त्वपूर्ण व संवेदनशील शेत रस्त्याचा वाद सामोपचाराने मिटवण्यात येऊन सामाजिक ऐक्य व जातीय सलोख्याचा आदर्श निर्माण करण्यात आला आहे.

शिरूर अनंतपाळ येथील शेतकरी शेरखान अब्बास तांबोळी व त्यांचे शेतशेजारी धनराज वैजनाथ ओलांडे यांच्यात मागील काही दिवसांपासून शेत रस्त्याच्या कारणावरून वाद होता. हा वाद वाढण्याची व स्थानिक पातळीवर तणाव निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भंडे, संबंधित बिट अंमलदार व तलाठी पाटील यांनी तात्काळ पुढाकार घेत प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन दोन्ही पक्षांशी संवाद साधला. पोलीस व महसूल प्रशासनाने संयम, समजूतदारपणा व कायदेशीर मार्गदर्शनाच्या माध्यमातून दोन्ही शेतकऱ्यांना एकत्र बसवून त्यांचे म्हणणे शांततेत ऐकून घेतले व परस्पर समन्वयातून तोडगा काढण्यात यश मिळवले. यामुळे दीर्घकाळापासून प्रलंबित असलेला वाद कोणताही तणाव निर्माण न होता आपसांत मिटवण्यात आला.

विशेष म्हणजे, या वादाचा निपटारा हा रमजान ईद या पवित्र सणाच्या पूर्वसंध्येला झाल्यामुळे या प्रसंगाला अधिक भावनिक व सामाजिक महत्त्व प्राप्त झाले. दोन्ही शेतकरी मित्रांनी सर्व मतभेद बाजूला ठेवत एकमेकांना गळाभेट दिली व बंधुभावाचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. यावेळी शेरखान अब्बास तांबोळी यांनी सर्व उपस्थितांना शिरखुर्मा साठी निमंत्रित करून सणाचा आनंद एकत्र साजरा केला. या घटनेतून विविधतेत एकता आणि जातीय सलोखा यांचा प्रेरणादायी संदेश समाजाला मिळाला.

## २५ मार्च रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, २५ मार्च, २०२६ रोजी सकाळी १० वाजता शिक्षण महर्षी वसंतराव काळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शासकीय आय.टी.आय), औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यात पुणे येथील स्वेस कॉर्प लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर येथील पिप्सी इंजिनिअरींग प्रा. लि., पुणे येथील प्रॉम्प्ट इंडस्ट्रिअल सर्व्हिसेस प्रा.लि., सोलापूर येथील कोलब्रो ग्रुप प्रा. लि., लातूर येथील सनरिच क्का , चैतन्य इंडिया फिन क्रेडिट प्रा. लि., श्रीराम फायनान्स लिमिटेड, माहिष्मती सेक्युरिटी सर्व्हिसेस प्रा. लि., क्रेडीट क्सेस ग्रामीण लि., फ्यिुजन फायनान्स लिमिटेड या आस्थापना सहभागी होणार आहेत. या आस्थापनेमध्ये दहावी, बारावी, कोणतीही पदवी, पदव्युत्तर पदवी, आय.टी.आय. सर्व ट्रेड, डिप्लोमा सर्व ट्रेड तसेच इतर शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांना सहभागी होणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी बुधवार, २५ मार्च, २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शिक्षण महर्षी वसंतराव काळे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (शासकीय आय.टी.आय), औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, लातूर येथे स्वखर्चाने मुलाखती करीता आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, स्वत:चा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो इ. (तीन प्रती) सह उपस्थित रहावे, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, लातूर यांनी केले आहे.

## सांदिपनी इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निकमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या कोळपा येथील सांदिपनी टेक्निकल कॅम्पस फॅकल्टी ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा युगांतर २०२६ दयानंद सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



या स्नेहसंमेलन सोहळ्याचे उदघाटन मराठी सिने अभिनेत्री सिमरन खेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्ष डॉ. अनिल राठी , विजय हिबारे, इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्या डॉ. संजीवनी कुलकर्णी, पॉलिटेक्निकच्या प्राचार्या वाकडे शितल, प्रबंधक बडगीरे उध्दव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सर्व विद्या शाखांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर शैक्षणिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करणारे प्रा. डॉ. आशिष अग्रवाल, चोपने अजय व रुपाली शिंदे यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अनिल राठी यांनी महाविद्यालयातील सर्व गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापक वृंदांचे कौतुक केले. अल्पावधीतच महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात निर्माण केलेली ओळख पाहून समाधान व्यक्त करून त्यांनी भविष्यात सांदिपनी महाविद्यालय शिक्षण क्षेत्रात यापेक्षाही अधिक भरारी घेईल असा विश्र्वास व्यक्त केला.

आपल्या उदघाटनपर मनोगतात अभिनेत्री सिमरन खेडकर यांनी आपण स्वतः लातूरची कन्या असल्याने या सोहळ्यास आवर्जून उपस्थित राहण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले. इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक अशा विविधतेने नटलेले हे प्रगतीपथावरील महाविद्यालय पाहून आपल्याला अतिशय आनंद झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंजिनिअरिंगच्या प्राचार्या डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी संस्थेच्या प्रगतीविषयी सविस्तर माहिती दिली. आपल्या संस्थेच्या १५ वर्षाच्या कार्यकाळात झालेल्या शैक्षणिक प्रगतीबद्दल संस्थेचे कार्यकारी मंडळ तसेच पालकवर्गही समाधान व्यक्त करतात हे पाहून सर्व स्टाफही अधिक कार्यक्षमतेने काम करत असल्याचे त्या म्हणाल्या. वर्ष २०२४ - २५ मध्ये संस्थेमध्ये शिक्षण घेतलेल्या एकूण ९५ टक्के विद्यार्थ्यांची कॅम्पसमध्ये निवड झाली असून यावर्षीही ८० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. अजूनही यावर्षी कॅम्पसमध्ये निवड होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ अपेक्षित आहे. पालकांनी आपल्या पाल्यांच्या भवितव्याबद्दल कोणतीही चिंता करू नये, असेही त्यांनी आश्र्वस्त केले.

कार्यक्रमास स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. बी.एम. सातपूते , प्रा. व्ही.एम. गीर, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. एम.डी. लोमटे,प्रा. पी.जे. गरड यांसह सर्व विभाग प्रमुख , प्राध्यापक व विद्यार्थी प्रतिनिधी अमन गुट्टे, अभय पिंपळे , चिन्मय गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनाली कुलकर्णी, प्रा.वेदपाठक यांनी आभार प्रदर्शन प्रा. सातपूते यांनी केले.

## दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहात आणि अभिनव पद्धतीने साजरा करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावत विविध विषयांच्या तासिका घेतल्या, तर प्राचार्य आणि प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या भूमिकेत सहभागी झाल्याने महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. दरम्यान, या दिनाला आणखीन रोमांचक बनविण्यासाठी स्वयंशासन दिनाचे प्राचार्य यांच्याकडे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी मोर्चा काढत गमतीशीर मागण्या मांडल्या.

स्वयंशासन दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव मिळाला. वर्गात उभे राहून विषय मांडताना विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सादरीकरण कौशल्य आणि जबाबदारीची जाणीव दाखवून दिली. प्राध्यापकांनीही विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांचे कौतुक करत त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य तथा 'उत्कर्ष २०२६' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रभारी डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख, तसेच समन्वयक डॉ. सुभाष मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले.

उत्कर्ष २०२६ चा जल्लोष...

सध्या महाविद्यालयात 'उत्कर्ष २०२६' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानिमित्ताने विविध शैक्षणिक स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रम राबविण्यात येत आहेत. या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, महाविद्यालयीन परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. स्वयंशासन दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि संघभावना विकसित करण्याचा प्रयत्न होत असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले. २३ मार्चला स्नेहसंमेलनाचे उदघाटन होणार आहे तर २५ तारखेला समारोप होईल.

### माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित

# पोद्दार हॉस्पिटलच्या मोफत अस्थिरोगशिबिरात ७८ रुग्णांची तपासणी – उपचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च :** प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त येथील ख्यातनाम अस्थिशल्य चिकित्सक डॉ. अशोक पोद्दार यांच्या पोद्दार हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग शिबिरात ७८ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हे १६९ वे मोफत आरोग्य शिबीर होते.या शिबिराच्या उदघाटनप्रसंगीलातूर शहर मनपाचेविद्यमान उपमहापौर एड. स्नेहल उटगे, माजी उपमहापौर कैलास कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लातूर आयएमएचे अध्यक्ष डॉ . अभय कदम, डॉ. संजय शिवपूजे , डॉ. शशी पाटील, डॉ. मंगेश कुलकर्णी, डॉ. अभय कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, प्रसाद उदगीरकर, जयेश बजाज, श्याम धूत, रामेश्र्वर सोमाणी, विजय पस्तापुरे , बालाप्रसाद सारडा, विजय रांदड आदी मान्यवर उपस्थित होते. दीपप्रज्वलन व धन्वंतरी पूजनानेशिबिराचे उदघाटन करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्या प्रमुख पाहुण्यांचा हृद्यसत्कार करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना एड. स्नेहल उटगे यांनी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनानिमित्त प्रतिवर्षी अशा प्रकारच्या मोफत शिबिराचे आयोजन केले जाते, ही बाब अतिशय महत्वाची आहे. समाजातील सर्वचस्तरातील रुग्णांना या शिबिराचा चांगलाच फायदा होतो. आ. अमित देशमुख यांचे नेतृत्व सर्वव्यापी असल्याने त्यांच्याप्रती अशा पद्धतीने स्नेह व्यक्त करणारी मंडळीही मोठ्या संख्येने लातुरात आहे, ही बाब खरोखर गौरवास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.





माजीउपमहापौर कैलास कांबळे यांनी आपल्या मनोगतात डॉ. अशोक पोद्दार प्रतिवर्षी आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून मोफत शिबिराचे आयोजन करतात, ही बाब आता लातूरच्या सामान्य रुग्णांनाही माहिती झाली आहे. त्यामुळे अनेक रुग्ण या शिबिराची आतुरतेने प्रतीक्षा करताना दिसतात. लातुरात वैद्यकीय क्षेत्रात मोफत आरोग्य शिबिराचा पॅटर्न आणण्याचे काम डॉ. अशोक पोद्दार यांनी केले असून वैद्यकीय क्षेत्रातील कार्याबरोबरच ते सामाजिक कार्यातहीअग्रेसर असल्याचीभावना कांबळे यांनी व्यक्त केली. सामाजिक कार्यकर्ते प्रसाद उदगीरकर यांनी आपल्या मनोगतात डॉ. पोद्दार यांच्या आरोग्यविषयक कार्याचा गौरव करून समाजसेवेच्या ध्यासाने झपाटलेले वैद्यकीय क्षेत्रातील अग्रगण्य चेहरा म्हणजे डॉ. अशोक पोद्दार असल्याचे सांगितले. जयेश बजाज यांनी यावेळी बोलताना डॉ. अशोक पोद्दार यांना अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करून रुग्णांना मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा जणू छंदच जडला असल्याचे बोलून दाखवले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक पोद्दार यांनी केले. ज्या समाजाने आपल्याला एवढे काही भरभरून दिले आहे, त्या समाजाचे आपणही काही देणे लागतो या भावनेने आपण मोफत आरोग्य शिबीराच्या आयोजनास प्राधान्य देत असल्याचेसांगितले. आ. अमित देशमुख यांच्या जन्मदिवसानिमित्त २००९ पासून सातत्याने असे मोफत शिबीर आयोजित केले जाते. आज वैद्यकीय सेवा सुविधा खूप महागल्या आहेत. सामान्य रुग्णांना चांगल्यातचांगल्या सेवा सुविधा मोफत तसेच माफक शुल्कात उपलब्ध करून देण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. समाजाच्या सर्वचस्तरातील रुग्ण त्याचा पुरेपूर लाभ घेतात, हेच या शिबिराचे सर्वात मोठे यश असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. १९९९ पासून हॉस्पिटलच्या आईने उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या थंड पाण्याची सोय करण्यासाठी पाणपोई चालवली जाते. या पाणपोईत थंड पाण्याचे जार उपलब्ध करून दिले जातात. दिवसभरात हजारो नागरिक या पाणपोईचा लाभ घेतात असेही त्यांनी सांगितले. डॉ. अशोक पोद्दार महाराष्ट्र अस्थिरोग तज्ज्ञ संघटनेचे पदाधिकारी असून लातूर जिल्हा अस्थिरोग तज्ज्ञ संघटना, आयएमएम महाराष्ट्र, आयएमए लातूर, आशादीप , दिशा फाउंडेशन , रोटरी परिवार अशा विविध संघटनांच्या माध्यमातून कायम रुग्णसेवा आणि समाज कार्यात अग्रेसर असतात.आजच्या शिबिरात एकूण ७८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यामध्ये २७ रुग्णांचे एक्सरे ५० टक्के सवलतीच्या दरात काढण्यात आले. रक्त व लघवी तपासणीही५० टक्के सवलतीच्या दरात करण्यात आली. सर्वच्या सर्व ७८ रुग्णांची हाडांच्या ठिसूळतेची मोफत तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांना मोफत फिजिओथेरपीची सुविधा ही देण्यात आली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी हॉस्पिटलचेव्यवस्थापक वसीमशेख यांच्यासह सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. शिबिरातील रुग्णांना मोफत औषधीहीउपलब्ध करून देण्यात आली.

## शैक्षणिक कागदपत्रे हरवली आहेत

कळंब ते लातूर बस प्रवासादरम्यान अनमोल दिनकर यशवंते या नावाची यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची बी.ए. पासची डिग्री प्रमाणपत्र तसेच बी.ए. च्या तिन्ही वर्षाच्या गुणपत्रिका अशी शैक्षणिक कागदपत्रे तसेच पॅन कार्डसह इतरही कागदपत्रे असलेली फाईल हरवली आहे. कोणाला सापडल्यास कृपया खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा. योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**: संपर्क :**

**अनमोल दिनकर यशवंते–**

**मोबाईल नंबर : ९०२१५ ३९८२१**